# पोलीस ठाणे कारकून (मोहरर/मुद्देमाल कारकून) ची ओळख

**पोलीस ठाण्यात विविध प्रकारची कर्तव्य पार पाडण्यासाठी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी त्यांचे अधिनस्त पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेल्या कर्मचाऱ्यामधुन कर्मचाऱ्याचा अनुभव, सचोटी, कर्तव्य तत्परता, जबाबदारीची भावना, वक्तशीरपणा, कार्यक्षमता, कौशल्य व गुणांचा आधारावर पोलीस ठाणे चे दैनंदिन कामकाज करण्यासाठी निवडक कर्मचाऱ्यांची विशिष्ट पदावर नियुक्ती करतात. आपण पोलीस ठाणे मधील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे नंतर सर्वात महत्त्वाचे कार्य सांभाळणारे पद म्हणजे कारकून /हेडमोहरर (Cashier) याबाबत माहिती घेणार आहोत. पोलीस ठाणे कारकून (मोहरर/रोकड कारकून) हा पोलीस हवालदार दर्जाचा कर्मचारी असतो. याला डे बुक क्लार्क असेही म्हणतात. यांचे प्रमुख कर्तव्य पोलीस ठाण्यातील पैशांचा हिशोब ठेवणे तसेच मुद्देमालबाबतची रेकॉर्ड अद्यावत ठेवणे हे आहे. काही पोलीस ठाण्यामध्ये रोकड कारकुन व मुद्देमाल कारकुन अशी दोन्ही कामे सांभळण्याकरीता दोन वेगवेगळया पोलीस हवालदार कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असते. परंतु अपुऱ्या संख्याबळामुळे जास्तीत जास्त पोलीस ठाण्यात हि दोन्ही कामे एकच कर्मचारी करतो. पोलीस ठाण्याकडील पोलीस ठाणे कारकुनची नेमणुक पोलीस नियमावली भाग-1 नियम क्र.96 विचारात घेऊन केली जाते. तसेच पोलीस नियमावली भाग -1 नियम क्र. 255(3) (डी) अन्वये योग्य ती अनामत रक्कम संबंधीताकडुन भरणा करुन घेतली जाते.**

# मुद्देमाल कारकुन हवालदाराची कर्तव्य

- मुद्देमाल रूमचा चार्ज घेतेवेळी दक्षता :- मुद्देमाल रूमचा चार्ज घेतेवेळी मुद्देमाल रजिस्टरप्रमाणे नोंद असलेला प्रत्येक मुद्देमाल तपासून तो सुस्थितीत असल्याची खात्री करावी. पेंडींग मुद्देमाल किती आहे तो कोठे पाठविला आहे काय, सी.ए. तपासणीसाठी पाठविला असल्यास त्याची तशी नोंद आहे काय, पो. स्टे. आवारात ठेवलेला असल्यास तो बघून खात्री करावी. किमती मुद्देमाल ताब्यात घेताना बारकाईने बघून खात्री करावी. सीलबंद पाकीटात असल्यास सील सुस्थितीत आहे अगर कसे याची खात्री करावी. आर्त ॲम्युनिशनच्या बाबतीत प्रत्येक आर्म ॲम्युनिशन मोजूनच ताब्यात घ्यावे. सर्व रेकॉर्ड व्यवस्थित मेंटेन केले आहे की नाही, दाखल मुद्देमाल निर्गती मुद्देमाल व पेंडींग मुद्देमाल याबाबत खात्री करावी त्यानंतरच मुद्देमाल रूमचा चार्ज घ्यावा.
- **मुद्देमाल पावती फाडणे (नोंदविणे)** :- तपासी अंमलदार यांनी गुन्हयांचे तपासा दरम्यान जप्त केलेल्या / बेवारस मिळुन आलेल्या वस्तु ताब्यात घेतल्यानंतर जप्त वस्तुंची/ मुद्देमालाची तात्काळ पावती फाडणे (नोंदविणे) व जप्त असा सर्व मुद्देमाल जमा करुन घेणे आवश्यक आहे.
- **जप्त मुद्देमाल तपासुन घेणे** :- तपासी अंमलदार मुद्देमाल जमा करणेस आलेनंतर जप्त मुद्देमाल पंचनाम्यातील वर्णनाप्रमाणे बरोबर असलेबाबत तपासुन पाहुन घेणे. (पंचनाम्यातील वर्णनाप्रमाणे मुद्देमाल कोर्टात न पाठविलेस तो स्विकारला जात नाही व त्याचा परिणाम खटल्याचे निकालावर होण्याची शक्यता असते)
- **मुद्देमाल नोंदवहीतील नोंदी** :- तपासी अंमलदार यांचकडुन मुद्देमाल पावती फाडलेनंतर त्याची संबंधीत रजिस्टरमध्ये (वर्गवारी प्रमाणे) नोंद घेवुन मुद्देमाल पवतीवर मुद्देमाल रजिस्टर नंबर घालणे व दुस-या प्रतीवर मुद्देमाल नंबर टाकुन ती प्रत तपासी अंमलदार यांना देणे, सर्व मुद्देमालावर नोंद नंबर ,गुरंन,कलम यांची कागदी लेबल लावुन तो मुद्देमाल क्रमवार प्रकाराप्रमाणे/ वर्षा प्रमाणे सुरक्षित व सुबकरित्या रॅकवर लावुन ठेवणे. तसेच दागिने, पैसे, अग्निशस्त्र जप्त असतील तर त्याची तज्ञाकडे छाननी करुन त्यांचे प्रमाणपत्रसह असा सर्व मुद्देमाल खास बनवुन नियोजीत केलेल्या ठिकाणी सुरक्षीत ठेवावा. जो मुद्देमाल अवजड स्वरुपाचा असेल उदा. बॅरेल, अवजड वाहने, मोटार सायकल, सायकल इत्यादी वाहनांवर ऑईलपेंटने मुद्देमाल इंट्री नंबर, गुरनं व कलम याप्रमाणे पेटींग करुन,कागदी लेबले लावुन तो मुद्देमाल क्रमवार /सालाप्रमाणे सुरक्षित सुबकरित्या ठेवणेत यावा.
- **वर्गवारी प्रमाणे मुद्देमाल ठेवणे** :- ताब्यात मिळालेला मुद्देमाल गुन्हयाचे प्रकारानुसार असा स्वतंत्रपणे क्रमवार सालाप्रमाणे सुरक्षित व सुबकरित्या रॅकवर लावुन ठेवणे.-

- **सी.ए. तपासणीस पाठविलेल्या मुद्देमालाची नोंद** :- सी.ए.करीता हस्ताक्षर तपासणी करीता, तसेच इतर तपाणी करीता पाठविलेल्या मुद्देमालाची मुद्देमाल नोंदवहीतील त्या नोंदीसमोर नोंद घेवून ज्यांचे ताबेत मुद्देमाल दिला त्यांची स्वाक्षरी घ्यावी व पाठविलेल्या रिपोर्टाची स्थळप्रत फाईलला लावुन ठेवावी. सी.ए. करीता पाठविलेल्या मुद्देमालाचे स्वतंत्र रजिस्टर मध्येच घ्याव्यात ,जेणेकरुन किती गुन्हयातील मुद्देमाल सी.ए. तपासणीवर प्रलंबित आहे. याची तात्काळ माहिती उपलब्ध आहे
- **सी.ए. तपासणी होवुन परत आलेनंतर नोंद घेणे** :- सी.ए. तपासणी होवुन मुद्देमाल परत पोलीस ठाणेस आले नंतर ही त्या मुद्देमालाची संबंधीत नोंदीसमोर पुन्हा नोंद घ्यावी.
- **कोर्ट आदेशान्वये मुद्देमाल परत** :- जो मुद्देमाल मालक/वारस/संबंधित व्यक्तिस परत देणे बाबत न्यायालयाचा आदेश होईल. त्यावेळी मुद्देमाल ज्याचे ताब्यात दयावयाचा त्यांची पुर्ण खात्री करावी व मुद्देमाल ताब्यात दयावा. सदर मुद्देमालाबाबत संबंधीत नोंदीसमोर मुद्देमाल परत देणे बाबत कोर्ट आदेश लिहुन संबंधीताची स्वाक्षरी घ्यावी व संबंधीत इसमास मुद्देमालाची पुर्ण खात्री करणेस सांगुन मग सदरचा मुद्देमाल परत करावा.
- **प्रलंबित मुद्देमाल आढावा** :- प्रत्येक महिन्याचे अखेरीस नोंदवहीत प्रलंबित मुद्देमालाचा आढावा घेवुन त्याची नोंद दर महिन्यास घ्यावी
- **मुद्देमाल चेक व पंधरवडा अहवाल** :- प्रभारी अधिकारी यांनी दर पंधरवड्यामध्ये मुद्देमाल चेक केले बाबत रजिस्टरला नोंद घेवुन पंधरवडा अहवाल पाठवावा.
- **अचानक माल तपासणी** :- प्रभारी अधिकारी यांनी अचानक मुद्देमाल तपासणी करुन सर्व मुद्देमाल बरोबर आहे का याची खात्री करावी
- **दारुबंदीचे गुन्हयातील सँपल सुरक्षित बाटल्या** :- दारुबंदी खालील जप्त माल गावठी दारु व इतर मालाबाबत न्यायालयाकडुन लिलाव करणेचे नाश करणेचे आदेश प्राप्त करुन घेणेसाठी नियमीत पाठपुरावा करावा असे आदेश प्राप्त होताच नियमानुसार लिलाव/नाश प्रक्रिया पुर्ण करावी व लिलावाची रक्कम चलनाने सरकार जमा करुन संबंधीत नोंदवहीत नोंद करावी.
- **दारुबंदी गुन्हयातील मालाची सी.ए. तपासणी** :- दारुबंदी कायदाखालील सँपल बाटल्या ठरवून दिलेल्या कोटयाप्रमाणे नियमीतपणे केमीकल ॲनालायझर यांचेकडे तपासणीसाठी पाठवाव्यात.
- **जुगार कायदया खालील जप्त रोख रक्कम** :- जुगार कायदयाखालील जप्त रोख रक्कमा कोर्ट क्रिमीनल हेड खालील स्टेट बँक/ट्रेझरी मध्ये जमा करुन त्याच्या चलनाच्या प्रती चलन फाईलला लावुन ठेवाव्यात. तसेच चलन क्रमांकाची नोंद मुद्देमाल नोंदवहीत घ्यावी.

- **किंमती मुद्देमाल** :- जप्त किंमती मुद्देमाल उदा. सोने, चांदी, इत्यादीचे दर 6 महिन्याचे सराफकडुन प्रमाणपत्र घेणेत येवुन सदरचे मुद्देमालासह ठेवावे.
- **कोर्टात दाखल केलेला मुद्देमाल** :- कोर्टात जमा केलेल्या मुद्देमालाची नोदंवहीतील नोंदीसमोर घेवुन मुद्देमाल ज्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या ताब्यात देवुन न्यायालयात पाठविला त्यांची स्वाक्षरी नोंदवहीत घ्यावी. मुद्देमाल न्यायालयात जमा झालेनंतर कोर्टाकडील एम.आर. क्रमांक व्ही.पी.एम.आर. क्रमांक यांची रजिस्टरमध्ये नोंद घ्यावी. पाठविलेल्या रिपोर्टाची स्थळप्रत फाईलला लावुन ठेवावी.
- **जप्त रोख रक्कम जमा** :- गुन्हयातील जप्त मोठ्या रक्कमा न्यायालयच्या परवानगीने स्टेट बँक/ट्रेझरी मध्ये कोर्ट क्रिमीनल हेड खाली जमा कराव्यात. स्फोटक,ज्वालाग्राही मुद्देमालाबाबत :- स्फोटक ज्वालाग्राही मुद्देमालाबाबत उदा.गॅस, पेट्रोल इत्यादी बाबत महसुल विभागाचे पुरवठा अधिकारी यांना तात्काळ अहवाल सादर करुन आदेश प्राप्त करुन घेवुन आदेशाप्रमाणे या मुद्देमालाची सत्वर निर्गती करावी.
- **मुद्देमाल शिल्लकी आढावा** :- वर्ष संपल्या नंतर नवीन नोंदवही अभिलेखावर ठेवाव्यात. सर्व नवीन व जुन्या नोंदवही पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन प्रमाणित करुन घ्याव्यात. मुद्देमाल आढावा नोंदवहीत पोलीस तपासावर प्रलंबित तसेच न्यायालयात निकाल न झालेले कोर्ट प्रलंबित मुद्देमालाचा आढावा लाल शाईने मुद्देमाल नोंदवहीत घ्यावा. तसेच ज्या पोलीस ठाणेस अकस्मात मयतांचे प्रकरणाकरीता आढावा नोंदवही उपलब्ध असेल तर संबंधीत आढावा नोंदवहीत प्रलंबित प्रकरणांचा आढावा लाल शाईने 15 दिवसांचे आत लिहावा.
- **क्राईम रजिस्टरी नोंद** :- मुद्देमाल पावती फाडलेनंतर मुद्देमाल इंट्रीची नोंद क्राईम रजिस्टरमधील कॉलम क्रमांक 21 मध्ये घेणेत यावी.
- **मुद्देमाल नोंदी** :- तपासी अंमलदारकरवी वेळचेवेळी मुद्देमाल पावती फाडुन जप्त मुद्देमाल सत्वर जमा करणेसाठी पाठपुरवा करावा. यामुळे मुद्देमालांची रजिस्टरमध्ये क्रमवार नोंदी होऊन मुद्देमाल जप्त तारखेवरुन तात्काळ शोधणेस मदत होईल.
- **रजि.मधील नोंदी बाबत प्रभारी अधि.यांची स्वाक्षरी** :- निर्गती केलेल्या वस्तुबाबत व रजिस्टर मध्ये घेणेत आलेल्या नोंदी बाबत प्रभारी अधिकारी यांची समक्षची स्वाक्षरी घेणेत यावी.
- **गहाळ नोंद** :- एखादा मुद्देमाल गहाळ असेल तर त्याबाबत स्वतंत्र रजिस्टर ठेवावे व संबंधीताकडुन त्याची पुर्तता करुन घेणेत यावी. जर मुद्देमाल गहाळ अथवा अपहार केला असलेस ती बाब पो.ठाणे प्रभारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन दयावी. नंतर प्रभारी

अधिकारी यांनी त्याची खातरजमा करुन उपविपोअधि. यांना अहवाल पाठवावा. याबाबत सविस्तर चौकशी करुन त्वरीत चौकशी अहवाल आस्थपना शाखेस सादर करतील

- **अभिलेख** :- सर्व अभिलेख व नोंदवही अद्यावत लिहुन त्याची मांडणी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन दिलेल्या सुचनेप्रमाणे क्रमवार लावुन करावी.
- **रेकार्ड छाननी** :- जुन्या रेकार्डची छाननी करुन अ व ब अशी वर्गवारी करुन सदरचे रेकार्ड पोलीस ठाणेच्या रेकार्ड रुममध्ये अनुक्रमणिका लावुन सुस्थितीत व सुबक रित्या ठेवावे. तसेच मुदत बाहय झालेल्या रेकार्डची यादी बनवुन या रेकार्डची नाश रेकार्ड नोदंवहीत नोंद घेवुन अहवालासोबत सदरचे रेकार्ड रापोनि मुख्यालय यांच्याकडे सुपूर्त करावेत.

# मुद्देमाल म्हणजे काय ? मुद्देमालाचे स्त्रोत

- **मुद्देमाल म्हणजे काय** ? :- विविध गुन्हयाचे तपासकामी जप्त केलेल्या वस्तु, आकस्मात मृत्यु, दारुबंदी, जुगार या केसेसमध्ये जप्त केलेले साहित्य अन्य स्थानिक कायद्यान्वये केलेले कार्यवाई मध्ये जप्त केलेले साहित्य व बेवारस वाहने, वस्तु यास ढोबळ मानाने मुद्देमाल असे म्हटले जाते.
- फौजदारी प्रक्रीया संहिता कलम 100(7) अन्वये एखादया बंधीस्त जागेचे झडती घेतली असता त्या झडतीमध्ये जप्त केलेल्या वस्तु.
- फौजदारी प्रक्रीया संहिता कलम 102 अन्वये पोस्टे प्रभारी अधिकारी यांनी चोरीची मालमत्ता आहे असे अभिकथन करण्यात आले असेल किंवा तसा संशय असेल अशा परिस्थितीत जप्त केलेली मालमत्ता.
- फौजदारी प्रक्रीया संहिता कलम 165 अन्वये अन्वेषण करणा-या अधिका-याने अन्वेषणानाच्या प्रयोजनार्थ जप्त केलेल्या वस्तू.
- फौजदारी प्रक्रीया संहिता कलम 174 अन्वये आत्महत्या अथवा अपघाती मृत्यू अथवा संशयास्पद मृत्यूच्या प्रकरणांमध्ये अन्वेषणाच्या प्रयोजनार्थ जप्त केलेली मालमत्ता.
- महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 124 अन्वये जप्त केलेली मालमत्ता
- महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये जप्त करण्यात आलेली मालमत्ता
- महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये जप्त करण्यात आलेली मालमत्ता
- एन डी पी एस ॲक्ट 1989 अन्वये जप्त करण्यात आलेला मुद्येमाल.
- जिवनावश्यक वस्तु अधिनियम अन्वये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल.
- अन्य स्थानिक कायदयान्वये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल.
- भारतीय पुरावा कायदा कलम 27

  आरोपीकडुन मिळालेल्या माहिती पैकी किती भाग शाबित करता येईल :- कोणत्याही अपराधाचा आरोप असलेली एखादी व्यक्ती पोलीस अधिकाऱ्याच्या हवालातीत असतांना तीच्याकडुन मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने एखादे तथ्य उघडकीस आले आहे, अशी जबानी देण्यास आली असेल तेव्हा अशा माहिती पैकी जेवढा भाग त्यामुळे उघडकीस आलेल्या तथ्यांशी निःसंदीग्धपणे संबंधीत असेल तेवढा शाबीत करता येईल.
- कलम 39 :- ज्या वेळी कथन मोठया कथनाचा - संभाषणाचा भाग असेल अगर इलेक्ट्रॉनिक अभिलेखाचा भाग असेल अथवा पुस्तकांचा अगर सलग पत्रांच्या किंवा कागदपत्रांच्या मालिकेचा भाग असेल.

# मुद्देमालाचे प्रकार

- घटनास्थळावरुन मिळणारे भौतिक दुवे :- केस, विर्य, रक्त, रक्ताचे नमुने, लाळ, घाम, दात, हाड, मुत्र, विष्टा, रक्त मिश्रीत माती, साधी माती, धुळीचे डाग, दगड, गवत, कागद, डाग, काठी, हत्यार, वास येणा-या वस्तु इत्यादी.
- घटनास्थळावरुन मिळणारे स्फोटक पदार्थ :- अग्नी शस्त्रे, बंदुक रिव्हॉल्वर, पिस्तुल, काडतुसे, तोफा, क्षेपणास्त्रे, विषारी स्फोटक पदार्थ, जिलेटीन,  डेटोनेटर्स अन्य प्रकारचे पावडर.
- शव विच्छेदनाचे वेळी तपासणीसाठी राखून ठेवलेले :- शरीरातील  वेगवेगळ्या भागातील अवयवाचे तुकडे, व्हिसेरा, कातडी, मेंदु, स्टमक वॉश, सांगाडा, अर्धवट जळालेली हाडे,
- NDPS कायदयाखाली जप्त केलेल्या वस्तु :- गांजा, चरस, अफु, हेरॉईन ब्रॉऊन शुगर, मेन्डेक्स गोळया.
- दस्तऐवज :- स्टॅम्प, हस्तलिखीत, टंकलिखीत, प्रिंट, नैसर्गिक हस्ताक्षर, नमुना हस्ताक्षर, वादग्रस्त दस्तऐवज.
- दारुबंदी गुन्हयातील मुद्देमाल :- गावठी दारु, देशी दारु,  विदेशी दारु
- जुगार कायदयाखालील मुद्देमाल :- जप्त रोख रक्कम, मोबाईल, वाहने.
- किंमती मुद्देमाल :- सोने, चांदी, हिरे, जवाहरात, नगदी रोख.
- ज्वालाग्रही मुद्देमाल :- पेट्रोल, डिझेल, रॉकेल, गॅस व इतर ज्वालाग्रही पदार्थ.
- बेवारस मुद्देमाल :- दुचाकी, चार चाकी वाहने, इतर बेवारस वस्तु.
- बोटांचे व पायाचे ठसे :- घटनास्थळावरुन मिळुन आलेले गुन्हेगारांचे व संशयीतांचे बोटांचे व पायाचे ठसे .
- संभाषण :- अपहरण, लाच, खंडणी, ब्लॅकमेलींग, वादग्रस्त संभाषण.
- इलेक्ट्रॉनिक्स मुद्देमाल :- मोबाईल, संगणक, लॅपटॉप, सीडी, पेन ड्राईव्ह, सी.सी.टी.व्ही.फुटेज, व्हीडीआर

# मुद्देमाल रूममध्ये मुद्देमालाची मांडणी

आपल्याकडे मुद्देमाल ठेवण्यासाठी मुद्देमाल कक्ष आकाराने छोटा असतो. त्यात मुद्देमाल ठेवण्याची कसरतच करावी लागते. त्यासाठी योग्य नियोजन केले तर चांगली मांडणी करता येते. किमती मुद्देमाल वेगळा तिजोरीत ठेवावा इतर मुद्देमालासाठी रॅक बनवून त्यात चांगली मांडणी करता येईल. प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र मजबूत खोके बनवून त्या खोक्यात त्या त्या वर्षाचा मुद्देमाल ठेवून त्या खोक्याच्या बाहेरील बाजूस समरी तक्ता चिटकवावा त्या तक्त्यात गुन्हयाचे वर्गवारी प्रमाणे मुद्देमाल नमूद करून गु.र.नं. एम.आर. नं. असे असावे जेणेकरून कोर्टात मुद्देमाल जमा करतेवेळी मुद्देमाल सहज शोधता आला पाहिजे व तो काढून कोर्टात वेळेवर सादर करता येईल. व्यवस्थित मांडणी केली तर मुद्देमालाचे पॅकिंग व सिलिंग तुटत नाहीत व खराब होत नाही.

ज्वलनशील मुद्देमाल वेगळा ठेवावा व त्याची अधूनमधून खात्री करावी. जो मुद्देमाल सी.ए. तपासणीसाठी पाठवायचा आहे. तो लागलीच पाठविला गेला पाहिजे. दारूबंदीच्या केसेस मधील मुद्देमालसुद्धा वेळीच पाठवावा. बाकीचा शिल्लक मुद्देमाल कोणता मुद्देमाल कोठे ठेवला आहे. याबाबत तक्ता बनवून ठेवल्यास तात्काळ शोधून काढता येऊ शकेल, अशी मुद्देमालाची नियोजनबद्ध मांडणी केलेली असावी.

# मुद्देमाल कारकुनाने मुद्देमाल ताब्यात घेताना घ्यावयाची दक्षता

एखादा दखलपात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर त्या गुन्ह्याचा तपासी अंमलदार गुन्ह्याच्या घटनास्थळी जाऊन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा करून घटनास्थळावरील काही मुद्देमाल जप्त करतो किंवा एखाद्या घरझडतीत मुद्देमाल जप्त करतो, कधी मेमोरंडम पंचनाम्याद्वारे काही मालमत्ता, गुन्ह्यात वापरलेले हत्यार, कपडे जप्त करतो. अशा वेळी जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनला आल्यावर मुद्देमाल कारकुन यांच्या ताब्यात देतो. तेव्हा मुद्देमाल कारकुनने जप्त मुद्देमालाची पंचनाम्याप्रमाणे खात्री करावी तो मुद्देमाल व्यवस्थित पॅकींग सिलिंग व लेबलिंग केलेला आहे किंवा नाही. ब-याचशा गुन्ह्यात तपासी अंमलदाराने मेमोरंडम पंचनाम्यामध्ये ताब्यात घेतलेल्या सोन्याच्या दागिन्यांवर सील व सही केलेली नसते, पंचांच्या सहीचे लेबल लावलेले नसते, तसे पंचनाम्यातसुद्धा नमूद नसते व सराफाकडून सोने असल्याबाबत प्रमाणित करून घेतले नसते. अशा बेजजबादर पणा मुळे अशा केसेस कोर्टात निर्दोष सुटत आहेत. म्हणून मुद्देमाल ताब्यात घेताना पॅकिंग, सिलींग व लेबलिंग बघून जेवढा मुद्देमाल हजर केला त्याचीच मुद्देमाल रजिस्टरी नोंद घेऊन मुद्देमाल पावती बनवून त्या पावतीवर तपासी अंमलदार यांचे नाव, हुद्दा, सही घ्यावी व पावतीची 1 प्रत एम.आर. नं. टाकून तपासी अंमलदाराच्या ताब्यात गुन्ह्याच्या कागदपत्रात समाविष्ट करण्यासाठी द्यावी व जो मुद्देमाल सी.ए. तपासणीसाठी पाठविला त्याची तशी नोंद घ्यावी.

# मुद्देमालाची चैन ऑफ कस्टडी

- तपासी अंमलदाराने गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याच्या घटनास्थळावरील मुद्देमाल हाताळणी, लिफ्टींग, पॅकिंग, सिलिंग करून त्यावर तपासी अंमलदार व पंचांच्या सह्या करून तो मुद्देमाल कारकुनाकडे जमा करणे.
- मुद्देमाल कारकुनाने तो मुद्देमाल पंचनामाप्रमाणे असल्याची, सील असल्याची, पंचांच्या व तपासी अंमलदाराच्या सही असलेले कागदी लेबल तसेच गुर.नं. कलम, फिर्यादी, आरोपीचे नाव, मुद्देमालाचे वर्णन, किंमत असलेले कागदी लेबल चिटकविलेले असल्याची खात्री करून घ्यावी.
- त्यानंतर तो मुद्देमाल तपासी अंमलदाराकडून मुद्देमाल कारकुनाने ताब्यात घेऊन मुद्देमाल रजिस्टरला लागलीच नोंद घेऊन मुद्देमाल रजिस्टर नंबर (एम.आर.नं.) सह मुद्देमाल पावती दिली पाहिजे.
- तपासी अंमलदाराने मुद्देमाल पावती गुन्ह्याच्या कागदपत्रात समाविष्ट करावी व जो मुद्देमाल सी.ए. तपासणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तो मुद्देमाल तपासणीसाठी पाठवताना त्यावर व्यवस्थित एक्झिबीट नंबर टाकून न्यायसहायक प्रयोगशाळा यांचे नांवे सविस्तर रिपोर्ट लिहून त्यात एक्झिबीट नं. 1,2,3, मध्ये काय आहे त्याचे वर्णन लिहावे तसेच प्रश्नसूची व्यवस्थित मुद्देसूद असावी.
- मुद्देमाल तपासणीसाठी कोणत्या कर्मचा-याचे हस्ते पाठविला त्याचे नाव, नेमणूक रिपोर्टात लिहावे. ज्या सीलने मुद्देमाल सील केला त्याच सीलने इंकपॅडवरून शाईचा शिक्का नमुना सील म्हणून रिपोर्टावर उमटवला पाहिजे.
- मुद्देमाल तपासणीसाठी घेऊन जाणा-या कर्मचा-यास ड्युटीपास दिला पाहिजे.
- पोलीस कर्मचा-याने (कॅरियर) मुद्देमाल प्रयोगशाळेत जमा करून आल्यानंतर त्याचा जबाब नोंदवून तो जबाब व रिपोर्टाची स्थळात तपासी अंमलदाराने गुन्ह्याच्या कागदपत्रात समाविष्ट केली पाहिजे. मुद्देमाल कोणी कोणी हाताळला, कशासाठी हाताळला व तो कुठे कुठे गेला याची तपासी अंमलदाराने केस डायरी, स्टेशन डायरीमध्ये नोंदी घ्याव्यात.
- मुद्देमाल ठेवण्याची पद्धत, त्याच्यावर वातावरणाचा परिणाम झाला काय. उदा. रक्ताच्या सँपलमध्ये डॉक्टरांनी प्रिझर्वेटिव्ह औषध टाकले नाही तर रक्ताचे क्लॉटिंग तयार होऊन पुरावा नष्ट होऊ शकतो.
- मुद्देमाल ज्यांनी ज्यांनी हाताळला त्यांचे जबाब नोंदवावेत व ते सर्व पुरावे तयार होतील व साक्षीदार म्हणून त्यांना कोर्टापुढे हजर करावेत.

- तपासी अंमलदाराने घटनास्थळावर जाताना लाखेचे सील, आगपेटी, मेणबत्ती, दोरा, खाकी कागद, प्लॅस्टिकच्या पिशव्या अशा वस्तूंची पॅकिंग व सिलींगकामी स्टेशन डायरीला सोबत घेऊन जात असल्याची नोंद करावी.
- मुद्देमाल सी.ए. तपासणी होऊन आल्यानंतर तपासणी अहवाल संबंधित कोर्टात रिपोर्टासह सादर केला पाहिजे.

# जप्त मुद्देमाल कोर्टात जमा करण्याची पद्धत

सेशन कमीट केसमध्ये एखादा मुद्देमाल तपासी अंमलदाराने जप्त करून मुद्देमाल कारकुन यांच्या ताब्यात दिलेला असेल असा मुद्देमाल त्या केसच्या सुनावणीच्या वेळी संबंधित कोर्टाचे पोलीस स्टेशनला पत्र येते की, ----- या केसचा मुद्देमाल कोर्टात हजर करावा. अशावेळी मुद्देमाल कारकुन यांनी जेएमएफसी व सेशनकोर्टाचे नांवे पत्र तयार करून जेएमएफसी कोर्टात मुद्देमालसह प्रथम जाऊन तेथील कोर्टाला पत्र व मुद्देमाल दाखवून जेएमएफसी कोर्ट संबंधित सेशन कोर्टातून फाईल आणण्यास सांगतात. सेशन कोर्टाकडून फाईल ऑर्डर होऊन फाईल दिली जाते. सेशन कोर्टाचे मुद्देमाल लिपिक फाईल तपासुन मुद्देमाल तपासणी लेटर तयार करून मुद्देमाल जमा करून घेतात व तो मुद्देमाल कोर्टापुढे सादर केला जातो. केसचा निकाल लागल्यावर मुद्देमाल जर नाशवंत असेल तर तो नाश करण्यासाठी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिला जातो. जेएमएफसी कोर्टाचा मुद्देमाल हा जेएमएफसी कोर्टातच केसच्या सुनावणीच्या वेळी जमा करावा लागतो.

# जप्त मुद्देमालाबाबतची कारवाई

- **चलनी नोटा** :- जप्त चलनी नोटा हे न्यायालयाचे मते, जे त्याचे कायदेशिर हक्कदार आहेत, अशा नोटा संबंधीतांना परत करतांना त्यांची संख्या, सिरीज, नंबरसह तपशिलवार पंचनामा तयार करुन त्याचे फोटो व बॉन्ड घेवुन त्या व्यक्तीस परत केले जावु शकते. सदर नोटाचे फोटोवर फिर्यादी, आरोपी, साक्षीदार व ज्या व्यक्तीस मुद्देमाल परत करण्यांत येत आहे. त्यांची स्वाक्षरी घेवुन मुद्देमाल परत करावे. मुद्येमाल परत करते वेळी सुनावणी वेळी सदरहु नोटा हजर करणे विषयी बंधनकारक करु नये.
- **वाहन** :- एखादे गुन्हयात जप्त मोटार वाहन हे त्याचे मालकास परत करतांना त्याचा सविस्तर पंचनामा फोटोग्राफ मुल्यांकन अहवाल व बॉन्ड घेवुन सोडण्यांत यावे. सदर वाहनाचे फोटोवर फिर्यादी, आरोपी, साक्षीदार व ज्या व्यक्तीस मुद्देमाल परत करण्यांत येत आहे. त्यांची स्वाक्षरी घेवुन मुद्देमाल परत करावे. मोटार वाहन परत करते वेळी सुनावणी वेळी मोटार वाहन हजर करण्याऐवजी त्याचे फोटोग्राफ मुल्यांकन अहवाल हजर करावे. वाहन परत करते वेळी त्याचे विक्रीसाठी परवानगी, अटी सर्व सामान्य प्रमाणे असावेत. जर वाहनाचा विमा आहे, न्यायालयाने त्याचे मालकास व विमा कंपनीस नोटीस जारी केली पाहिजे. जर त्यास नोटीसला प्रतिसाद मिळत नसल्यास मालक किंवा विमा कंपनी वाहन परत घेवुन जात नसल्यास न्यायालय सदर वाहनाचे लिलावाचे आदेश पारित करु शकते. जर मोटार वाहन आरोपी, मालक, विमा कंपनी किंवा कोणीही दावा केला नसल्यास न्यायालय सदर वाहनाचे लिलावाचे आदेश पारित करु शकते.
- **दारु व अंमली पदार्थ** :- दारु व अंमली पदार्थाच्या मुद्देमालाची निर्गती करणे कामी त्वरीतकार्यवाही केली पाहिजे. जप्त मुद्देमालामधुन एक बॉटल, अंमली पदार्थ असेल तर एक पाऊच मध्ये घेवुन त्याचा सविस्तर पंचनामा करुन त्या सर्व मुद्देमालाचा फोटो घेवुन, सॅम्पल सी.ए.ला पाठवावे व उर्वरीत मुद्देमाल पो.स्टे.ला सुरक्षीत ठेवावा. मुद्येमाल सॅम्पल व मुद्येमालाची घेतलेले फोटोग्राफ व पंचनामा हे गुन्हयाचे सुनावणीचे वेळी पुराव्याकामी ग्रहीत धरले जाईल.
- **नाशवंत व नैसर्गिकरित्या सडणारे मुद्देमाल** :- जलद नाश होणारे व नैसर्गिकरित्या सडणारे मुद्देमाला विषयी न्यायालय फौजदारी दंड प्रक्रीय सहींता कलम 459 प्रमाणे आदेश करु शकते. त्यानुसार कार्यवाही करावी. सदरहु मुद्येमालाचा मालक किंवा हक्कदार सापडत नसल्यास किंवा तो गैरहजर असल्यास त्याचे फौजदारी दंड प्रक्रीय सहींता कलम 452 खाली विक्री व त्याचे निती संबंधीचे न्यायालय आदेश देवु शकते.

# न्यायलयीन प्रक्रीये नंतर मुद्देमाल निर्गती विषयक आवश्यक बाबी

- **मुद्देमाल स्विकार** :- जप्त मुद्देमाल दोषारोपासह न्यायालयात पाठविणे व तो न्यायालयात त्यावेळी स्विकारणे आवश्यक आहे.
- **कोर्ट निकाल व समरी हस्तगती नंतरची कार्यवाही** :- कोर्ट निकाल सम-या व अकस्मात मृत्युची अंतिम समरी आलेनंतर त्याची क्राईम रजिस्टरी नोंद झाल्यानंतर त्या संबधी मुद्देमाल कारकुन यांचेकडे येणे आवश्यक असते. परंतु निकाल सम-या कारकुन यांना न मिळाल्याने जप्त मुद्देमालाबाबत काय आदेश झाला आहे याची माहिती होत नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा तसाच प्रलंबित राहतो. व यामुळचे ब-याच जुन्या नोंदीतील माल पोलीस ठाणेकडे प्रलंबित राहिलेला आहे. तरी क्राईम काम करणारे कर्मचा-याचीशी समन्वय ठेवुन अशा त्रुटी न राहणेची खबरदारी घ्यावी
- **फिर्यादी वारस/नातलग यांना मुद्देमाल परत करणेची पध्दत** :- ब-याचशा गुन्हयातील जप्त मुद्देमाल हा कोर्टातुन बॉण्डवर परत ताब्यात मिळविता येतो. याबाबत कित्येक नागरिकांना माहिती नसते. अशावेळी तपासी अंमलदार यांनी अशा फिर्यादीना कोर्टाकडुन आदेश घेवुन मुद्देमाल परत ताब्यात मिळणेबाबत मार्गदर्शन करावे. कित्येक फिर्यादीना जरी याबाबत माहिती असली तरी कोर्ट प्रोसिजर, त्यासाठी लागणारा वेळ व खर्च लक्षात घेवुन फिर्यादीने मुद्देमाल नेणेबाबत पाठपुरावा करावा व या गोष्टी मुद्देमाल जमा झालेनंतर लागलीच केल्यास त्यामध्ये बराचसा फरक पडू शकतो. या प्रक्रियेस विलंब झाल्यास तो माल केसचा निकाल तपासी अंमलदार यांचे मदतीने मुद्देमालाची निर्गतीबाबत फिर्यादीना वेळीच मार्गदर्शन केलेस मुद्देमालाची निर्गती होणेस मदत होईल.
- **किंमती मुद्देमालाबाबत** :- किंमती मुद्देमालाबाबत प्रभारी अधिकारी यांनी स्वतः न्यायालयास भेटुन विनंती केलेस कोर्टाकडून किंमती मुद्देमाल स्विकारला जातो. तरी त्या दृष्टीने पाठपुरावा करणेत यावा.
- **दारुबंदीतील मुद्देमाल** :- दारुबंदीचे मालाबाबत वेळचेवळी लिलाव आदेश प्राप्त करुन घेवुन निर्गती करता येते. त्याकरीता वेळचेवेळी न्यायालयास अहवाल सादर करुन आदेश प्राप्त करुन घेणेत यावेत.
- **जुगारातील मुद्देमाल** :- जुगार कायदयाखालील जप्त रोख रक्कम वेळचेवेळी चलनाने बँक/ ट्रेझरीत भरणा करणे आवश्यक आहे.
- बेवारस वस्तु :- बेवारस मिळालेल्या वस्तुची योग्य तजबिजीने निर्गती करणे आवश्यक आहे.

- **अ.मु.समरी** :- वेळचेवळी निकाल समरी कोर्टातुन प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच अकस्मात समरी मिळविणे क्रमप्राप्त आहे.
- **कोर्ट समरी** :- प्रलंबित जुन्या मुद्देमालाचे निर्गतीबाबत खास मोहीम राबवुन कोर्टाकडुन समऱ्या हस्तगत करुन आदेशाप्रमाणे संबंधीतांचा ठावठिकाणांचा शोध घेवुन पत्ता शोधुन मुद्देमालाची निर्गती करणे आवश्यक आहे.
- **रेकॉर्ड नसलेला मुद्देमाल** :- पोलीस ठाणेकडे भाग 5 गुन्हयांतील, प्रोव्हीबिशन गुन्हयातील, शस्त्र अधिनियम गुन्हयातील बेवारस, स्टेशन डायरी इंट्री केलेला मुद्देमाल, काहीच रेकॉर्ड न मिळून आलेला मुद्देमाल, स्फोटके, अंमली पदार्थ, शस्त्रात्रे, अग्नीशस्त्र अशाप्रकारचा बराच मुद्देमाल विनातजवीजीने पोलीस ठाणेमध्ये निर्गतीसाठी प्रलंबित आहे. त्या बाबत न्यायलयात पाठपुरावा करुन त्याची न्यायलयीन आदेशाप्रमाणे निर्गती करावी.
- **गुन्हयात वापरलेली वाहने** :- आरोपीत हे गुन्हा करताना सर्रास वाहनाचा वापर करीत असतात अशी वाहने आरोपीतांना अटक केलेनंतर त्यांचेकडून जप्त करुन पोलीस ठाणेचे आवारामध्ये तशीच विनातजवीजीने पडून राहतात. पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी अशाप्रकारे पोलीस ठाणे आवारामध्ये पडून असलेली वाहनाचे बाबत सदरची वाहने आरोपीत यांचे नावावर आहेत अगर कसे याबाबत खातरजमा करावी. तसेच सदरची वाहने आरोपीत यांचे नातेवाईक अगर मित्रमंडळी यांचे नावावर असतील तर सदरची वाहने संबंधीतांना परत देणेसाठी संबंधीत नातेवाईक अगर मित्रमंडळी यांना बोलावून घेवून त्यांना कोर्टामध्ये रितसर अर्ज करणेस लावून त्याबाबत आपणाकडून ना हरकत दाखला मा. कोर्टास सादर करुन मा. कोर्टाकडून सदर वाहनांचे बाबत आदेश प्राप्त करुन घेवून सदरची वाहने मा. कोर्टाचे आदेशाप्रमाणे संबंधीतांना योग्य त्या बॉण्ड तसेच अटीवर परत दयावीत.
- **बेवारस वाहने** :- बेवारस वाहनांची यादी तयार करुन प्रादेशीक परिवहन कार्यालयातून सदर वाहनाचे इंजिन नंबर, चेसी नंबरचे आधारे वाहनांचे मुळ मालक तसेच त्यांचे नांव व पत्त मिळवून त्या आधारे मालकांचा शोध घ्यावा. तसेच सदरहू मालकांना बोलावून घेवून गाडीचे कागदपत्रांची पाहणी करुन सदरहू वाहन मालकांना मा. कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे रिसतर अर्ज करणेस सांगुन त्याबाबत ना हरकत दाखला दयावा. मा. कार्यकारी दंडाधिकारी यांची परवानगी घेवून सदरहू वाहन संबंधीत मालकास अटी व बॉन्डचे अधीन राहून देणेत यावेत. तसेच ज्या वाहनांचे बाबत मुळ मालक मिळून येत नाहीत त्यासाठी आपण काय काय प्रयत्न केले याबाबतचा सविस्तर अहवाल मा. कार्यकारी दंडाधिकारी यांना पाठवून मोटार सायकल, चार चाकी वाहने, सहा चाकी वाहने यांचा लिलाव करणेबाबतची परवानगी घेवून सदरहू वाहनांचा लिलाव करुन येणारी रक्कम कोषागारात भरणा करावी.

- **महीला अत्याचारातील मुद्देमाल** :- महिला अत्याचाराचे गुन्हयातील स्त्रीधन तसेच चेन स्नॅचिंगचे गुन्हे, घरफोडी, ज्वेलरी शॉप, अशा गुन्हयामधील जप्त असलेले सोन्याचे दागिनेबाबत संबंधीतांना बोलावून घेवून दागिन्यांची खातरजमा करुन संबंधीतांना कोर्टामध्ये रितसर अर्ज करणेस सांगून व त्याबाबत आपला ना हरकत देवून सदर मुद्देमालाबाबत मा. कोर्टाची परवानगी घेवून सदरचा मुद्येमाल मा. कोर्टाचे आदेशाप्रमाणे अटी व योग्य त्या बाँडवर परत करण्यात यावा.
- **प्रोव्हीबिशन गुन्हयातील मुद्देमाल** :- प्रोव्हीबिशन गुन्हयांतील प्रलंबित असलेला मुद्देमालमुळे पोलीस ठाणेच्या आवारामध्ये दुर्गंधी पसरुन पोलीस ठाणेचे वातावरण दुषीत बनते. प्रोव्हीबिशन गुन्हयांमधील मुद्देमालाचे बाबत सॅम्पल व्यतिरिक्त इतर सर्व मुद्देमाल नाश करणेसाठी मा. कोर्टाची परवानगी घ्यावी तसेच मुद्येमाल मध्ये देशी व विदेशी दारुच्या बाटल्या असतील तर त्याचीदेखील मा. कोर्टाची परवानगी घेवून सदरचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे वर्ग करावा त्यांचे मार्फतीने लिलाव करुन येणारी रक्कम कोषागारात जमा करावी.
- **इतर बेवारस मुद्देमाल** :- पोलीस ठाणेकडील बेवारस स्वरुपात पडून असलेल्या इतर मुद्देमालाची यादी बनवून सदरची यादी मा. तहसीलदार यांना अहवालासह सादर करावी. मा. तहसीलदार यांचेकडून सदर बेवारस मुद्देमाल बाबत लिलावाची मंजूरी घेवून लिलावाबाबतची प्रक्रिया रितसर करुन येणारी रक्कम कोषागारात जमा करावी.
- **स्टेशन डायरीत नोंद करुन जप्त केलेला बेवारस मुद्देमाल** :- स्टेशन डायरीमध्ये नोंद करुन पोलीस ठाणेच्या आवारामध्ये पडून असलेला मुद्देमालबाबत सुध्दा वरीलप्रमाणे कार्यवाही करणेची आहे. तसेच ज्या मुद्यमालाबाबत पोलीस ठाणेकडे काहीच नोंदी नाहीत परंतू असा मुद्येमाल पोलीस ठाणे आवारामध्ये पडून आहे याबाबत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी सदरचा मुद्देमाल कोणत्या केसमधील आहे अगर कसे याबाबत स्वतः खातरजमा करावी व सदरचा मुद्येमाल गुन्हयांतील अगर इतर कोणत्याही प्रकरणामधील नसलेबाबत पोलीस कारकून यांचा अहवाल / रिपोर्ट घेवून सदरचा मुद्देमाल पोलीस पत्रक मध्ये तसेच वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दीस देण्यात यावा. सदर मुद्येमालबाबत मुळ माल मिळून न आल्यास संबंधीत मुद्येमालबाबत नोटीस प्रसिध्द करुन तसेच नोटीस प्रसिध्दी केलेनंतर देखील 15 दिवसासचे आत सदर मुद्देमालावर दावा करुन सदरचा मुद्देमाल त्याचे मालकीचा आहे हे सिध्द न करुन शकल्यास सदर मुद्देमालबाबत मा. कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडून मुद्देमाल बेवारस आहे असे समजून व घोषीत करुन पुढील कार्यवाहीबाबत मंजूरी घेवून सदर मुद्देमालचा लिलाव करुन येणारी रक्कम कोषागारात जमा करावी.

- **स्पोटक मुद्देमाल** :- पोलीस ठाणेकडे जिलेटीन कांडया, डेटोनेटर, शोभेची दारु त्याचबरोबर स्फोटक स्वरुपाचे केमिकल व गॅस अशा प्रकारचा मुद्देमाल पोलीस ठाणेकडे जमा होत असतो. त्यामध्ये जिलेटीन, डेटोनेटर, शोभेची दारु हे अत्यंत ज्वालाग्रही असून तो सुरक्षीतपणे ताब्यात घेणे आवश्यक आहे. तसेच अशाप्रकारची स्फोटके वाहतूक करण्याचा परवानाधारक वाहनांकडून विस्फोटक निरीक्षक यांचेकडे पाठवून त्याची योग्यरितीने विल्हेवाट लावणे आवश्यक असते. या संदर्भात स्फोटक पदार्थाचा नमुना पुरावाकामी घेवून सदरचे स्फोटक तात्काळ तज्ञांकडे वेळीच पाठवून त्याबाबत लवकरात लवकर अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत, जेणेकरुन इतर स्फोटक मुद्देमाल हा मा. कोर्टाचे परवानगीने विस्फोटक निरीक्षक यांचेकडे पाठवून विल्हेवाट सुरक्षितपणे लावणे शक्य होईल.
- **गॅस सिलेंडर** :- तसेच ब-याच गुन्हयांमध्ये गॅस सिलेंडर देखील जप्त करण्यात येतात. अशा प्रकारचे जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर पोलीस ठाणेचे आवारामध्ये पडून असलेचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत मा. कोर्टाचे परवानगीने सुरक्षीततेच्या दृष्टीकोणातून गॅस कंपनीचे अधिकारी यांचे समक्ष व मार्गदर्शनाखाली जप्त करण्यात आलेल्या गॅस सिलेंडरमधील गॅस मा. कोर्टाचे परवानगीने हवेत सोडून दयावा. तसेच मोठया प्रमाणात गॅस साठा असल्यास मा. कोर्टाच्या परवानगीने संबंधीत गॅस / केमिकल कंपनीला त्याची सुरक्षितपणे विल्हेवाट लावण्याचे आदेश प्राप्त करुन दयावेत.
- **केमीकल** :- एखादया गुन्हयांमध्ये केमिकल जप्त करण्यात आले असल्यास अशा प्रकारचे केमिकल हे चांगल्या प्रतीचे व उच्च किमतीचे असल्यास त्यामध्ये मा. कोर्टाचे आदेश घेवून संबंधीत कंपनीचे अधिकारी यांचे सहकार्याने त्याची लिलावाने अथवा बाजारभावाप्रमाणे विक्री करुन येणारी रक्कम कोषागारात जमा करावी.
- **आमली पदार्थ** :- अंमली पदार्थ यामध्ये ओला गांजा, सुका गांजा, चरस, अफू, कोकीन, ब्राऊन शुगर, एल,एस.डी या स्वरुपात किंवा मॅन्ड्रक्स ॲबलेट्स, तसेच एन.डी.पी.एस. कायद्यातील प्रतिबंधीत ड्रग्ज मिळून आलेस तेही पोलीस ठाणेस मुद्देमालकामी जप्त केले जातात. एन.डी.पी.एस. हा मुद्देमाल अत्यत धोकादायक तसेच बहुमुल्य किंमतीचा असलेने त्याची सुरक्षा व विल्हेवाट लावणे जोखमीचे काम आहे. त्याकरीता गुन्हा दाखल झालेनंतर त्याचे सॅम्पल तातडीने तज्ञांकडे अभिप्रायाकरीता पाठवावे व उर्वरीत मुद्देमाल हा मा. कोर्टाचे विहीत पद्धतीनूसार पोलीस अधीक्षक यांच्या कमिटी समक्ष जाळून नष्ट करावा.
- **देशी/विदेशी/ॲन्टीक बनावटीची अग्नीशस्त्रे** :- विविध गुन्हयामध्ये परदेशी बनावटीचे तसेच देशी बनावटीचे अग्नीशस्त्रांचा वापर केलेने ती जप्त केली जातात. त्यामध्ये देशील काही ॲन्टीक किंवा क्लासिक स्वरुपाची अग्नीशस्त्रे जप्त केली जातात. अशाप्रकारे जुनी / पुरातून काळातील जप्त करण्यात आलेली अग्नीशस्त्रे मा. कोर्टाची परवानगी घेवून पोलीस किंवा

सरकारी वस्तुसंग्रहालय या ठिकाणी पाठवून दयावीत. अग्नीशस्त्रे परदेशी बनावटीचे असतील व सदरची शस्त्रे सुस्थितीत असतील तर सदरची शस्त्रे शासन जमा करणेसाठी मा. कोर्टाची परवानगी घ्यावी.

- **कोर्ट निकालानंतरची अग्नीशस्त्रे** :- देशी बनावटीचे बंदूक व कटटे संबंधीत केसचा निकाल झालेनंतर त्याबाबत मा. कोर्टाची परवानगी घेवून सदरची हत्यारे रोड रोलरखालील टाकून मोडून टाकावीत. तसेच त्यांचा पंचनामा व व्हिडीओग्राफी करुन कोर्टास अहवाल द्यावा. जेणेकरुन सदरची हत्यारे पुन्हा हत्यार म्हणून वापर करता येणार नाहीत. रोड रोलर फिरविलेनंतर सदर हत्यारामधून राहणारे स्क्रैप मेटलची लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम कोषागरात जमा करावी.

# मुद्देमाला संबधी फौजदारी दंड प्रक्रिया संहीता अन्वये तरतुदी

- **कलम** 91 :- दस्तऐवज किंवा अन्य वस्तु हजर करणे.
- **कलम** 92 :- पोस्टातील तारा, पजे मिळविण्यासाठी प्रक्रिया
- **कलम** 93 :- झडती वारंट संबंधी.
- **कलम** 94 :- जेथे चोरीची मालमत्ता, बनावट दस्तऐवज वगैरे असल्याची जागेची झडती .
- **कलम** 95 :- विवक्षीत प्रकाराने जप्त करणे, घोषित करणे
- **कलम** 100 :- बंदीस्त जागेची झडती..
- **कलम** 101 :- अधिकार क्षेत्रापलीकडील झडती, वस्तुंची विल्हेवाट
- **कलम** 102 :- विवक्षीत मालमत्ता ताब्यात घेण्याचा पोलीस अधिका-याचा अधिकार.
- **कलम** 104 :- हजर केलेला दस्तऐवज जप्त करण्याचा अधिकार.
- **कलम** 451. :- विवक्षित खटल्यामध्ये संपरीक्षा प्रलंबित असेपर्यंत मालमत्तेच्या अभिरक्षेचा व विल्हेवाटीचा आदेश जेव्हा कोणत्याही चौकशीत किंवा संपरीक्षेत फौजदारी न्यायालयासमोर कोणतीही मालमत्ता हजर केली जाईल तेव्हा, न्यायालय चौकशी किंवा संपरीक्षा समाप्त होईपर्यंत अशा मालमत्तेच्या योग्य अभिरक्षेसाठी त्याला योग्य वाटेल असा आदेश देवू शकेल व जर मालमत्ता लवकर व स्वभावतः खराब होण्यासारखी असेल अगर तिची विक्री किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट करणे समयोचित असेल तर, न्यायालय त्याला जरुर वाटेल असा पुरावा नोंदवल्यानंतर, तशी विक्री किंवा विल्हेवाट कण्याचा आदेश देवू शकेल.

  स्पष्टीकरण क- न्यायालयासमोर हजर केली असेल किंवा ख- जिच्या संबंधात अपराध करण्यात आल्याचे त्याच्या अभिरक्षेत असेल अशी कोणत्याही | दिसत असेल किंवा जी कोणताही अपराध प्रकारची मालमत्ता किंवा दस्तऐवज करण्यासाठी वापरण्यात आल्याचे दिसत असेल अशी कोणतीही मालमत्ता समाविष्ठ आहे.
- **कलम** 452 :- संपरीक्षेच्या अखेरीस मालमत्तेच्या विल्हेवाटीचा आदेश 1- जेव्हा कोणत्याही फौजदारी न्यायालयातील चौकशी किंवा संपरीक्षा समाप्त होईल तेव्हा, त्याच्यासमोर हजर करण्यात आलेल्या किंवा त्याच्या अभिरक्षेत असलेल्या किंवा ज्यासंबंधात कोणताही अपराध करण्यात आल्याचे दिसत असेल अशा किंवा कोणताही अपराध करण्यासाठी वापरण्यात आलेल्या अशा कोणत्याही मालमत्तेच्या किंवा दस्तऐवजाचा नाश करुन, अधिहरण करुन किंवा त्याच्या कब्जास हक्कदार असल्याचा दावा सांगणा-या

कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करुन किंवा अन्य काहीतरी करुन विल्हेवाट करण्यासाठी न्यायालय स्वतला योग्य वाटेल असा आदेश देवू शकेल.

2. कोणतीही मालमत्ता तिच्या कब्जास हक्कदार असल्याचा दावा सांगणा-या कोणत्याही | व्यक्तीकडे सुपूर्द करण्सासाठी पोटकलम 1 खाली बिनशर्त अथवा पोटकलम (1) खाली दिलेला आदेश अपीलान्ती किंवा पुनरीक्षणान्ती आपरिवर्तित करण्यात किंवा रद्य ठरवण्यात आल्यास अशी मालमत्ता न्यायालयाकडे परत करण्यास वचनबध्द करणारे, न्यायालयाच्या समाधानापुरेसे बंधपत्र जामीनदारांसह किंवा त्याच्याविना तिने निष्पादित करुन द्यावे अशा शर्तीवर देता येईल

3- सत्र न्यायालय स्वत: पोटकलम (T) खाली आदेश देण्याऐवजी मुख्य न्यायदंडाधिकारी-याकडे मालमत्ता सुपूर्द करण्याचा निदेश देवू शकेल व तो त्यावर कलमे 457,458 व 459 यांमध्ये उपबंधीत केलेल्या रितीने त्याबाबत कार्यवाही करील.

4- जर मालमत्ता जीवधनाच्या (पाळीव पशुपक्षांच्या) रुपात असेल किंवा लवकर व निसर्गतः खराब होण्यासारखी असेल तर किंवा जर पोटकलम (2) च्या अनुरोधाने बंधपत्र निष्पादित करण्यात आले असेल तर ती बाब खेरीजकरुन एरव्ही, पोटकलम (1) खाली दिलेला आदेश दोन महिन्यापर्यंत किंवा अपील सादर केल्यास अशा अपीलाचा निकाल होईपर्यंत तामील केला जाणार नाही.

5- या कलमात मालमत्ता या संज्ञेत, जिच्या संबंधात अपराध करण्यात आला असल्याचे दिसत असेल तिच्या बाबतीत, मुळात जी कोणत्याही पक्षाच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली होती अशाच मालमत्तेचा नव्हे तर, तिचे ज्यात रुपांतर केले गेले किंवा तिची जिच्याशी अदलाबदल केली गेली अशा कोणत्याही मालमत्तेचा व अशा रुपांतरातून किंवा अदलाबदलीतून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जे काही प्राप्त झाले असेल त्याचा समावेश आहे.

- **कलम** 453 :- आरोपीकडे सापडलेला पैसा निर्दोष खरेदीदाराला देणे.. :- चोरी करणे किंवा चोरीची मालमत्ता स्वीकारणे हे ज्या अपराधात समाविष्ठ आहे किंवा जो अपराध त्या सदरात मोडतो अशा कोणत्याही अपराधाबद्यल जेव्हा एखाद्या व्यक्तीला सिध्ददोष ठरवण्यात आले असेल व ती चोरीच्या मालमत्ता असल्याचे माहित नसतांना किंवा तसे समजण्यास कारण नसताना तिच्याकडून अन्य कोणत्याही व्यक्तीने ती मालमत्ता विकत घेतली असून, सिध्ददोष व्यक्तीच्या अटकेनंतर काही पैसा तिच्या कब्जातून घेण्यात आला आहे. असे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा, अशा खरेदीदाराचा अर्ज आल्यास व चोरीच्या मालमत्तेच्या कब्जास हक्कदार असलेल्या व्यक्तीला ती परत मिळाल्यावर, न्यायालय अशा खरेदीदाराने दिलेल्या किमतीहून अधिक नाही इतकी रक्कम अशा पैशातून त्याला देण्यात यावी असा आदेश देवू शकेल.

- **कलम 454** :- कलम 452 किंवा कलम 453 खालील आदेशांविरुध्द अपील 1- कलम 452 किंवा कलम 453 खाली एखाद्या न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा पुर्वोक्त न्यायालयाने केलेल्या दोषसिध्दींवर सर्वसामान्यापणे ज्या न्यायालयाकडे अपिले होवू शकतात त्याच्याकडे त्या आदेशाविरुध्द अपील करता येईल.
  2- असे अपील करण्यात आल्यास अपील न्यायालय अपिलाचा निकाल होईपर्यंत आदेश स्थगित करण्याचा निदेश देवून शकेल किंवा आदेशात आपरिवर्तन अगर फेरबदल करुन शकेल किंवा आदेश शून्य करुन न्याय्य असतील असे आणखी आदेश देवू शकेल.
  3- पोटकलम 2- मध्ये निर्दिष्ठ केलेले अधिकार अपिलाच्या, कायमीरकणाच्या किंवा पुनरीक्षणाच्या न्यायालयालाही पोटकलम 1 मध्ये निर्दिष्ट केलेला आदेश ज्या खटल्यात दिलेला होता त्याचे काम पाहतांना वापरता येतील.
- **कलम 455** :- बदनामीकारक व अन्य प्रकारचे साहित्य नष्ट करणे. 1- भारतीय दंड संहिता (1860 चा 45) कलम 292, कलम 293, कलम 501 किंवा कलम 502 खाली दोषसिध्दी केल्यावर न्यायालय, ज्याच्याबाबत दोषसिध्दी झाली त्या वस्तूच्या नकला न्यायालयाच्या अभिरक्षेत असतील किंवा सिध्ददोष ठरलेल्या व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली राहिल्या असतील त्या सर्व नकला नष्ट करण्याचा आदेश देवू शकेल.
  2- भारतीय दंड संहिता (1860 चा 45) कलम 272,273,274 किंवा 275 खाली दोषसिध्दी केल्यावर, न्यायलय त्याच रीतीने, ज्याच्याबाबत दोषसिध्दी झाली तो अन्नपदार्थ पेय, औषधिद्रव्य किंवा वैद्यकीय सिध्दपदार्थ नष्ट करण्याचा आदेश देवू शकेल.
- **कलम 456** :- स्थावर मालमत्तेचा कब्जा परत देण्याचा अधिकार 1- जेव्हा फौजदारीपात्र बलप्रयोग किंवा बलप्रदर्शन अथवा फौजदारीपात्र धाकदपटशा याचा अवलंब करुन केलेल्या अपराधाबद्यल एखादया व्यक्तीला सिध्ददोष ठरवले असेल आणि अशा बलप्रयोगाने किंवा बलप्रदर्शनाने अथवा धाकदपटशाने कोणत्याही व्यक्तीकडून कोणत्याही स्थावर मालमत्तेचा कब्जा काढून घेतला गेला आहे असे न्यायालयाला दिसून आले तर, न्यायालयाला योग्य वाटल्यास मालमत्ता जिच्या कब्जात असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला जरुन तर बळाने शिष्कासित करुन पहिल्या व्यक्तीकडे त्या मालमत्तेचा कब्जा परत द्यावा असे आदेश देवू शकेल. 2- त्या अपराधाची संपरीक्षा करणा-या न्यायालयाने पोटकलम 1 खाली आदेश दिलेला नेसल त्याबाबतीत, अपिलाचे कायमीकरणाचे किंवा पुनरीक्षणाचे न्यायालय अपिलाचा, निर्देशनाचा किंवा प्रकरणपरत्वे, पुनरीक्षणाचा निकाल करताना स्वतःला योग्य वाटले तर असा आदेश देवू शकेल । 3- पोटकलम 1 खाली आदेश देण्यात आलेला असेल त्याबाबतीत कलम 454 चे उपबंध कलम 453 खालील आदेशाच्या संबंधात जसे लागू होतात तसे ते या आदेशाच्या संबंधात लागू असतील. 4- या कलमाखाली दिलेला कोणताही

आदेश, कोणत्याही व्यक्तीला अशा स्थावर मालमत्तेवरील किंवा तिच्यातील जो कोणताही हक्क किंवा हितसंबंध दिवाणी दाव्यात प्रस्थापित करता येईल त्यास बाधा आणणार नाही.

- **कलम** 457 :- मालमत्तेच्या अभिग्रहण केल्यावर पोलीसांनी अवलंबिण्याची | प्रक्रिया 1. जेव्हाकेव्हा कोणत्याही पोलीस अधिका-याने मालमत्तेचे अभिग्रहण केल्याचे वृत्त या संहितेच्या उपबंधाखाली दंडाधिका-याला कळवण्यात आले असेल व चौकशीत किंवा संपरीक्षेत अशी मालमत्ता फौजदारी न्यायालयासमोर आणली गेली नसेल तेव्हा, अशा मालमत्तेची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असेलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे तिची सुपूर्दगी करणे याबाबत अथवा अशी व्यक्ती कोण यांविषयी खातरजमा करता येत नसेल तर अशी मालमत्ता अभिरक्षेत ठेवणे व हजर करणे याबाबत दंडाधिकारी स्वत:ला योग्य वाटेल असा आदेश देवू शकेल.

  2- अशी हक्कदार असलेली व्यक्ती ज्ञात असल्यास, दंडाधिकारी स्वत:ला योग्य वाटतील अशा शर्तीवर त्या व्यक्तीकडे मालमत्ता सुपूर्द करण्याचा आदेश देवू शकेल व जर अशी व्यक्ती अज्ञात असेल तर दंडाधिकारी ती मालमत्ता अडकवून ठेवू शकेल व अशा बाबतीत ज्या वस्तू मिळून अशी मालमत्ता बनली असेल त्या विनिर्दिष्ट करणारी उदघोषणा काढील व मालमत्तेवर मागणी हक्क सांगणा-या व्यक्तीने अशा उदघोषणेच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपणांसमोर उपस्थित होवून स्वतःचा मागणीहक्क शाबीत करावा असे त्या उदघोषणाव्दारे फर्माविल.

- **कलम** 458 :- जेव्हा सहा महिन्यांत कोणीही मागणीदार उपस्थित होत नाही त्याबाबतीतील प्रक्रिया

  1- जर अशा कालावधीत कोणत्याही व्यक्तीने अशा मालमत्तेवर आपला मागणीहक्क शाबीत केला नसेल व अशी मालमत्ता जिच्या कब्जात सापडली ती व्यक्ती आपणांस ती मालमत्ता वैध रीतीने प्राप्त झाली हे दाखवून देण्यास असमर्थ असेत तर, दंडाधिकारी आदेशाव्दारे असे निदेशित करुन शकेल की, अशी मालमत्ता राज्य शासनाच्या स्वाधीन राहील व राज्य शासन ती विकू शकेल व अशा विक्रीपासून मिळणा-या उत्पनाचा विनियोग विहीत करण्यात येईल अशा रीतीने केला जावा.

  2- अशा कोणत्याही आदेशावरील अपील दंडाधिका-याने केलेल्या दोषसिध्दींवर सर्वसामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपिल होवू शकतात त्याच्याकडे होवू शकेल.

- **कलम** 459 :- नाशवंत मालमत्तेची विक्री करण्याचा अधिकार अशा मालमत्तेच्या कब्जास हक्कदार असलेली व्यक्ती अज्ञात किंवा अनुपस्थित असून मालमत्ता लवकर व निसर्गत: खराब होण्यासारखी असेल तर, अथवा ज्या दंडाधिका-याला तिच्या अभिग्रहणाचे वृत्त कळवण्यात आले त्याच्या मते तीची विक्री मालकाला फायदेशिर ठरण्यासारखी असेल किंवा अशा मालमत्तेचे मुल्य (पाचशे) रुपयाहून कमी असेल तर, दंडाधिकारी कोणत्याही वेळी

तिच्या विक्रीचा निदेश देवू शकेल आणि कलम 457 व 458 यांचा उपबंध अशा विक्रीपासूनच्या निव्वळ उत्पन्नाला व्यवहार्थ असेल तितपत जसेच्या तसे लागू होतील.

# मुद्देमाला बाबत महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये तरतुदी

- **कलम 82 :- हक्क न सांगितलेली मालमत्ता पोलिसांनी ताब्यात घेणे :-**

पोलीस - अ) त्यांना सापडलेल्या किंवा त्याच्या स्वाधीन केलेल्या दावा न सांगितलेल्या सर्व मालमत्तेचा व त्याचप्रमाणे,

ब) जी कोणतीही मालमत्ता सार्वजनिक रस्त्यावर असेलीली आढळून येईल ती मालमत्ता काढून नेण्याविषयी तिच्या मालकास किंवा ती स्वाधीन असलेल्या व्यक्तीस निदेश देण्यात आला असताही, ती ती मालमत्ता काढून नेण्याचे नाकारील किंवा तसे करण्यास चुकेल तर सर्व मालमत्तेचा तात्पुरता प्रभार घेईल.

2) (ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली आहे अशा कोणत्याही क्षेत्रात) ज्या मालमत्तेचा पोलिसांनी पोट-कलम (1) अन्वये प्रभार घेतला असेल ती मालमत्ता आयुक्तांच्या हवाली करण्यात येईल.

1. **कलम 83 :- चारशे रुपयाहून कमी किंमतीची विनामृत्युपत्र मालमत्ता**

1) (आयुक्ताच्या कोणत्याही क्षेत्रात जर कलम 82 मध्ये उल्लेख केलेल्या स्वरुपाची कोणतीही मालमत्ता मृत्युपत्र न करता मरण पावलेल्या व्यक्तीने मागे ठेवलेली असून ती चारशे रुपयाहून कमी किंमतीची नाही असे आढळून आले तर, आयुक्त महाप्रशासक अधिनियम, 1913 याच्या किंवा त्या वेळी अमलात असलेल्या इतर विधींच्या उपबंधान्वये तिची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने महाप्रशासक यास कळवील.

2) (आयुक्ताच्या प्रमाराबाहेरील क्षेत्रात) मालमत्ता ज्या नगरात किंवा गावात ती आढळून आली असेल त्या नगराच्या किंवा गावाच्या, पोलीस पाटलाच्या, कोणताही असल्यास, स्वाधीन करण्यात येईल आणि त्याबद्दल पोलीस पाटलाकडून पावती घेण्यात येईल आणि पोलीस पाटील, ज्या दंडाधिका-यास तो अधीन असेल त्या दंडाधिका-याकडे अशी मालमत्ता पाठवील. जर अशा कोणत्याही बाबतीत अशा नगराचा किंवा गावाचा पोलीस पाटील नसेल तर, पोलीस त्या जिल्ह्याचा दंडाधिकारी या बाबतीत वेळोवेळी नेमील अशा दंडाधिका-याकडे ताबडतोब प्रतिवृत्त पाठवतील आणि त्यानंतर प्रथम विनिर्दिष्ट केलेला उक्त दंडाधिकारी निदेश देईल त्यानुसार वागतील.

- **कलम 84 :- चारशे रुपयांहून अधिक किमतीची विनामृत्युपत्र मालमत्ता : -**

कलम 83 अन्वये किंवा महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, 1867 याच्या (किंवा मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशात अमलात असलेल्या त्या अधिनियमाच्या कलम 19 अन्वये किंवा सौराष्ट्र ग्राम पोलीस अध्यादेश, 1949 याच्या कलम 21 अन्वये) ज्या मालमत्तेसंबंधी दंडाधिका-याकडे प्रतिवृत्त पाठविण्यात आले ती मालमत्ता मृत्युपत्र न करता मरण पावलेल्या आणि जिचे वारस माहीत नाहीत अशा व्यक्तीची असून ती जाहीर लिलावात विकल्यास तिचे

चारशे रुपयांहून अधिक ठोक उत्पन्न येण्याचा संभव आहे असे जर दंडाधिकाऱ्यास आढळून येईल तर तो सन 1827 चा मुंबई विनियम 8 च्या कलम 10 च्या उपबंधान्वये (वारस इत्यादींस रीतसर मान्यता देण्याकरिता तरतूद करणारा विनियम) किंवा अमलात असलेल्या इतर विधीन्वये तिची व्यवस्था करण्यात येण्याच्या दृष्टीने जिल्हा न्यायाधीशास कळवील.

- **कलम** 85 :- **इतर बाबतीत कामकाजाची पद्धत** :-

1) कलम 83 किंवा 84 यात न बसणाऱ्या कोणत्याही बाबतीत, यथास्थिती, संबंधित आयुक्त 1(अधीक्षक) किंवा दंडाधिकारी एक उद्‌घोषणापत्र काढील व त्य पत्रात, अशी मालमत्ता कोणकोणत्या वस्तूंची मिळून झाली आहे ते विनिर्दिष्ट करील व त्या मालमत्तेवर ज्या कोणत्याही व्यक्तीचा हक्क असेल तिने अशा उद्‌घोषणापत्राच्या तारखेपासून 1(दोन) महिन्याच्या आत आपल्या समक्ष किंवा या बाबतीत तो ज्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यास नियुक्त करील त्याच्या समक्ष उपस्थित राहून आपला हक्क सिद्ध करावा, असे फर्माविल.

2) **नासणारा माल त्वरित विकणे** :- जर ती मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग त्वरित व स्वाभाविकरीत्या लवकर नाश पावणारा असेल किंवा तीत पशुधन असेल तर किंवा ती मालमत्ता (दोन हजार पाचशे रुपयांहून) कमी किमतीची दिसून येत असेल तर, ती यथास्थिती, संबंधित आयुक्ताच्या, 1(अधीक्षकाच्या) किंवा दंडाधिका-याच्या आदेशान्वये ताबडतोब लिलावाने विकण्यात यावी; अशा विक्रीच्या निव्वळ उत्पन्नाची व्यवस्था उक्त मालमत्तेच्या व्यवस्थेसंबंधाने यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीनेच करण्यात येईल.

- **कलम** 86 :- **मालमत्ता, तिच्यावर हक्क असलेल्या व्यक्तीच्या**

- **स्वाधीन करणे** : - 1) यथास्थिती, संबंधित आयुक्त 1(किंवा अधीक्षक) किंवा दंडाधिकारी कलम 85 च्या पोट-कलम (1) अन्वये काढलेल्या उद्‌घोषणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेच्या कब्जाबाबत किंवा वहिवाटीबाबत दावा सांगणाच्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्काबद्दल त्याची खात्री झाल्यानंतर, ती ताब्यात घेण्यासाठी किंवा अटकावून ठेवण्यासाठी पोलिसास योग्य रीतीने आलेला खर्च वजा करुन किंवा तो देण्यात आल्यानंतर ती त्या दावा सांगणाच्या स्वाधीन करावी असा आदेश देईल.

  **तारण घेण्याची शक्ती** :- 2) यथास्थिती, संबंधित आयुक्त 1(किंवा अधीक्षक) किंवा दंडाधिकारी यास, स्वेच्छानिर्णयानुसार पोटकलम (1) अन्वये कोणताही आदेश देण्यापूर्वी, उक्त मालमत्ता ज्या व्यक्तीच्या स्वाधीन करावयाची असेल त्या व्यक्तीकडून त्यास योग्य वाटेल असे तारण घेता येईल आणि असा आदेशान्वये ती मालमत्ता ज्या व्यक्तीच्या स्वाधीन केली असेल त्या व्यक्तीकडून ती सबंध मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग घेण्याबद्दलच्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्कास, यात यापूर्वी असलेल्या कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही.

- **कलम** 87 :- **मालमत्तेवर कोणी दावा (हक्क) न सांगितल्यास ती राज्यशासनाच्या स्वाधीन असणे** :- उद्घोषणात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत कोणत्याही व्यक्तीने अशा मालमत्तेवर आपला हक्क प्रस्थापित केला नाही तर ती राज्य शासनाच्या स्वाधीन होईल व ती मालमत्ता किंवा कलम 85 च्या पोट-कलम (2) अन्वये न विकलेला तिचा भाग, यथास्थिती संबंधित आयुक्ताच्या 2(किंवा अधिक्षकाच्या) किंवा दंडाधिका-याच्या आदेशान्वये लिलावाने विकता येईल.

## किमती मुद्देमालाची सुरक्षितता

- मुद्देमाल रूममध्ये जमा असलेला तसा तर प्रत्येकच मुद्देमाल किमती समजण्यात यावा. गुन्ह्यात जप्त केलेल्या काठ्या, दगड, विटा, सळया, माती यासुद्धा पुराव्याच्या दृष्टीने किमती मुद्देमालच आहेत. किमती मुद्देमालात मुख्यत्वे गुन्ह्यात जप्त केलेले सोने चांदी, रुपये यांची विशेष सुरक्षितता बाळगणे महत्त्वाचे आहे. जप्त केलेले सोने, चांदी हे सराफ असोशिएशनचे चेअरमन, मेंबर यांचेकडून वजनकाटा करुन व्ह्यूल्युएबल सर्टिफिकेट घ्यावे. त्यात वजन व किंमत नमुद असते. व ते पंचांच्या उपस्थितीत त्यांच्या सह्यांचे लेबल लावून मुद्देमाल रूमच्या तिजोरीत ठेवावे त्या मुद्देमालावर मुद्देमालाचे वर्णन गु.रु. नं. एम.आर. नं. कोणाकडून व कोठून जप्त केले, फिर्यादीचे, आरोपीचे नाव टाकणे, मुद्देमाल रजिस्टरी नोंद घेऊन मुद्देमाल पावती बनविणे.

  जप्त केलेला मुद्देमाल ज्यावेळी फिर्यादी परत मिळण्यासाठी कोर्टात अर्ज दाखल करतात व कोर्ट सदरचा मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यासाठी आदेश करतात त्यावेळी तो मुद्देमाल फिर्यादीच्या ताब्यात देताना त्याचा आय.डी.पूफ, अ‍ॅड्रेस प्रूफ, फोटो घेऊनच बाँडवर ताब्यात दिला पाहिजे व तसे कोर्टाला कळविले पाहिजे. बेवारस किमती मुद्देमालसुद्धा याच पद्धतीने फिर्यादीस परत करणे.

# जप्त केलेल्या ( मुद्देमालातील) वस्तूंची पॅकिंग, सिलिंग आणि लेबलिंग

**मुद्देमालातील वस्तूंची पॅकिंग, सिलींग व लेबलिंग करतांना घ्यावयाची दक्षता** :- मुद्देमाल म्हणुन जमा केलेल्या वस्तू ह्या योग्यप्रकारे आवेष्ठित करणे. हा फार महत्त्वाचा भाग असतो कारण जमा केलेले भौतिक दुवे महत्त्वाचा पुरावा असतो. त्यात बदल, भेसळ होता कामा नये. त्याकरिता पुढीलप्रमाणे खबरदारी घ्यावी.

- सर्व वस्तू प्रत्येकी स्वतंत्रपणे पॅक कराव्यात, योग्य ते लेबल लावणे.
- एकाच घटनेमधील वस्तू असल्यास त्या स्वतंत्रपणे नंतर मोठ्या खोक्यात अगर लाकडी पेटीत ठेवणे आणि त्याचेवर बाहेरच्या लेबलवर आतील वस्तूंचे वर्णन द्यावे.
- नवीन स्वच्छ बाटल्या, डबे वापरावेत.
- पॅकिंग घट्ट न हालणारे करावे. म्हणजे प्रवासात महत्त्वाचे अवशेष घासले जाणार नाहीत.
- द्रव पदार्थ प्लास्टिक बाटल्यात भरावे.
- जप्त पदार्थ धोकादायक असतील जसे विष, स्फोटके, ॲसिड तर त्यावर योग्य त्या खुणा किंवा स्पष्ट शब्दात नोंद करून ते लेबल लावावे.
- खोका, पेटी यांची वरची बाजू स्पष्टपणे बाण दाखवून निश्चित करावी त्यामुळे खोका उलटासुलटा होणार नाही.
- केस, उडालेल्या गोळ्या, तंतू इ. प्लास्टिकच्या लहान बाटल्यामध्ये बूच लावून भराव्यात.
- रक्ताचे कपडे, ओली माती यासाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये. त्यासाठी ॲल्युमिनियम पॅकेट्स वापरावेत.
- रक्तमिश्रित हत्यारे काळजीपूर्वक पॅक करावीत. डॉक्टरांचा स्वच्छ कापूस त्यासाठी वापरावा.
- बेडशीट, पडदे, ज्यांच्यावर रक्ताचे डाग, वीर्याचे डाग पडलेले असतील ते व्यवस्थित घड्या घालून ॲल्युमिनियम पॅकेट्समध्ये पॅक करणे. घड्या डागावर पडणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- पादत्राणे यांच्यावर जर रक्ताचे डाग असतील तर स्वतंत्रपणे पॅक करावेत व डाग खरडून काढू नयेत.
- गोळ्या औषधे यांना खोक्यातच पॅक करावेत.

# खराब होणाऱ्या मुद्देमालाच्या पॅकिंगच्या पद्धती

- अंगुलीमुद्रा जर जमा केलेल्या असतील तर ते व्यवस्थित स्वतंत्रपणे पॅक करावेत. इतर पदार्थांशी संपर्क येणार नाही हे पाहावे.
- पावलांचे ठसे कापसाच्या गरम कपड्यात बांधणे, ठश्यांवर जास्त दाब पडणार नाही याची काळजी घ्यावी कारण प्लास्टर ऑफ पॅरिस ठसे उचलण्याकरता वापरतात.
- 3) हत्यारांना चिकटलेले केस, तंतू हत्यारासह डॉक्टरांकडील स्वच्छ कापसामध्ये पॅक करावेत.
- रक्ताचे डाग लवकर खराब होतात. याकरिता ते नमुने त्वरित न्यायसहाय्यक प्रयोगशाळेत पाठवावेत.
- द्रवपदार्थ जसे रक्त, लाळ, वीर्य, ओलसर असतील तर त्यांना वाळू द्यावे व नंतर पॅक करावेत. असे डाग जमिनीवर पडले असतील तर आजूबाजूस अर्धा इंच राखून तीन इंच खोलपर्यंत खणून नमुने जमा करावेत आणि तपासणीकरिता पाठवावेत.

**वस्तूचे पॅकिंगचे पोलीस तपासाच्या दृष्टीने महत्त्व** : जप्त केलेली वस्तू सुरक्षित व त्याचे गुणधर्म जसेच्या तसेच राहावेत यासाठी तपासी अंमलदाराने पॅकिंग करताना घ्यावयाची दक्षत :-

- पॅकिंगमुळे किंवा इतर वस्तूंचा पॅकिंग सामानाशी प्रादुर्भाव होऊन त्या वस्तूत भेसळ होणार नाही.
- हालचाल व दणके यामुळे ते खराब होणार नाही.
- ते सांडणार नाही, त्याचे ज्वलन किंवा स्फोट होणार नाही.
- पाठवताना ते प्रवासात गहाळ होणार नाही, या गोष्टीची काळजी घेणे आवश्यक आहे.

**भौतिक दुवे पॅक करताना, सील करताना, पाठवताना पुढील नियम पाळा** :

- वस्तू भरण्यासाठी अगर ठेवण्यासाठी ओले किंवा खराब खोके, डबा वापरू नका. पक्के झाकण किंवा बूच नसलेले डबे, बाटल्या वापरू नका.
- ज्या कंटेनरला विशिष्ट वास आहे किंवा येतो असे वापरू नका.
- विषारी, स्फोटक किंवा अन्य प्रकारच्या पावडर तपासणीसाठी पाठवतांना हलक्या प्रतीची पाकिटे न वापरता चांगल्या प्रकारची टिकाऊ पाकिटे वापरा. पॉलिथीन बॅग वापरा.

- एका वस्तूचा दुस-या वस्तूशी संपर्क येणार नाही व त्यात भेसळही होणार नाही असे पॅकिंग करा.
- अनेक वस्तू एकाच पार्सलमध्ये पॅक न करता प्रत्येक वस्तू स्वतंत्र पॅक करा. काचेच्या बाटल्या पॅक करताना त्या एकमेकांवर आदळून व घर्षणाने फुटणार नाहीत असे पॅकिंग करा.
- बुचावर लाखेने सील करताना बुचावरील लाख ते उघडताना त्या बाटलीत पडेल अशा त-हेने व जास्त प्रमाणात लाखेचा वापर करू नका.
- गुन्ह्याचे ठिकाणी एखादी वस्तू जप्त केलेपासून ती तज्ञाकडे, कोर्टाकडे पोहोचेपावेतो त्या दरम्यान ती कोणाच्या ताब्यात होती याचे रेकॉर्ड ठेवा व ते गहाळ होणार नाही याची काळजी घ्या.
- सील करताना प्रथमपासून शेवटपर्यंत एकाच प्रकारचे लाख व सील वापरा.
- वस्तू जप्त करताना जर ती ओली असेल तर ती कोरडी होऊ द्या.
- स्फोटक पदार्थांचे पॅकिंग करताना ते गळून किंवा इतर अग्निजन्य पदार्थांशी त्यांचा संपर्क येणार नाहीत असे पॅक करा.
- पोस्टाने पाकीट पाठविले जात असेल तर रजिस्टर्ड पोस्ट पोच पावतीने पाठवा व त्याची पावती व मिळाल्याच्या सहीची पावती जपून ठेवा.
- पार्सल सोबतचे प्रस्तावनासह पत्र वेगळ्या पाकिटमध्ये पॅक करून पार्सलवरील सीलचा नमुना त्यात देऊन ते पोस्टाने अगर विशेष माणूस किंवा दूताद्वारे पाठवावे.

**कंट्रोल सॅंपल्स** :- वैज्ञानिक तपासणीकरिता जप्त केलेल्या नमुन्यांशी तुलना करण्याकरिता पुरेसे कंट्रोल सॅंपल्स पाठवावेत.

**नमुने सीलबंद करणे** :- गोळा केलेले नमुने तपासणीकरिता पाठविणेपूर्वी योग्य त्या पद्धतीने सीलबंद करावेत. अधिकृत मोहोर वापरावी. तसेच तपासी अंमलदार, पंच यांच्या सह्या, वेळ, तारीख नमूद करावी.

**लेबल लावणे** : - लेबल म्हणजे ती वस्तू ज्यास ते लावले जाते ते ओळखण्याची एक निशाणी किंवा दुस-यापासून वेगळेपणा दर्शविणारी गोष्ट किंवा त्या वस्तूचा इतिहास, पॅक आणि सील केलेल्या वस्तूवर लेबल लावणे आवश्यक आहे. लेबल हे त्या वस्तू प्रयोगशाळेत तपासतांना अडथळा येईल अशा त-हेने न लावता योग्य ठिकाणी लावावे. अगदी लहान वस्तू असेल तर एखादा खोका किंवा डबा यात वस्तू ठेवून त्या डब्ब्यावर लेबल लावावे.

**लेबलमध्ये काय आवश्यक आहे** :- पोलीस स्टेशनचे नाव व जिल्हा, गुन्हा रजिस्टर क्रमांक व कायद्याची कलमे, जप्त केल्याची तारीख, वेळ, ठिकाण व कोणाकडून जप्त केली, वस्तूचे थोडक्यात वर्णन, जप्त करणा-या अधिका-याचे नाव, हुद्दा व सही, पंचाच्या सह्या,

**मुद्देमाल तपासणी होवुन त्याबाबतचा अहवाला मिळणे बाबतचे मागणीपत्र** :- पुराव्याच्या वस्तू प्रयोगशाळेत अगर तज्ज्ञांकडे पाठविल्यास त्यासोबत तपासणी कशी व कोणत्या बाबतीत पाहिजे, याची मागणी करणारे मागणीपत्र वेगळे पाठवावे. त्याची एक प्रत पुराव्याच्या वस्तूंच्या बासनाचे आत टाकावी. या पत्रात, पो. स्टे. जिल्हा व राज्य, गुन्हा रजि. नं. व कलम, संक्षिप्त तपशील., प्रत्येक बासणातील परीक्षण कोणकोणत्या मुद्यांवर हवे त्याचा खुलासा, (गुन्ह्यातील आरोपानुसार मुद्दे द्यावेत.) 5) तपासी अंमलदाराचे नाव व हुद्दा., सीलचा नमुना ठसा., वाहक कर्मचा-याची ओळख., परीक्षण करण्याची विनंती आणि परीक्षणाचे वेही पाठविलेल्या वस्तूंमधील काही अंश/भाग वापरण्याची अनुमती., कार्यालय प्रमुखाचा शेरा, सही या बाबी असाव्यात.

**प्रयोगशाळेचे कामकाज - पत्रव्यवहार**

मुद्देमाल परीक्षणासंबंधी किंवा तपासणी अहवालाची मागणी करण्यासाठीच्या पत्रामध्ये पोलिस ठाण्याचा अकस्मात मृत्यू रजिस्टर नंबर किंवा गुन्हा रजिस्टर नंबर किंवा स्टेशन डायरी नंबर, मयताचे/ अत्याचारिताचे नाव, व्हिसेरा किंवा मुद्देमाल तपासणीसाठी दाखल केल्याचा अचूक दिनांक, प्रकरण दाखल केलेल्या पोलिसाचा बक्कल नंबर व नाव मुद्देमालाचे वर्णन व मुद्देमाल तपासणीचे स्वरूप इ. स्पष्टपणे नमूद करावे.

**तपासणी झालेल्या मुद्देमालाची मागणी** : - जैविक मुद्देमाल जसे : व्हिसेरा, रक्त, स्टमक वॉश, वांती, लघवी हा विषाचे तपासणीनंतर परत केला जात नाही. अजैविक मुद्देमाल तपासणी झाल्यानंतर प्रकरण प्रतिवेदित केल्यावर किंवा पोलिस ठाण्याकडे तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर पोलिस ठाण्याकडून सही-शिक्का असलेले मुद्देमाल परत मिळण्यासाठीचे विनंतीवजा मागणीपत्र पोलिसांसोबत प्रयोगशाळेकडे पाठविल्यास त्या प्रकरणातील मुद्देमाल पोलिस शिपाई समोर सीलबंद करून त्याचे ताब्यात देऊन पोलिस ठाण्याकडे परत पाठविला जातो. मुद्देमाल मिळाल्याबाबत पोलिसाची सही घेतली जाते व तारखेची नोंद केली जाते. विष तपासणी अहवाल प्रतिवेदित झाल्यावर त्या अहवालाची पहिली प्रत शवचिच्छेदन करणाच्या वैद्यकीय अधिका-याकडे पाठविली जाते व दुसरी प्रत संबंधित पोलिस अधिकारी पोलिस ठाण्याकडे पोस्टाने पाठविली जाते. यासाठी प्रकरणे तपासणीसाठी दाखल करताना पिनकोडसह पोस्टाचा अचूक पत्ता देणे आवश्यक असते. सदर अहवाल पोलिस ठाण्याकडे प्राप्त न झाल्यास किंवा मिळत नसल्यास प्रथम शवविच्छेदन करणा-या अधिका-याकडे चौकशी करावी. ब) अजैविक मुद्देमाल तपासणी करून झाल्यावर तत्संबंधी तपासणी अहवाल त्वरित संबंधित पोलिस ठाण्याकडेच पाठविले जातात.

# मुद्देमाल तपासणीसाठीचा कालावधी

न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये परीक्षणासाठी दाखल केलेल्या प्रकरणांचे अहवाल प्रतिवेदित करण्याचा कालावधी साधारणपणे 2 दिवसापासून ते 6 महिने एवढा असतो. काही प्रकरणांमध्ये अपरिहार्य कारणास्तव हा कालावधी साधारणपणे 1 वर्ष एवढासुद्धा असू शकतो. काही वेळा न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत दाखल करण्यात आलेली बरीच प्रकरणे परीक्षणासाठी घेण्याकरिता प्रलंबित असतात. अशा वेळेस सदर प्रकरणे ही प्रथम क्रमाने म्हणजे प्रथम दाखल झालेली प्रकरणे प्रथम तपासणीसाठी घेतली जातात. तपासणी होताच संबंधित अधिका-यांकडे अहवाल पाठविले जातात.

**महिलांवरील अत्याचार, हुंडाबळी** - खून भारतीय दंड विधान अंतर्गत प्रकरणे प्राधान्य तत्त्वावर तपासणीसाठी घेतली जाऊन प्राधान्याने अहवाल पाठविले जातात सदर प्रकरणांचे अहवाल प्रतिवेदित करण्याचा कालावधी साधारणपणे 1 आठवडा ते 3 महिने एवढा असतो. मा. न्यायालयाचे आदेश, विधान सभा - विधान परीषद येथे चर्चेसाठी घेण्यात येणारे प्रश्न (एल.ए.क्यू.) सामाजिक व सार्वजनिक हित यांचेशी संबंधित प्रश्न तात्काळ तपासणीसाठी घेण्यात येऊन तपासणी अहवाल लवकरात लवकर (1 दिवस ते 1 आठवडा) प्रतिवेदित केले जातात. देशाच्या सुरक्षिततेशी निगडित प्रकरणांमध्ये रात्रंदिवस रासायनिक तपासणीचे काम करून अतितात्काळ अहवाल दिले जातात.
**जीवन - मरणाशी संबंधित प्रकरणे**, - विष बाधा झालेली असल्यास योग्य वैद्यकीय उपचार सुरू करण्यासाठी मार्गदर्शन मिळणेबाबतची प्रकरणे लगेच योग्य वैद्यकीय उपचार सुरू करण्यासाठी मार्गदर्शन मिळणेबाबतची प्रकरणे लगेच तपासणीसाठी घेतली जाऊन काही तासात अहवाल दिले जातात. रक्तातील मद्यार्क : तपासणी प्रकरणे 3 दिवसांचे आत प्रतिवेदित केली जातात.

**गुन्हा तपास अधिकारी लवकर अहवाल मिळणेसाठी** - प्रकरण प्राधान्य तत्त्वावर तपासणीसाठी घेणेकरिता त्यासाठीचे योग्य कारण नमूद करून विनंती अर्ज करू शकतात तथापि त्यासोबत पोलिस अधीक्षक यांचे पत्र किंवा वरिष्ठ पोलिस अधिकारी (पोलिस निरीक्षक यांचेपेक्षा वरच्या हुद्याचे अधिकारी) यांचे पत्र जोडणे आवश्यक असते.

# पोलिस ठाण्यात ठेवलेल्या जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावणे

पोलीस ठाण्यात ठेवलेल्या जप्त मुद्देमालाची ठेवण व विल्हेवाट लावण्याबाबतच्या तरतुदी,

1) भारतीय दंड प्रक्रिया संहिता कलम 451 ते 459 मधील तरतुदी

2) मुंबई पोलीस कायद्याच्या कलम 82 ते 88 मधील तरतुदी

3) मुंबई दारुबंदी कायद्याच्या कलम 100, 101 मधील तरतुदी

4) मुंबई पोलिस नियमावली, भाग 2 नियम क्र. 271 मधील तरतुदी आणि

5) गृह मंत्रालय, मुंबई चे परिपत्रक क्र. के.पी.टी./2266/4746/दारू 3, दि. 15.06.1980 मधील तरतुदी कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

असे निदर्शनास येते की, ब-याच पोलीस ठाण्यामध्ये जप्त मुद्देमाल हा प्रचंड प्रमाणात जमा आहे. मुद्देमाल हा हलगर्जीपणामुळे अस्ताव्यस्त ठेवलेला आहे. या प्रलंबित मुद्देमालाच्या निपटाऱ्याच्या दृष्टीने पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनस्त मुद्देमाल मोहरर, कोर्टात काम करणारे कर्मचारी (कोर्ट वाचर) हे स्वतः लक्ष देवून कसोशिने प्रयत्न करत नाहीत, त्यामुळे बराच मुद्देमाल वाजवी कारण नसतांनाही पोलीस ठाण्यात प्रलंबित आहे.

पोलिस स्टेशनला मुद्देमालाची ठेवण व विल्हेवाट लावणे बाबत मुंबई पोलीस नियमावली भाग-2 नियम 271 मध्ये सविस्तर तरतूद आहे. त्यात लिहीलेल्या सुचनांचा अभ्यास करुन ठाण्यात जप्त मुद्देमालाची ठेवण व विल्हेवाट लावणेबाबत आवश्यक सुचना द्याव्यात.

पोलीस स्टेशनला प्रलंबित मुद्देमालाच्या निपटाऱ्याकरिता खालील नमुद केलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करुन मुद्देमालाची विल्हेवाट करवून घ्यावी. असे अपेक्षीत आहे.

- कोर्टातून लागलेल्या निकालात जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबद्दल ही निर्देश दिलेला असतो. ब-याचशा गुन्ह्याचा निकाल कोर्टातून लागल्याची व जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत कोर्टाने दिलेली निर्देशाची माहिती पोलिस स्टेशनला राहात नाही वा ती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्नही करण्यात येत नाही. तरी पोलीस स्टेशन प्रभारी यांनी कोर्ट वॉचर व त्यांचे मदतकामी आणखी एक कर्मचारी नेमून दररोज कोर्टात पाठवावे. हे कर्मचारी कोर्टातील संबंधित कारकुनाशी व आवश्यकता पडल्यास पोलीस अभियोक्ता यांच्या मार्फतीने संबंधित मॅजीस्ट्रेट यांचेशी संपर्क साधतील व निपटारा झालेले गुन्ह्याच्या निकाल पत्राची पाहणी करुन 1) पो.स्टे. चे नांव, 2) अ.क्र., 3) गुन्हा नंबर, 4) क्रि. केस क्रमांक, 5) तारिख, 6) फिर्यादी/आरोपीचे नांव व पत्ता, 7) कोर्टाचे निर्णयाची तारिख, 8) कोर्टाचे निर्णय, 9) गुन्ह्यात जप्त मालमत्तेच्या विल्हेवाट संबंधाने कोर्टाने दिलेला आदेश अशी माहिती रकान्यात नोंद करतील व संबंधीत ठाणे प्रभारी हे संबंधीत दंडाधिकारी यांना भेटून तक्त्यातील शेवटच्या रकान्यात मुद्देमालाच्या निपटाच्या संबंधात मा. कोर्टाचे आदेश घेतील. या कामी ते सहाय्यक पोलीस अभियोक्ता यांची मदत घेतील कोर्टाचे आदेश प्राप्त करुन प्रलंबित मुद्देमालाचा निपटारा कोर्ट आदेशाप्रमाणे करुन घेतील.

- अकस्मात मृत्यू प्रकरणात सुद्धा वर नमुद केलेली पद्धत अनुसरुन त्यात जप्त मालाचा निपटार करुन घ्यावा.
- दावा न सांगितलेली/बेवारशी मालमत्ता तसेच मृतकाचे शरीरावरील वस्तु/दागिने इत्यादींचे विल्हेवाट संबंधाने मुंबई पोलीस अधिनियम सन 1951 च्या कलम 82 ते 88 यात सविसतर नोंदी आहेत. त्या तरतुदींच्या अधिन राहून बेवारस मालाचा निपटारा करण्यात यावा. बेवारस जप्त मुद्देमाल उदा. सायकली, वाहने इत्यादींचे संबंधात विभागीय पोलीस अधिकारी यांचेकडून रितसर परवानगी घेवुन जाहिरनामा काढून विहीत मुदतीनंतर लिलाव करण्यात यावा व प्राप्त रक्कम सरकार जमा करण्यात यावी.
- दोषारोप पत्र कोर्टात दाखल करतांना गुन्ह्यात जप्त मुद्देमाल कोर्टात जमा करुन घेण्याबाबत कोर्टास विनंती करण्यात यावी. विशेषतः सेशन कमीट खटल्यांचा माल हा कोर्टात दाखल करणेकरीता विशेष प्रयत्न करावे. ब-याच वेळा सेशन खटल्यांचे सुनावणीचे वेळी मुद्देमाल वेळेवर कोर्टात पेश करण्यात येत नाही. त्यामुळे सत्र न्यायाधीश हे नाराजी व्यक्त करतात व अनावश्यक पत्रव्यवहार सुरु होवुन त्यात वेळ वाया जातो. गुन्ह्यातील मुद्देमाल हा पुराव्याचे दृष्टीने महत्वपूर्ण असतो. त्या मुद्देमालाची सुरक्षितता व पुराव्याच्या दृष्टीने त्याचे महत्व हे लक्षात घेवून गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल कोर्टात वेळीच जमा करावा. याबाबत सहाय्यक पोलीस अभियोक्ता यांचे मार्फत कोर्टास विनंती करावी. दोषारोपपत्र दाखल करुन घेताना त्यात नमुद जप्त मुद्देमाला कोर्टात दाखल करुन घेणे ही बाब कायदेशीर व आवश्यक आहे, असे कोर्टाचे निदर्शनास आणून द्यावे.
- ज्वलनशील व लवकर खराब होणाच्या मुद्देमालाबाबत संबंधित कोर्टातून त्वरीत अज्ञादेश । घेवून तो माल सुपूर्दनाम्यावर द्यावा किंवा नाश करावा.
- चोरी किंवा इतर गुन्ह्यात जप्त सायकली, मोटर सायकली यांचे मालकांशी त्वरीत संपर्क साधून त्यांना वाहने सुपूर्दनाम्यावर घेवून जाण्यास प्रेरित करावे.
- केरोसीन, पेट्रोल, डिझेल, नाफ्त व इतर ज्वलनशील रासायनिक पदार्थाची जिल्हाधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून त्यांचे मार्फतीने विल्हेवाट करुन घ्यावी.
- गृह मंत्रालयाचे परिपत्रक क्र. के.पी.टी./2266/4746/दारु-3, दि. 15.06.1980 मधील तरतूदी प्रमाणे तसेच मुंबई दारुबंदी कायदा सन 1949 व कलम 100 व 101 मध्ये नमुद केल्याप्रमाणे 1,000/-रु. चे किंमतीचे आतील जप्त दारु व किरकोळ मालाचा लिलाव व नाश करण्याचा अधिकार संबंधित उप विभागीय पोलीस अधिकारी, पोलिस अधीक्षक यांना आहे. त्यांचेकडून परवानगी घेवून विहीत मुदतीनंतर मुद्देमालाची विल्हेवाट लावावी. लिलावाची रक्कम शासकिय कोषागारात जमा करावी.

- गुन्ह्यात जप्त नंबरचे नोटा व्यतिरिक्त इतर रोख रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक व इतर संबंधीत बँकेत पोलीस अकाऊंट मध्ये जमा करावी व तसा उल्लेख दोषारोप पत्रात व संबंधीत मुद्देमाल रजिस्टर मध्ये करावा.
- पुराव्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण नसलेल व अनावश्यक मुद्देमाल जप्त करण्यात येवू नये. मोटार अपघाताचे प्रकरणातील वाहने जप्त करण्याची आवश्यकता नाही. हे एकदा पुन्हा स्पष्ट करण्यात येत आहे.
- मंगळसूत्र चोरीचे गुन्ह्यात चोरण्यात आलेले मंगळसूत्र चोराकडून अगर सोनाराकडून अगर संबंधित इसमांकडून ब-याच वेळा जप्त करण्यात येते. मंगळसूत्र हे भारतीय स्त्रियांचे सौभाग्याचे लेणे (प्रतीक) आहे. त्यांचेशी संबंधी महिलेच्या भावना निगडीत असतात. त्यामुळे जप्त करण्यात आलेल मंगळसूत्र कोर्ट आदेश घेवुन सुपूर्दनाम्यावर संबंधित महिलेस/ फिर्यादिस विनाविलंब परत करावे. पोलीसांनी पकडलेल्या मालाची विल्हेवाट लावण्याबाबत तरतुद भारतीय दंड प्रक्रिया संहितेच्या कलम 457, 458, 459 मध्ये आहे, त्याचे अवलोकन करावे.
- चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडा, विश्वासघात, ठकबाजी इत्यादी सारखे मालमत्ते विरुद्धचे गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल सुपूर्दनाम्यावर घेवून जाणेबाबत फिर्यादिस/ मालकास कोर्टास अर्ज दाखल करण्यात प्रेरित करावे. कोर्टाचे आदेश प्राप्त करण्यास त्यास मदत करावी व कोर्टाचे आदेशाने फिर्यादिस/ मालकास माल परत करण्यात यावा.
- कलम 41 (1) जा.फौ. अंतर्गत जप्त मुद्देमाल उदा. लोखंड व भंगार माल ज्यात तपासात पुढे कोणताही गुन्हा दाखल झाला नाही अगर कलम 124 म.पो.का. अंतर्गत कार्यवाही करण्यात आली नाही त्या मुद्देमालाचा लिलाव करुन रक्कम शासकिय कोषागारात जामा करण्याकरिता उपविभागीय अधिकारी (एस.डी.एम) यांची परवानगी घ्यावी.

मुद्देमालाचे निपटारा संबंधित परिपत्रकात नमुद करण्यात आलेल्या सुचना या मार्गदर्शक स्वरुपाच्या असुन सुचनांचे पालन संबंधित कायद्याच्या तरतुदी व नियमांच्या अधीन राहून करणे अपेक्षीत आहे.

वर नमुद उल्लेखीत सुचना संक्षिप्त रुपात पुन्हा खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे : -

- कोर्टात निकाल लागलेल्या केसेस तसेच अकस्मात मृत्यू प्रकरणाचे केसेसच्या निपटाच्याची माहिती प्राप्त करुन कोर्टाचे आदेश प्राप्त करुन मुद्देमालाचा निपटारा करावा.
- लावारीस मालाबाबत कलम 82 ते 88 मुंबई पोलीस अधिनियम च्या तरतुदीस अधीन राहून सहा. पोलीस आयुक्त यांचेकडून परवानगी घेवून जप्त मुद्देमालाचा लिलाव करण्यात यावा.

- दोषारोप पत्र कोर्टात दाखल करतेवेळीच विशेषतः गंभीर (सेशन कमीट) गुन्ह्यातील माल कोर्टात दाखल करावा.
- ज्वलनशील व लवकर खराब होणाच्या मुद्देमाल कोर्टाचे आदेश प्राप्त प्राप्त करुन त्वरीत सुपूर्दनाम्यावर द्यावा किंवा नाश करावा. तसेच मुद्देमालाप्रमाणे जिल्हाधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांच्या मार्फतीने अशा जप्त मुद्देमालाची विल्हेवाट करावी.
- चोरी व इतर गुन्ह्यातील जप्त सायकली व मोटर सायकली मालकांशी त्वरीत संपर्क साधून त्यांना वाहन सुपूर्दनाम्यावर घेवून जाण्यास सांगावे. तसेच पुराव्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण नसलेला अनावश्यक जप्त करण्यात येवू नये आणि अपघातातील गुन्ह्यातील वाहने जप्त करण्यात येवू नये.
- आर.टी.ओ. तपासणी नंतर ती संबंधितांच्या स्वाधीन करण्यात यावी. मुंबई दारुबंदी कायद्यातंर्गत 1,000/- रुपये किंमतीपेक्षा कमी किंमत असलेली जप्त दारु व साहित्याची वर नमुद तरतुदी प्रमाणे संबंधित उप विभागीय पोलीस अधिकारी यांचेकडून परवानगी प्राप्त करुन लिलाव करण्यात यावा.
- नंबरी नोटा/ फंटरची नोट व्यतिरिक्त रोख रक्कम संबंधित बँकेत पोलीस खात्यात जमा करावी.
- चेन स्नॅचिंग गुन्ह्यातील जप्त मंगळसूत्र फिर्यादीस विनाविलंब त्वरीत परत करण्यात यावे.
- संपत्तीबाबतचे गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल फिर्यादिस सुपूर्दनाम्यावर कोर्टाचे आदेश प्राप्त करुन परत घेवून जाण्यास प्रेरीत करावे.
- कलम 14(1) जा.फौ. अंतर्गत जप्त मुद्देमाल उदा. लोखंड व भंगार माल ज्यात तपासात पुढे कोणताही गुन्हा दाखल झाला नाही अगर कलम 124 म.पो.का. अंतर्गत कार्यवाही करण्यात आली नाही त्या मुद्देमालाचा लिलाव करुन रक्कम शासकिय कोषागारात जामा करण्याकरिता उपविभागीय अधिकारी (एस.डी.एम) यांची परवानगी घ्यावी.

# सरकार जमा अथवा बेवारस मालमत्तेची विल्हेवाट लावणे मार्गदर्शक सुचना व न्यायनिवाडे

पोलिस स्टेशनकडे जमा असलेली बेवारस मालमत्ता अथवा सरकार जमा करण्यात आलेली मालमत्ता निकाली काढण्यासाठी संबंधित ठाणेदाराकडून या कार्यालयाकडे परवानगी मागितली जाते. मात्र परवानगी घेण्याची पद्धत, विल्हेवाट लावण्याबाबत अबंलबजावणी कार्यपद्धती, याबाबत असलेल्या अधिकारांबाबत कायदेशिर तरतुदी याबाबत संबंधित ठाणेदार यांना पुरेशी कल्पना नसते, असे त्यांचे पत्रव्यवहारातून दिसून येते. सर्व पोलिस स्टेशनच्या कार्यपद्धतींमध्ये वैधानिक अचुकता असावी व सर्व पोलीस स्टेशनच्या कार्यवाहीमध्ये एकवाक्यता असावी, या दृष्टीने खालील प्रमाणे कार्यपद्धती कळविण्यात येत आहे.

1) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या प्रकरण 34, कलम 451 ते 459 मध्ये मालमत्ता विल्हेवाटीबाबत कायदेशीर तरतुदी दिल्या आहेत. यातील कलम 452 नुसार कोर्टासमोर आलेली मालमत्ता कोर्ट योग्य वाटेल अशा पद्धतीने नाश करील, सरकार जमा करील अथवा हितसंबंधिताच्या सुपूर्द करेल.

2) कलम 457 नुसार देखील पोलीस अधिका-याने जप्त केलेली मालमत्ता योग्य रितीने विल्हेवाट लावण्याचे अधिकार न्यायालयाला आहेत.

3) उपरोक्त प्रमाणे कोणत्याही न्यायालयाने सरकार जमा केलेली मालमत्ता अथवा पोलीस अधिकाऱ्यास बेवारस आढळलेली मालमत्ता विहीत पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी कलम 458 प्रमाणे राज्य शासनाला हस्तांतरित करावी लागते. अशाप्रकारे सरकार जमा झालेली अथवा बेवारस आढळलेली, विल्हेवाट लावण्यात योग्य असलेली मालमत्ता निकाली काढण्याबाबतची कार्यपद्धती मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या फौजदारी नियमावलीतील प्रकरण-6 परिच्छेद 82 व प्रकरण 19 मध्ये घालुन देण्यात आलेली आहे.

अ) प्रकरण 1 परिच्छेद 10 नुसार, सरकार जमा अथवा बेवारस मालमत्ता संबंधीत कोर्टाकडून जिल्हा दंडाधिकारी अथवा कार्यकारी दंडाधिका-यांकडे पाठविली जाते. सर्व साधारणपणे अशी मालमत्ता पोलीस विभागाच्या ताब्यात असते व तिच्या विल्हेवाटीसाठी संबंधित पोलीस स्टेशन मार्फत उप विभागीय दंडाधिका-यांकडे प्रस्ताव सादर केले जातात. परिच्छेद 11 नुसार संबंधित कार्यकारी दंडाधिकारी यांनी दंडाधिकारी यांनी मालमत्ता निकाली काढतांना शक्य असेल तेथपर्यंत प्रकरण 6 परिच्छेद 82 नुसार कार्यवाही करावयाची पद्धत.

ब) परिच्छेद 82 नुसार संबंधीत कार्यकारी दंडाधिकारी मालमत्ता विक्रीबाबत जाहीर सुचना काढेल. यात विक्रीचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच विक्री करावयाची मालमत्ता याबाबत माहिती असेल तसेच बोली बोलणा-यास तात्काळ किंमत अदा करावी लागेल, हे स्पष्ट असेल. वस्तुची हाताची किंमत ठरविणे आवश्यक आहे. क) उपरोक्त जाहिर सुचनेची एक प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, जिल्हा दंडाधिकारी, तहसिलदार यांचे कार्यालयामध्ये व इतर योग्य मार्गाने प्रसिद्ध करावी लागेल. मालमत्तेची किंमत 500/रु. पेक्षा जास्त असल्यास वृत्तपत्रात जाहिरात द्यावी लागेल. सदर

जाहिर सुचना हर्रासीच्या किमान 15 दिवस अगोदर कार्यकारी दंडाधिका-यांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

पुढील कार्यवाही हर्रासीच्या नेहमीच्या पद्धतीने केली जाईल. मा. उच्च न्यायालयाची उपरोक्त नमुद कार्यपद्धती बघता सर्व पोलीस स्टेशन अधिका-यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचेकडे असलेल्या बेवारस अथवा सरकार जमा झालेल्या किंमती वस्तुंची परिपूर्ण यादी या कार्यालयात सादर करावी. यादी प्राप्त झाल्यानंतर परिच्छेद 11 नुसार हि मालमत्ता विल्हेवाट लावण्याची कार्यवाही संबंधीत तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे मार्फत केली जाईल.

मालमत्तेची विल्हेवाट CrP.C. कलम 451. विवक्षित खटल्यामध्ये संपरीक्षा प्रलंबित असेपर्यंत मालमत्तेच्या अभिरक्षेचा व विल्हेवाटीचा आदेश. जेव्हा कोणत्याही चौकशीत किंवा संपरीक्षेत फौजदारी न्यायालयासमोर कोणतीही मालमत्ता हजर केली जाईल तेव्हा, न्यायालय चौकशी किंवा संपरीक्षा समाप्त होईपर्यंत अशा मालमत्तेच्या योग्य अभिरक्षेसाठी त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल व मालमत्ता लवकर व स्वभावतः खराब होण्यासारखी असेल अगर तिची विक्री किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट करणे समयोचित असेल तर, न्यायालय त्याला जरूर वाटेल असा पुरावा नोंदवल्यानंतर, तशी विक्री किंवा विल्हेवाट करण्याचा आदेश देऊ शकेल.

**स्पष्टीकरण** - या कलमाच्या प्रयोजनार्थ मालमत्ता यात, - (अ) न्यायालयासमोर हजर केली असेल किंवा त्याच्या अभिरक्षेत असेल अशी कोणत्याही प्रकारची मालमत्ता किंवा दस्तऐवज. (ब) जिच्या संबंधात अपराध करण्यात आल्याचे दिसत असेल किंवा जी कोणताही अपराधकरण्यासाठी वापरण्यात आल्याचे दिसत असेल अशी कोणतीही मालमत्ता समाविष्ट आहे.

## Cr. P. C. **कलम 452. संपरीक्षेच्या अखेरीस मालमत्तेच्या विल्हेवाटीचा आदेश**

(1) जेव्हा कोणत्याही फौजदारी न्यायालयातील चौकशी किंवा संपरीक्षा समाप्त होईल तेव्हा, त्याच्यासमोर हजर करण्यात आलेल्या किंवा त्याच्या अभिरक्षेत असलेल्या किंवा ज्यासंबंधात कोणताही अपराध करण्यात आल्याचे दिसत असेल अशा किंवा कोणताही अपराध करण्यासाठी वापरण्यात आलेल्या अशा कोणत्याही मालमत्तेचा किंवा दस्तऐवजाचा नाश करून, अधिहरण करून किंवा त्याच्या कब्जास हक्कदार असल्याचा दावा सांगणाच्या कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करून किंवा अन्य काहीतरी करून विल्हेवाट करण्यासाठी न्यायालय स्वतःला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

(2) कागदोपत्री जप्त मुद्देमालाच्या कब्जास हक्कदार असल्याचा दावा सांगणाच्या कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करण्यासाठी पोटकलम 11) खाली बिनशेत अथवा पाटकलभ (1) खाली दिलेला आदेश अपिलान्ती किंवा पुनरीक्षणान्ती अपरिवर्तित करण्यात किंवा रद्द ठरवण्यात आल्यास अशी

मालमत्ता न्यायालयाकडे परत करण्यास वचनबद्ध करणारे, न्यायालयाच्या ।माधानासपुरेसे बंधपत्र जामीनदारांसह किंवा त्याच्याविना तिने निष्पादित करून द्यावे अशा शर्तीवर आदेश देता येईल.

(3) सत्र न्यायालय स्वतः पोटकलम (1) खाली आदेश देण्याऐवजी मुख्य न्यायदंडाधिका-याकडे मालमत्ता सुपूर्द करण्याचा निदेश देऊ शकेल, व तो त्यावर कलमे 457, 458 व 459 यांमध्ये उपबंधित केलेल्या रीतीने त्याबाबत कार्यवाही करील.

(4) जर मालमत्ता जीवधनाच्या (पाळीव पशुपक्ष्यांच्या) रूपात असेल किंवा लवकर व निसर्गतः खराब होण्यासारखी असेल तर किंवा जर पोटकलम (2) च्या अनुरोधाने बंधपत्र निष्पादित करण्यात आले असेल तर ती बाब खेरीजकरून एरव्ही, पोटकलम (1) खाली दिलेला आदेश दोन महिनेपर्यंत किंवा अपील सादर केल्यास अशा अपिलाचा निकाल होईपर्यंत सामील केला जाणार नाही.

(5) या कलमात मालमत्ता या संज्ञेत, जिच्या संबंधात अपराध करण्यात आला असल्याचे दिसत असेल तिच्या बाबतीत, मुळात जी कोणत्याही पक्षाच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली होती अशाच मालमत्तेचा नव्हे तर, तिचे ज्यात रूपांतर केले गेले किंवा तिची जिच्याशी अदलाबदल केली गेली अशा कोणत्याही मालमत्तेचा व अशा रूपांतरातून किंवा अदलाबदलीतून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जे काही प्राप्त झाले असेल त्याचा समावेश आहे. Cr. P. C. कलम 453. आरोपीकडे सापडलेला पैसा निर्दोष खरेदीदाराला देणे चोरी करणे किंवा चोरीची मालमत्ता स्वीकारणे हे ज्या अपराधात समाविष्ट आहे किंवा जो अपराध त्या सदरात मोडतो अशा कोणत्याही अपराधाबद्दल जेव्हा एखाद्या व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले असेल व ती चोरीची मालमत्ता असल्याचे माहीत नसताना किंवा तरी समजण्यास कारण नसताना तिच्याकडून अन्य कोणत्याही व्यक्तीने ती मालमत्ता विकत घेतली असून, सिद्धदोष व्यक्तीच्या अटकेनंतर काही पैसा तिच्या कब्जातून घेण्यात आला आहे असे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा, अशा खरेदीदाराचा अर्ज आल्यास व चोरीच्या मालमत्तेच्या कब्जास हक्कदार असलेल्या व्यक्तीला ती परत मिळाल्यावर, न्यायालय अशा खरेदीदाराने दिलेल्या किमतीहून अधिक नाही इतकी रक्कम अशा पैशातून त्याला देण्यात यावी, असा आदेश देऊ शकेल. पोलीसांनी जप्त केलेल्या मालमत्तेबद्दल (प्रॉपर्टी) कार्यपद्धत (Crpc कलम 457 पोलिसांनी जप्त) ज्यावेळी पोलीस अधिकारी एखादे इसमांस मॅजिस्ट्रेटचे वारंटशिवाय अगर मॅजिस्ट्रेटचे वॉरंटवर, परंतु त्या वॉरंटमध्ये त्या इसमास जामीनावर सोडावे असे म्हटले असेल. परंतु तो इसम जामीन देऊ शकत नसेल किंवा एखादे खाजगी इसमाने मॅजिस्टेटचे वॉरंटवर एखादे इसमास अटक केले असेल व तो जामीनास पात्र नसेल अगर तो जामीन देऊ शकत नसेल तर अशा अटक केलेल्या इसमांस ज्या पोलीस अधिका-यापुढे हजर केले जाईल त्या पोलीस अधिका-याने त्या माणसाची झडती घेऊन त्याचे अंगावर लागणारे वस्तूशिवाय म्हणजे कपड्याशिवाय इतर ज्या वस्तू मिळतील त्या ताब्यात घेऊन व सुरक्षित ठेवून त्या वस्तूंची पावती त्या इसमास द्यावी असे याच कोडचे कलम 51 मध्ये म्हटलेले आहे. तसेच याच कोडचे कलम 102 मध्ये पोलिसांना ज्या वस्तू जप्त करणेचे अधिकार दिलेले आहेत व याच कलमाचे (3) मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या वस्तू अगर माल बाँडवर एखादे इसमाचे

ताब्यात दिलेला असेल त्यावेळी वरील सर्व बाबींमधील वस्तू मॅजिस्टेटकडे फौजदारी कोर्टात एखादे चौकशीसाठी अगर इन्साफीसाठी पाठविल्या नसतील तर त्या वस्तू अगर माल ज्याचा असेल त्यास देणेसाठी अगर संबंधित इसम मिळून न आल्यास त्याबाबतीत मॅजिस्ट्रेट योग्य वाटेल त्याप्रमाणे आज्ञा करू शकेल. तसेच ज्याच्या वस्तू अगर माल आहे तो इसम माहीत झाल्यावर संबंधित वस्तू काही अटींवर मॅजिस्ट्रेट योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या इसमास देण्याची आज्ञा करू शकेल व ज्या वस्तूचा अगर मालाचा मालक मिळून न आल्यास त्या बाबतीत मॅजिस्ट्रेट संबंधित मालाबद्दल जाहीरनामा काढून संबंधित इसमाने मॅजिस्ट्रेटपुढे तो माल आपला आहे असा हक्क सांगणेसाठी जाहीरनामा काढलेपासून सहा महिन्यांचे मुदतीत हजर रहावे, असे कळविले जाते, असे या कलमात म्हटलेले आहे. आणि म्हणून या कलमाचे आधारे वर नमूद केलेल्या कलमांचे आधारे पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या वस्तू मॅजिस्ट्रेटच्या आदेशा शिवाय कोणासही देता येणार नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने रामप्रकाश शर्मा विरुद्ध हरियाणा राज्य या केसमध्ये असे म्हटले आहे की, एखादे इसमाकडून गुन्ह्यात संबंध असलेली मालमत्ता (प्रॉपर्टी) पोलिसांनी जप्त केला असेल व ती कोर्टात हजर केली नसेल व त्याबाबतीत इन्साफ (ट्रायल) सुरू झाली नसेल तर ती मालमत्ता मुक्त करणेचे अधिकार कोर्टास आहेत. परंतु ती मुक्त करताना ती न्यायदानाचे वेळी कोर्टात हजर करणेची जरुरी आहे किंवा नाही याचा विचार करणे जरुरीचे आहे. ही केस 1978 सुप्रीम कोर्ट केसेस (क्रिमिनल) पान 309 व ए.आय.आर. 1978 सुप्रीम कोर्ट पान 1282 वर प्रसिद्ध झालेली आहे. जी मालमत्ता जप्त केली असेल व तिचेबद्दल तपास चालू नसेल व तिचेबद्दल खटला पाठविणेचे नसेल तर सर्वसाधारणपणे असा नियम आहे की, ती मालमत्ता ज्याचेकडून जप्त केली ती त्यास परत करावी असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने दाखिनीप्रसाद विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या केसमध्ये म्हटले असून, ही केस 1978 क्रिमिनल लॉ जर्नल पान 204 वर प्रसिद्ध झालेली आहे.

कस्टम अधिकारी हे पोलीस अधिकारी नसून त्यांनी जप्त केलेल्या मालमत्तेची विल्हेवाट करणे अगर देऊन टाकणे याबद्दलची दखल फौजदारी कोर्टास याच कलम 457 प्रमाणे घेता येणार नाही. असे असिस्टंट कलेक्टर ऑफ कस्टम विरुद्ध मरीया रेगे या केसमध्ये उच्च न्यायालयाने म्हटले आहे व ही केस 1991 क्रिमिनल लॉ जर्नल पान 229 वर प्रसिद्ध झालेली आहे. फॉरेस्ट रेंज ऑफिसरने वाइल्ड लाइफ प्रोटेक्शन ॲक्टप्रमाणे जप्त केलेली मालमत्ता ही पोलीस अधिका-याने जप्त केली असे म्हणता येणार नाही व त्यामुळे यावरील कलम 457 मध्ये तिचा समावेश होणार नाही असे मध्य प्रदेशचे उच्च न्यायालयाने बाबुलाल लोधी विरुद्ध मध्यप्रदेश राज्य या केसमध्ये म्हटले आहे, व ही केस 1987 क्रिमिनल लॉ जर्मन पान 1709 वर प्रसिद्ध झालेली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने अ ॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दादरा अ ॅन्ड नगर हवेली विरुद्ध सी. बी. शहा या केसमध्ये असे म्हटले आहे की, स्पेशल लॉ (विशिष्ट खास किंवा मुद्दाम केलेला) प्रमाणे जप्त केलेल्या मालमत्तेबद्दलची वाटणी करणेचे अधिकार मॅजिस्ट्रेटला नाहीत. ही केस 1986 क्रिमिनल लॉ जर्नल पान 1087 (मुंबई) वर प्रसिद्ध झालेली आहे.

**(6)** ज्यावेळी न्यायाधीशांना असे वाटेल की पोलिसांनी जप्त केलेली मालमत्ता ही पोलीसांचेकडे अगर कोर्टाकडे चौकशीसाठी अगर इन्साफीसाठी जरुरीची आहे तर ती मालमत्ता मुक्त करु नये, परंतु त्या मालमत्तेची उत्तरार्ध टप्प्यांतील चौकशीचे कामी अगर इन्साफाचे वेळी जरूरी नसेल तर ती मालमत्ता जो मालकी हक्क सांगेल त्यास सुरक्षिततेवर देणे योग्य होईल असे सर्वोच्च न्यायालयाने रामप्रकाश शर्मा विरुद्ध हरियाणा राज्य या केसमध्ये म्हटले आहे. ही ए.आय.आर. 1987 सुप्रीम कोर्ट पान 1282 व 1978 सुप्रीम कोर्ट केसेस् (क्रिमिनल) पान 309 वर प्रसिद्ध झालेली आहे. CrP.C. कलम 458. जेव्हा सहा महिन्यांत कोणीही मागणीदार उपस्थित होत नाही त्याबाबतीतील

**प्रक्रिया** - (1) जर अशा कालावधीत कोणत्याही व्यक्तीने अशा मालमत्तेवर आपला मागणीहक्क शाबीत केला नसेल व अशा मालमत्ता जिच्या कब्जात सापडली ती व्यक्ती आपणास ती मालमत्ता वैध रीतीने प्राप्त झाली हे दाखवून देण्यास असमर्थ असेल तर, दंडाधिकारी आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, अशी मालमत्ता राज्य शासनाच्या स्वाधीन राहील व राज्य शासन ती विकू शकेल व अशा विक्रीपासून मिळणाच्या उत्पन्नाचा विनियोग विहित करण्यात येईल अशा रीतीने केला जावा.

(2) अशा कोणत्याही आदेशावरील अपील दंडाधिका-याने केलेल्या दोषसिद्धींवर सर्व सामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपील होऊ शकतात त्याच्याकडे होऊ शकेल.

### Cr.P. C. **कलम 459. नाशवंत मालमत्तेची विक्री करण्याचा अधिकार**

अशा मालमत्तेच्या कब्जास हक्कदार असलेली व्यक्ती अज्ञात किंवा अनुपस्थित असून मालमत्ता लवकर व निसर्गतः खराब होण्यासारखी असेल तर, अथवा ज्या दंडाधिका-याला तिच्या अभिग्रहणाचे वृत्त कळवण्यात आले त्याच्या मते तिची विक्री मालकाला फायदेशीर ठरण्यासारखी असेल किंवा अशा मालमत्तेचे मूल्य पाचशे रूपयाहून कमी असेल तर, दंडाधिकारी कोणत्याही वेळी तिच्या विक्रीचा निदेश देऊ शकेल, आणि कलमे 457 व 458 यांचे उपबंध अशा विक्रीपासूनच्या निव्वळ उत्पन्नाला व्यवहार्य असेल तितपत जसेच्या तसे लागू होतील.

## पोलीस नियमावली भाग - 2

1. महत्त्वाचे सक्रिय गुन्हेगार आणि राज्यातील महत्त्वाचे दुर्जन इसम हरवलेली किंवा चोरीस गेलेली आणि परत मिळवलेली मालमत्ता

अ) ओळखता येण्याजोगी हरवलेली, चोरीस गेलेली अथवा संशयावरून जप्त केलेली मालमत्ता अथवा मोटारकार आणि मोटारसायकली.

ब) अग्नीशत्रे, दारूगोळा आणि स्फोटकाची चोरी, हरवणे आणि परत मिळवणे. पोलीस नियमावली भाग क्रमांक - 2 नियम 271. मुद्देमाल नोंदवही पोलीसांच्या हाती जाणारी सर्व मालमत्ता मुद्देमाल नोंदवहीमध्ये (नमुना क्र. पी. एम. 81) अथवा लॉकप नोंदवहीमध्ये नमुना क्र.पी.एस. 87 नोंदवली पाहिजे. मुद्देमाल नोंदवहीला आणि लॉकप नोंदवहीला असेही म्हणतात.

2. तपासिक अंमलदाराने कैद्याच्या अंगावर ठेवलेली आणि त्यास लॉकप कक्षामध्ये ठेवण्यापूर्वी प्राथमिक उपाय म्हणून त्यांच्याकडून लॉकप प्रभारीने घेतलेले दागिने, कपडे इ. सारखी मालमत्ता लॉकप नोंदवहीत उतरवलीच पाहिजे. पोलीस ठाण्यात प्राप्त झालेल्या इतर सर्व मालमत्तेची नोंद मुद्देमाल नोंदवहीमध्ये केली पाहिजे. मु.पो. अधि. कलम क्रमांक 19. मोकाट गुरेढोरे व बेवारस मालमत्ता  पोलीसांनी रस्त्यावर सापडलेली गुरेढोरे ताब्यात घेतली पाहिजेत आणि पशु अतिक्रमण अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा प्रकरणपरत्वे मुंबई पोलीस अधिनियमाची कलम 91 व 118 यांच्या तरतुदींनुसार त्या गुराढोरांना कोंडवाड्यात ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(अ) पोलीसांना सापडलेल्या किंवा त्यांच्याकडे हस्तांतरित केलेल्या बेवारस मालमत्तेचा ताबा घेणे आणि मुंबई पोलीस भारतीय दंड संहितेच्या कलम 403 चे स्पष्टीकरण (2) यांचा संदर्भ पाहण्यात यावा.

(ब) वस्तू सापडलेल्या व्यक्तीचे हक्क व दायित्व यांसाठी भारतीय कराराचा कायदा कलम 71,168 व 169 आणि भारतीय दंड संहितेच्या कलम 403 चे स्पष्टीकरण (2) यांचा संदर्भ पाहण्यात यावा.

(क) बेवारस वस्तू, सापडलेली व्यक्ती, मिळालेली वस्तू कब्जात ठेवण्यासाठी तिचा खरा मालक सोडल्यास इतर कोणाही पेक्षा अधिक हक्कदार असते. पोलीसांना सापडलेल्या किंवा मालमत्ता सापडलेल्या व्यक्तीने पोलीसांच्या मागणीवरून नव्हे तर स्वतः होऊन पोलीसांकडे हस्तांतरित केलेल्या मालमत्तेला मुंबई पोलीस अधिनियमाचे कलम 82 लागू करताना त्याची व्याप्ती मर्यादित केलेली आहे.

(ड) बेवारस मालमत्ता किंवा मृत देहांवर सापडलेली मालमत्ता, रेल्वेच्या सीमांमध्ये सापडलेले प्राण्यांचे मृतदेह किंवा मारल्या गेलेल्या प्राण्यांची कातडी यांची विल्हेवाट लावण्यासाठी नियम 196 चा संदर्भ पाहण्यात यावा. टीप :- राज्य महामार्ग प्राधिका-यांनी पोलीसांकडे पाठवलेल्या बेवारस वस्तू आणि पैशांच्या रकमा या  मुद्देमालाच्या स्वरूपाच्या असतात. आणि या संबंधात

मिळालेल्या पैशांसाठी नमुना सर्वता 113-म मध्ये पावती देणे उचित ठरणार नाही. अशा मालमत्तेची नोंद मुद्देमाल नोंदवहीत घेऊन मुद्देमाल पावत्या देणे ही उचित कार्यपद्धती आहे.

# पोलीस नियमावली भाग - 3

विभाग - 3 :-कागदोपत्री पुरावा व मालमत्ता हस्तगत करणे 174.

झडती : - 1. जेव्हा तपासकामी एखादे कागदपत्र, वस्तू (आर्टिकल) अगर प्राण्यांची जरुरी असेल तर दंड प्रक्रिया संहिता कलम 91 नुसार पोलीस ठाणे अधिका-याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी अशी वस्तू अगर प्राणी आपल्यापुढे हजर करण्याचा आदेश देऊ शकतो आणि असा आदेश मिळाल्यावर ती वस्तू ताब्यात अगर नियंत्रणात असलेल्या इसमाने ती वस्तू अगर प्राणी हजर करणे त्याचे कर्तव्य राहील. जर कागदपत्र असेल व ते पुरावा कायदा कलम 123 किंवा 124 नुसार हजर करण्याचे नाकारण्याचा विशेष हक्क अगर सवलत असेल तर वरीलप्रमाणे बंधन असणार नाही.

2. वरील पोटनियम (1) मधील पद्धती प्रभावी ठरली नाही अगर ठरू शकणार नसेल तर तपासिक अंमलदार स्वत: अगर पोलीस हवालदाराच्या दर्जाहून कमी दर्जा नसणा-या कनिष्ठामार्फत असे कागदपत्र, वस्तू, प्राणी जेथे सापडू शकेल अशा घराची अगर जागेची झडती घेऊ शकतील. झडती घेण्यापूर्वी तपासीक अंमलदार यांनी शोध घ्यावयाच्या वस्तूंची आणि त्या घरात अगर जागेत वस्तू असल्याबाबत संशय का वाटतो त्याची कारणे नोंद करून दंडाधिकारी यांना प्रत सादर केली पाहिजे. त्यावरून दंडाधिकारी जागेच्या मालकाला प्रत देतील. पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेरील जागेत/ घरात वस्तू असल्याबाबत संशय वाटत असेल तर संबंधित पोलीस ठाणे अधिकारी यांना झडती घेण्याबाबत विनंती केली पाहिजे. परंतु अशा पद्धतीमुळे जर विलंब होणार असेल, तर वरीलप्रमाणे नमूद अभिलेखाची (रेकॉर्ड) प्रत व झडती यादी संबंधित दंडाधिका-यांना सादर करण्याची काळजी घेऊन तपासिक अंमलदार थेट झडती घेऊ शकतात.

3. मिलिटरी निवासस्थाने अगर लाईनमध्ये झडती घ्यावयाची असेल तर नियम 109 मधील नमूद पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात झडती घ्यावयाची असेल तर ती सदर संस्थांच्या प्रमुखांच्या उपस्थितीत केली पाहिजे. जर ते उपस्थित नसतील व तातडीची झडती आवश्यक असेल तर तसे करण्याची आवश्यकता नाही.

4. दंड प्रक्रिया संहिता कलम 99 व 100 मधील सर्वसाधारण तरतुदींचा झडती घेताना कटाक्षाने अवलंब केला पाहिजे.

5. झडतीदरम्यान जप्त केलेल्या वस्तूंची ओळख (आयडेंटिटी) राखून ठेवणे आवश्यक असेल तर नियम 145 मधील सूचना ध्यानात घेतल्या पाहिजेत. मुंबई ग्राम पोलीस कायदा कलम 10 नुसार गुन्ह्याच्या ठिकाणी पोलीस पोहोचेपर्यंत तेथील वस्तू सांभाळून ठेवणे हे पोलीसपाटील यांचे कर्तव्य आहे.

6. झडती दरम्यान जर जप्त केली असेल तर त्यात प्रत्येक औस द्रवाला एक खडा (ग्रेन) मोरचूद (कॉपर-सल्फेट) त्याचे आंबवण (फर्मेंटेशन) थांबवण्याकरिता टाकले पाहिजे. अशा द्रवात कोणता पदार्थ टाकला होता हे आम्हास माहीत नव्हते अशा प्रकारचे आरोप टाळण्याकरिता मोरचुदाचे दोन

नमुने काढून ते पंच व पोलीस यांच्यासमोर मोहोरबंद केले पाहिजे. त्यापैकी एक पोलीस अधिकारी यांनी ठेवून घेतला पाहिजे, व दुसरा नमुना आरोपीला देऊन त्याची तशी पोच पावती घेतली पाहिजे. या गोष्टीचा पंचनाम्यात उल्लेख केला पाहिजे. इन्साफाच्या (ट्रायल) वेळी मोरचुदामुळे आंबवण थांबते याबाबत तज्ञांची साक्ष काढली पाहिजे. छाप्याच्या वेळी जप्त केले असेल तर ते रासायनिक तपासणीसाठी पाठवण्यापूर्वी त्याचे पुढील आंबवण थांबवले पाहिजे. मोरचुदाचे वजन करणे शक्य असणार नाही, अशावेळी एक क्वॉर्टर बाटली मध्ये एक चहाचा चमचा मोरचूद घालावे. रासायनिक तपासणीकरिता पाठवताना ही बाब अहवालात नमूद केली पाहिजे. मोरचूद घातल्याची बाब पंचनाम्यातही नमूद केली पाहिजे. रायायनिक तपासणीचा अहवाल न्यायालयात सादर करताना या मुद्यांवरील पुरावा न्यायालयापुढे सादर केला पाहिजे. त्या नमुन्यामध्येही पोलीस अधिका-याने मोरचूद मिसळले पाहिजे, व ती बाटली मोहोरबंद केली पाहिजे.

7. जेव्हा गुन्ह्याच्या तपास करीत असताना जिवंत प्राणी जप्त केला असेल तर त्याच्या खाद्यावरील सरकारचा होणारा खर्च वाचवण्यासाठी लागेल तेव्हा हजर करण्याच्या करारावर ज्याच्याकडून जप्त केला त्याला प्राणी परत केला पाहिजे. असा करार मुद्रांक पत्रावर (स्टॅप पेपर) करून मुद्रांकपत्राचा खर्च संबंधित इसमाने केला पाहिजे. ज्या इसमाकडून असा प्राणी जप्त केला असेल, त्यालाच तो परत करणे योग्य होत नसेल, अशावेळी दंड प्रक्रिया संहिता कलम 457 नुसार दंडाधिका-याकडे अर्ज करून आदेश घेतला पाहिजे.

8. दंड प्रक्रिया संहिता कलम 165 नुसार आपल्या कक्षेत राहून एखाद्या विशिष्ट वस्तूबाबत झडती घेत असताना पोलीस अधिकारी यांना एखादी दुसरीच मालमत्ता जी चोरीची अगर संशयित वाटत असेल किंवा तशा परिस्थितीत आढळली तर ती दंड प्रक्रिया संहिता कलम 102 नुसार जप्त करता येईल.

9. जर योग्य व सबळ कारणे असतील तरच दंड प्रक्रिया संहिता कलम 165 नुसार पोलीस अधिका-यास झडतीचा अधिकार आहे. त्याबाबत पोलीस अधिकारी यांनी पुरेशा नोंदी ठेवल्या पाहिजेत. झ डतीसाठी योग्य व सबळ कारणे होती अगर नाही याबाबत जेव्हा प्रश्न उपस्थित होईल, तेव्हा अशा नोंदीवरून ठरवले जाईल. विशेषतः मद्य निषेधाच्या प्रकरणामध्ये जर तसे करणे सोयीस्कर असेल तर ती कारणे प्रथम खबरीमध्ये नमूद केली पहिजेत. इतर प्रकरणामध्ये अशी कारणे प्रकरण दैनंदिनीत नमूद केली पाहिजेत. खात्रीशीर महिती मिळाल्यावरून. असे शब्दही पुरेसे आहेत.

10. (अ) दंड प्रक्रिया संहिता कलम 166 नुसार तपास करण्यास अधिकृत असलेल्या जिल्ह्याच्या पोलिसाकडून मुंबई पोलिसांना झडती घेण्याची विनंती करणारा अहवाल मिळाल्यावर त्यांनी दंड प्रक्रिया संहिता कलम 165 च्या तरतुदी प्रकरणाला लागू होतात किंवा नाही व तशा वस्तू झडतीविना मिळणार नाहीत, हे पाहिले पाहिजे. जर झडती घेणे आवश्यक असेल तर झडती घ्यावयाच्या वस्तूंचे पूर्ण वर्णन, झडतीचे कारण व झडतीचे ठिकाण इत्यादी माहिती विनंती अहवालात नमूद केली पाहिजे.

आणि अशी झडती पंचासमक्ष घेतली पाहिजे. सामान्यपणे जिल्हा पोलिसांना त्यांच्या अगर मुंबईतील न्यायालयाने वॉरंट मिळवण्यास सांगितले पाहिजे.

(ब) मुंबई पोलिसांनी जप्त केलेल्या अगर साक्षीदारांनी त्यांच्यापुढे हजर केलेल्या वस्तू थेट जिल्हा पोलिसांकडे सोपवू नयेत. पंचनामा अगर वस्तूंच्या यादीची प्रत जिल्हा पोलिसांना द्यावी.

(क) मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या वस्तू इलाखा शहर दंडाधिकारी यांच्यापुढे हजर करून त्या जिल्हा पोलिसांच्या ताब्यात देण्याबाबत आदेश द्यावा. असे करताना ज्याच्या ताब्यातून वस्तू घेतल्या व जिल्ह्याचे ते अधिकारी हे जर मुंबईत असतील, तर त्यांना नोटीस द्यावी. जप्त वस्तूंची विल्हेवाट न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे करावी.

(ड) मुंबईतील प्रकरणांमध्ये जप्त केलेल्या वस्तूंचा ताबा व जतन करणे इत्यादी बाबतच्या सर्व तरतुदी योग्य त्या फेरफारासह जिल्ह्याच्या पोलिसांना हव्या असलेल्या वस्तूंबाबत लागू होतील.

(इ) वाहतुकीसाठी आलेला सर्व खर्च जिल्हा पोलिसांनी करावा.

11. टपालगाडीची मेल व्हॅन झडती :- टपालगाडीची झडती घेण्यापूर्वी पुढील पद्धतीचा अवलंब करावा.

(i) टपालगाडीत प्रवेश करणारा अधिकारी पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याच्या वरच्या हुद्याचा असावा. त्या ठिकाणी हजर असणा-या सर्वात वरिष्ठ दर्जाच्या पोस्ट आणि तार खात्याच्या अधिका-याला आपली ओळख दाखवली पाहिजे. आपल्या सोबत दोन पंच असावेत व त्यांचीही ओळख दिली पाहिजे.

(ii) फक्त दोनच पोलीस अधिकारी यांना टपाल गाडीत जाण्यास परवानगी दिली पाहिजे.

(iii) साधारणपणे झडती घेण्यापूर्वी पोस्ट आणि तार खात्याचे विभागीय अधिकारी यांच्याशी सल्लामसलत केली पाहिजे. परंतु तातडीच्या वेळी झडती घेऊन त्यानंतर लगेच त्यांना कळविले पाहिजे.

(iv) रेल्वे टपाल सेवेचे निरीक्षक हे जर त्या ठिकाणी हजर असतील, तर त्यांनाही विश्वासात घेतले पाहिजे. हजर नसतील, तर त्या ठिकाणी हजर असणाच्या वरिष्ठ टपाल अधिका-यासमक्ष झडती घेतली पाहिजे. टीप :- रेल्वे टपाल सेवेच्या कर्मचा-यांच्या कर्तव्यातील अडचणी लक्षात घेऊन त्यांच्या कर्तव्यात अडथळा येणार नाही व त्यांची अनावश्यक गैरसोय होणार नाही, अशा रीतीने झडत्या घेतल्या  पाहिजेत. नाट्य प्रयोग अधिनियम-1876 (19 वा) (ड्रामॅटीक परफॉर्मेंसेस अ ॅक्ट) नियम क्र. 267. या कायद्याखालील पोलिसांची कर्तव्ये : - या कायद्याचे कलम 8 नुसार कायद्याने प्रतिबंध केलेल्या प्रयोगासाठी जर एखादे घर, खोली अथवा जागा वापरली जात असल्याबाबत अथवा वापरली जाणार असल्याबाबत दंडाधिकारी यांना खात्री वाटत असेल तर ते आपल्या वॉरंटाने कोणत्याही पोलीस अधिका-यास दिवसा अगर रात्री त्या जागेत जरूर त्या मदतीसह आणि जरूर तर बळाचा वापर करून शिरण्याचा अधिकार देऊ शकतील, आणि त्या जागेत असणा-या सर्वांना ताब्यात घेऊन तेथे मिळालेली सर्व दृष्ये, वेश आणि इतर वस्तू तसेच वापरल्याची शक्यता असलेली

अथवा प्रयोगासाठी वापरली जाण्याची शक्यता असलेली साधने ताब्यात घेण्याचा अधिकार न्यायालय देऊ शकेल. भारताचा बारी पदार्थाविषयीचा कायदा-1884 (4 था) (इंडियन एक्सप्लोजिव अॅक्ट) नियम क्र. 268. बारी पदार्थाबाबत झडती आणि जप्तीचे अधिकार :

1. यासोबत जोडलेल्या तक्त्याचा रकाना क्रमांक 1 मधील कोणताही अधिकारी रकाना क्रमांक 2 मधील नमूद क्षेत्रात (अ) भारतीय स्फोटके नियमांच्या परवान्याखाली ज्या जागेत, वाहनात बारी पदार्थ तयार केले जातात, ताब्यात ठेवले जातात, वापरले जातात, विकली जातात, वाहतूक अथवा आयात केली जातात अथवा कायद्याखालील अथवा त्याखालील नियमांचे उल्लंघन करून स्फोटके ठेवल्याबाबत विश्वास धरण्यास वाजवी कारण असेल अशा जागेत प्रवेश करू शकतील. तपासणी करू शकतील.

(ब) तेथे बारी पदार्थासाठी झडती घेऊ शकतील.

(क) तेथे सापडलेल्या बारी पदार्थाचे नमुने घेऊ शकतील. जर नमुने घेताना त्याची किंमत मागितली तर ती अदा करून नमुने घेऊ शकतील.

(ड) अशा अधिका-याची अशी खात्री झाली की, या कायद्याच्या अथवा त्या खालील नियमांच्या तरतुदींचा भंग झाला आहे. तर, तेथे सापडलेले बारी पदार्थ जप्त करून ताब्यात घेऊ शकतील अथवा तेथून काढू शकतील. अ.क्र । अधिकारी क्षेत्र 1 मुख्य स्फोटके निरीक्षक आणि स्फोटके निरीक्षक. त्यांचे संबंधित जिल्हे. जिल्हा दंडाधिकारी यांना दुय्यम असलेले त्यांचे संबंधित कार्यक्षेत्र. सर्व विद्यावेतनधारी दंडाधिकारी 4 सर्व पोलीस आयुक्त आणि निरीक्षक यांच्याहून आपला अधिकार पोहचत असलेले क्षेत्र कमी दर्जा नसलेले सर्व पोलीस अधिकारी 5 उपनिरीक्षकाहून कमी दर्जा नसलेले सर्व पोलीस अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रात

2. जेव्हा मुख्य निरीक्षकाहून निराळा अधिकारी बारी पदार्थ जप्त करील, राखून ठेवील अथवा काढून घेईल तर त्यांनी आपला अहवाल मुख्य निरीक्षक यांना तारेने कळवला पाहिजे. आणि जेव्हा जिल्हा प्राधिकारी नसलेला कोणताही अधिकारी वरीलप्रमाणे करील तर, त्यांनी आपला अहवाल तारेने संबंधित जिल्हा प्राधिकारी यांना कळवला पाहिजे.

3. दाबाखाली अथवा द्रवरूप स्थितीत सिलिंडरमध्ये साठवलेला कोणताही गॅस भारत सरकारद्वारे या कायद्याचे कलम 17 खाली स्फोटके असल्याबाबत जाहीर करण्यात आला आहे. स्फोटकाचे मुख्य निरीक्षक, उप मुख्य निरीक्षक अथवा निरीक्षक किंवा सहाय्यक निरीक्षक यांच्या सूचनांव्यतिरिक्त कोणत्याही दंडाधिकारी अथवा पोलीस अधिकारी यांनी पोटनियम (1)(ड) मधील नमूद अधिकार गॅस काढून घेण्याच्या बाबतीत वापरू नयेत. 4. या कायद्यानुसार अथवा कायद्यातील नियमांनुसार जी कृती दंडनीय आहे ती करताना अथवा जेथे स्फोटके तयार केली जातात, साठवली जातात, रेल्वे बंदर, वाहन, जहाज, बोट अशा ठिकाणात अथवा ठिकाणाजवळ कोणी इसम अशी कृती करील, ज्यामुळे स्फोट अथवा आग घडून येईल, अशा इसमास कोणताही पोलीस अधिकारी वॉरंटविना अटक करू शकेल.

परिशिष्ट : 14 नियम - 148 (2) गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेल्या वस्तूंची हाताळणी, लेबले लावणे आणि पॅकिंग :- (1) **प्रस्तावना** :- पोलीस प्रयोगशाळेतून यशस्वीरित्या परिणाम मिळविण्याकरिता तपासी अधिकाऱ्यास पुन्हा त्या वस्तू हाताळणे, लेबल लावणे आणि त्यांचे पॅकिंग करण्याच्या योग्य पध्दतीची माहिती असणे आवश्यक आहे. तसे केले नाही तर महत्त्वाचे दुवे नष्ट होतील, व परिणामी तपासी अधिका-यास पुराव्याच्या साखळीमध्ये कमकुवत दुव्यांना बळकटी देता येणार नाही किंवा अपराध्यास शासन करण्याइतपत उपयुक्त ठरेल अशा हरवलेल्या दुव्यांची सांगड घालता येणार नाही.

(2) **हाताळणी** :- (अ) निशाणीच्या पॅकिंगच्या केले अगोदर योग्यरीत्या त्याची हाताळणी करण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जर हाताळणी निष्काळजीपणे असेल, तर पॅकिंग निरूपयोगी ठरते. वस्तूच्या हाताळणीचे सर्वसाधारण नियम म्हणजे ती शक्यतो कमीत-कमी हाताळणे आणि अशाप्रकारे हाताळणे की, जवळजवळ तिच्या मूळ स्वरूपात राहील. वस्तूंवर बोटांचे ठसे, धूळ. केस इ.असण्याची शक्यता असते. किंवा अशा वस्तू असू शकतात की, ज्या निष्काळजीपणाने हाताळण्याने बिघडू शकतात किंवा जागेवरून हालू शकतात. त्याचप्रमाणे कपड्यावर मिळून येणारे केस किंवा धूळ हे त्या कपड्यावरच मिळाल्यावर महत्त्वाचे ठरू शकतात. परंतु जर ते इतरत्र सापडले तर निरूपयोगी ठरतात. बंदूक किंवा खंजीरावर गुन्हेगाराने खून करताना वापरल्याने त्यावर त्याच्या बोटांचे ठसे असू शकतात, आणि अशा वस्तूंच्या निष्काळजीपणाने हाताळण्याने त्यावरील बोटांचे ठसे पुसले जाऊ शकतात. वरील तत्त्वे ही चल तसेच अचल दोन्ही वस्तूंना समान लागू पडतात.

(ब) घटनास्थळी दिसणाच्या वस्तू पाहताक्षणी उचलण्याचा मोह टाळला पाहिजे. वस्तू स्पर्श करण्यापूर्वी काळजीपूर्वक तपासली पाहिजे, आणि ती सर्वात चांगल्या प्रकारे कशी हाताळली पाहिजे हे ठरविले पाहिजे. त्यावेळी हे ध्यानात ठेवले पाहिजे की, हाताळणीमुळे कोणत्याही अशा खुणा अस्ताव्यस्त होता कामा नये, किंवा पुसून जाता कामा नये. त्या नंतर अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात.

(क) प्राथमिक तपासणी केल्यानंतर (वस्तू हाताळण्यापूर्वी)आणि ते निश्चित कोणत्या ठिकाणी सापडले यांची लेखी नोंद घेतल्यानंतर ती वस्तू खालीलपैकी एका प्रकारे हाताळावी, जेणेकरून त्यावरील बोटाचे ठसे किंवा इतर दुवे जपले जातील. सर्वसाधारण नियम-ज्यावर बोंटांचे ठसे असण्याची शक्यता आहे. अशा वस्तूला अशा ठिकाणी पकडा की ज्या ठिकाणी त्यापूर्वी वापरणाराने हाताळणे असंभवनीय आहे. उदा.

(1) पिण्याचे भांडे त्याच्या काठाला एक बोट व त्याच्या तळाशी अंगठा लावून उचलावे.

(2) तुटलेल्या काचेचा तुकडा त्याच्या कडाने धरावा.

(3) बाटली गळ्याच्या काठाला एक हात आणि तळाला एक हात लावून उचलली पाहिजे.

(4) चाकू किंवा अग्नीशस्त्र पात्याच्या आणि मुठीच्या टोकाशी बोटाने धरून उचलले पाहिजे.

(5) कागदाचा तुकडा लहान चिमटयाने उचलला पाहिजे इ. वरील वस्तू तपासी अंमलदाराला सर्वसाधारण मिळून येणा-या वस्तूपैकी काही वस्तू आहेत. वस्तूंची हाताळणी प्रत्येक प्रकरणाच्या

परिस्थितीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. प्रत्येक वस्तूला त्यावर लेबल लावून स्पष्टपणे निशाणी द्यावी. ही निशाणी कधीही प्रत्यक्ष त्या वस्तूवर करू नये.

(3) **लेबल लावणे** :- जेणेकरून त्वरित ओळखता येईल अशा रितीने प्रत्येक वस्तू किंवा नमुना यावर निश्चित रितीने लेबल लावले पाहिजे. लेबलवर जप्तीचा दिनांक व वेळ, गुन्हा क्रमांक आणि प्रकरणाची कलमे जप्त करणा-या अधिका-याची सही याचा तपशील असावा. जप्तीच्या वेळी हजर असणा-या साक्षीदारांच्या साक्षीची जप्ती यादी लक्षात न घेता ही लेबले लावली जातात. लेबल पुराव्याचा सलगपणा सिद्ध करणारे पूर्ववृत आहे. वस्तूची प्रयोगशाळा नमुना तपासणी करण्यात अडथडा निर्माण करणार नाहीत, अशा रितीने लेबले बांधली पाहिजेत.

(4) **पॅकिंग** :- (अ) तपासी अधिका-याने वस्तूची पॅकिंग करण्याची पध्दत अवलंबताना हे प्रश्न स्वत:ला विचारले पाहिजेत की त्यामुळे (i) ने-आण करण्यातील नुकसान.

(ii) पॅकिंगमुळे किंवा बाहेरील वस्तूंमुळे दूषित होणे.

(iii) हिसके बसणे किंवा चिरडण्यामुळे यांत्रिक नुकसान.आणि

(iv) गळती, स्फोट, आग लागणे इ. यामुळे नुकसानीचा धोका. यापासून वस्तूचे नुकसान टळणार आहे किंवा कसे प्रत्येक वस्तू वेगळी पॅकिंग केली पाहिजे आणि ती इतर वस्तूंच्या संपर्कात येऊ देऊ नये. जबाबदार पोलीस अधिका-याला ती प्रयोगशाळेत घेऊन जाण्यास नियुक्त केले पाहिजे, आणि पुराव्याची सत्यता सिध्द करण्यासाठी त्याला न्यायालयात तपासले पाहिजे. जर पोस्टाने पाठविणे असेल तर ते नेहमीच नोंदणीकृत डाकेने पाठवायचे पाहिजे, आणि आवश्यक भासल्यास त्याची पोच पावती न्यायालयात हजर करण्यासाठी जपून ठेवावी. (ब) इतर सावधगिरी :- खालील दोष टाळण्यासाठी विशेष काळजी घ्यावी.

(i) ओल्या किंवा खराब कंटेनरचा वापर ज्याचा विशेष गंध येतो ज्याची बुचे घाणेरडी अथवा अयोग्य असतील, असे कंटेनर वापरणे.

(ii) ने-आण करताना अपु-या संरक्षणाच्या काचेच्या बाटल्या किंवा नाजूक कंटेनर

(iii) ने-आण करताना चिरडले जाऊ शकतील, आणि जे सुरक्षितपणे बंद करता येऊ शकणार नाहीत अशा पातळ कार्डबोर्डाचा वापर.

(iv) पावडरकरिता साध्या पाकिटांचा वापर.

(v) अनेक वस्तू एकत्रितरित्या असुरक्षितपणे एका पुडक्यामध्ये गुंडाळणे.

(vi) सिलींग वॅक्सचा सढळ हाताने उपयोग.

(vii) एका वस्तूचा दुस-या वस्तूशी संपर्क येऊन दूषित होणे. पुराव्याच्या निशाण्या व ताब्यातील नमुने यांची अबाधित स्थिती ते नमुने जप्त केल्यापासून ते प्रयोगशाळेत त्याचे परीक्षण होईपर्यंत सुरक्षित ठेवले पाहिजेत. वस्तू त्वरित पॅकिंग, सिलींग आणि लेबलींग केले असल्यास ते उत्तम प्रकारे करता येते. आणि अशा नमुन्यांच्या सचोटीची सातत्यता सिध्द करण्यासाठी ते घेऊन जाणारा किंवा संदेश

वाहकाने न्यायालयात शपथेवर साक्ष दिली पाहिजे की, त्याला जे मिळाले होते ते सीलबंद होते. आणि ते त्याच स्थितीत प्रयोगशाळेत पोहचते केले होते. प्रयोगशाळेने असे प्रमाणित केले पाहिजे की, सीलांची त्यांनी पडताळणी केली होती, आणि त्यांना ते बरोबर आढळून आले. पॅकिंग केल्यानंतर वस्तू एकमेकांपासून वेगळ्या ठेवाव्यात, आणि वाहनातूनदेखील संपर्क टाळण्याचा काळजीपूर्वक प्रयत्न करावा.

**(क) काही नमुनेदार वस्तूंच्या आदर्श पॅकिंगकरिता काही सूचना पुढीलप्रमाणे**.

(i) कपड्यांकरिता (रक्त, वीर्य, धूळ इ.सह)-जर दमट असतील, तर पॅकिंगपूर्वी ते सावलीमध्ये नैसर्गिक उष्णतेत वाळू दिले पाहिजेत. प्रवाही किंवा घट्ट झाल्यानंतर त्याची नोंद केली पाहिजे. डाग शक्यतो सपाट पृष्ठभागावर येतील अशाप्रकारे कापडाच्या घड्या घातल्या पाहिजेत, आणि नंतर प्रत्येक कापड निरनिराळ्या कागदामध्ये गुंडाळावे. तज्ञाला वस्तू शक्यतो ती सापडल्याच्या वेळच्या मूळ स्थितीत मिळाली पाहिजे, असा नियम आहे.

(ii) द्रवपदार्थाकरिता :- स्वच्छ, कोरडी, अरुंद तोंडाची आणि काचेच्या बुचाची बाटली वापरली पाहिजे.

(iii) विषबाधेच्या प्रकरणामधील वस्तूकरिता :- शल्य चिकित्सा करणा-या वैद्यकीय अधिका-यास प्रत्येक इंद्रिय मोठ्या तोंडाच्या काचेचे बुच असलेल्या काचेच्या कंटेनरमध्ये ठेवण्याबाबत विनंती करणे, हे तपासीक अंमलदाराचे कर्तव्य आहे. यासाठी कधीही धातुची कंटेनर, अथवा बुचे वापरू नयेत. इंद्रियामध्ये कोणतेही जंतुनाशक मिसळू नयेत. बुच सुरक्षितपणे वैद्यकीय अधिका-याने सील करावे अर्सेनीक विषबाधेच्या संशयित प्रकरणामध्ये नखांचे तुकडे आणि केस पाठवले पाहिजेत. गुन्ह्याच्या ठिकाणाहून जमिनीवर काही डाग किंवा उघड्या भांड्यामधील, जसे पिण्याच्या पात्रातील द्रव्य प्रयोगशाळेतील तपासण्यांकरिता राखून ठेवले पाहिजे. कोरड्या मोठ्या वस्तूंकरिता चांगल्या झ ाकणाच्या मोठ्या तोंडाच्या बाटल्या वापराव्यात.

(iv) छोट्या कोरड्या वस्तूंच्या नमुन्याकरिता :- वस्तू बाहेर पडणार नाहीत असे स्वच्छ कागदी आवरण वापरावे. ने-आण करताना नुकसानीपासून बचाव करण्याची योग्य ती काळजी घेतली असल्यास पावडर, धूळ इ. च्या पॅकिंगकरिता बुचाच्या स्वच्छ परीक्षानळ्या खूपच उपयुक्त ठरतात. कोरड्या मोठ्या नमुन्यासाठी स्वच्छ मोठ्या तोंडाच्या चांगले झाकण असलेल्या बाटल्या वापराव्यात.

(v) दस्तऐवजांकरिता:- दस्तऐवज दुमडू नयेत म्हणून पुठ्यांच्या तुकड्यांमध्ये किंवा तशाच कडक वस्तूमध्ये ठेवले पाहिजेत. जर जळालेल्या कागदावरील लिखाणाबाबत अभिप्राय मागवायचा असेल, तर तो अत्यंत काळजीबाबत जमा करावा. जळालेला कागद पुढील रितीने काढला पाहिजे. काचेचा तुकडा डाव्या हातात धरावा जेणेकरून तो कागदाच्या शक्य तितक्या जवळ राहील. आणि जळालेला कागद हळूवारपणे काचेचा तुकड्यावर फुकावा. त्यानंतर जळालेल्या कागदावर ग्लिसरीन सारख्या फिक्सेटीवने ओलसर करावा. त्यानंतर अतिशय काळजीपूर्वक रितीने जळालेला तुकडा सपाट करावा,

आणि काचेचा तुकडा त्यावर ठेवावा, जेणेकरून जळालेला कागद दोन तुकड्यांमध्ये दाबला जाईल, आणि ते सर्व लाकडी चौकटीत बसवून तज्ञाकडे पाठविले पाहिजे.

(vi) कधीकधी तपासीक अंमलदारास कुजलेली प्रेते किंवा मानवी शरीराचे अवयव मिळून येतात जे शवचिकित्सेकरिता खूप दूरपर्यंत वाहून न्यावे लागतात. प्रेताला सूर्यप्रकाशात उघडे न ठेवणे व प्रेताच्या खाली व संपूर्ण प्रेतावर साध्या वापरावयाच्या मिठाचा मुक्तपणे शिडकाव केल्याने आणखी सडण्यापासून वाचवता येईल. दुस-या पद्धतीने त्यावर कोळशाची पावडर पुरेशा प्रमाणात टाकून त्यावर चादर गुंडाळावी. मानवी शरीराच्या अवयवाच्या बाबतीत शक्य असल्यास ते स्पिरीटमध्ये बुडवून ठेवल्यास अधिक काळ टिकण्यास मदत होईल. अशावेळी वायुरोधक झाकणे असणारी स्वच्छ कंटेनर वापरली पाहिजेत. थोडक्यात जेव्हा गुन्ह्याच्या घटनास्थळी विशेष कंटेनर किंवा पॅकिंगच्या वस्तू उपलब्ध असतील. तेव्हा तपासीक अंमलदाराने वरील सर्वसाधारण तत्त्वे लक्षात ठेवून आणि इतर योग्य व सहजासहजी उपलब्ध होणारी उपकरणे वापरावीत हे लक्षात घ्यावे. प्रत्येक कंटेनरवर प्रकरण क्रमांक, कलमे आणि सापडल्याचे ठिकाण याचा तपशील दर्शविला पाहिजे, आणि बांधलेल्या जागी व गाठींवर विशेष सील करावे.

**(ड) ओळखीची पत्रे** :- तपासणीस पाठवलेल्या प्रत्येक वस्तू किंवा वस्तूच्या गठ्यासोबत ओळखीचे पत्र स्वतंत्रपणे दिले पाहिजे. जे संदेशवाहकाने स्वत: नेले पाहिजे, किंवा पोस्टाने पाठवले पाहिजे. त्या पत्रावर बाहेरील बाजूस संबंधित वस्तूच्या पार्सलवरील ओळखीच्या खुणांशी संबंध जोळणारे काही तरी साधन असले पाहिजे. त्यामुळे प्रयोगशाळेतील काम सुलभ होईल. अशा ओळखीच्या पत्रावर पोलीस ठाणे, प्रकरणाचा क्रमांक आणि कलमे, पॅकिंगकरिता वापरलेल्या नमुना सील प्रकरणांची थोडक्यात हकिकत कोणत्या परिस्थितीत वस्तू हस्तगत केल्या आणि प्रयोगशाळेत त्या पाठवण्याची कारणे याचा उल्लेख करावा. यामुळे प्रयोगशाळेत काम करणा-याचा किमती वेळ आणखी वाचू शकेल. (मध्यवर्ती अन्वेषण प्रशिक्षण शाळा- टिपा)

**परिशिष्ट** : 15 **नियम**- 150 (3):- संचालक, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा आणि राज्य रासायनिक विश्लेषक यांच्याकडे वस्तू पाठवण्यासाठी सूचना :-गोंधळ आणि दुप्पट काम टाळण्यासाठी व परीक्षणार्थ पाठवलेल्या प्रकरणास विलंब होऊ नये म्हणून वस्तू संचालक, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा आणि राज्य रासायनिक विश्लेषक यांना पाठवताना एक समान व योग्य पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. खालील सूचना निरपवादाने पाळाव्यात

(1) पाठवणाच्या अधिका-यांनी सर्व पत्रव्यवहार योग्य व संपूर्ण पत्ता जिल्ह्यासह दिला पाहिजे.

(2) जर प्रत्येक प्रकरणात स्वतंत्र प्रमाणपत्र हवे असेल, तर प्रत्येक प्रकरणात स्वतंत्र अग्रेषण पत्र पाठवावे, अन्यथा एकच प्रमाणपत्र अदा केले जाईल.

(3) प्रयोगशाळेकडे केला जाणारा सर्व पत्रव्यवहार इंग्रजीतून केला पाहिजे.

(4) अग्रेषण पत्रात पाठवलेल्या वस्तूचे वर्णन, गुन्हा क्रमांक व भारतीय दंड विधान कलम यांचा समावेश असावा.

(5) पत्रातील मजकुराशी जुळण्याकरिता अग्रेषण पत्राचा जावक क्रमांक व गुन्हा क्रमांक योग्यरित्या दर्शवून प्रत्येक वस्तूस नीटपणे लेबल लावले पाहिजे.

(6) सर्व नमुने सिलींगबॅक्सने व्यवस्थित सील करावेत. आणि त्यावर नाणे, बटणे, चाव्या किंवा इतर सर्वसामान्य वस्तूंनी सील न करता कार्यालयीन चिन्हाने ठसे उमटवावेत. जे नमुने केवळ कागदाने सील केले असतील, किंवा ज्यावर पंचाच्या सह्या नसतील, किंवा कार्यालयीन चिन्हाचे ठसे नसतील, ते नमुने सीलबंद नमुने म्हणून विचारात घेतले जाणार नाहीत, पंचाच्या पेपर सील व्यतिरिक्त सिलींगवॅक्सचे कार्यालयीन चिन्हाचे सीलही असावे.

(7) नमुने सील करण्याकरिता वापरलेल्या सीलची एक प्रत निरपवादाने प्रत्येक अग्रेषण पत्रासोबत पाठवली पाहिजे.

(8) वैद्यकीय अधिका-याने गोळा केलेला व्हिसेरा, उलटी, मूत्र, रक्त आणि स्लाईडस् त्यांनी स्वत: संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस शिपायामार्फत न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवले पाहिजेत.

(9) चरस, भांग, गांजा, अफू, दारू, वॉश रक्ताने माखलेले आणि वीर्याचे डाग असलेले कपडे पोलीस उपनिरिक्षकांनी थेट न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे त्याच्या स्वत:चे सील आणि अग्रेषण पत्रासह पाठवले पाहिजे. ते वैद्यकीय अधिकारी, सिव्हिल सर्जन, पोलीस अधीक्षक किंवा दंडाधिका-यांमार्फत पाठवण्याची आवश्यकता नाही.

(10) विषबाधेच्या प्रकरणामध्ये रुग्णाचा संपूर्ण इतिहास दिला पाहिजे. अन्यथा अशा माहितीविना विष बाधेच्या प्रकरणात कोणत्याही तपासण्या करणे शक्य होणार नाही.

(11) मूत्र, उलटी, रक्त इ. पाठवण्यासाठी छापील नमुना क्रमांक सी.एम.24-इ.।। वापरावा
आणि फक्त व्हिसेरा पाठवण्यासाठी नमुना क्रमांक सी.एम.23 इ-। वापरावा. हे नमुने व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, येरवडा, पुणे येथून पुरविले जातात.

(12) न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकरिता नेमलेल्या पोलीस शिपायांना तेथे गणवेषात व योग्य ओळखपत्रासह हजर होण्याच्या सूचना द्यावात. त्यांनी परत येतांना किती व कोणत्या स्वरूपाच्या वस्तू परत घेऊन याव्यात याबाबत सविस्तर सूचना द्याव्यात.

(13) ज्या शिपायाने प्रमाणीत व्हिसेरा पेटी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे आणली असेल, ती त्याने परत नेण्याच्या सूचना दिल्या पाहिजेत. जेव्हा अशा पेट्या रेल्वे पार्सलने पाठवल्या जातात, तेव्हा त्या पुन्हा कोणत्या नजीकच्या रेल्वे स्थानकावर पाठवाव्यात हे नमूद करावे.

(14) या कार्यालयाचे प्रमाणपत्र क्रमांक आणि तारीख असलेले प्राधिकारपत्र पोलीस शिपायाने त्याच्याबरोबर आणल्यानंतरच नमुने परत केले जातात. अन्यथा असे नमुने शोधणे अशक्यप्राय असते. प्रमाणपत्र दिल्यानंतरच नमुने परत केले जातात.

(15) व्हिसेरा, उलटी, रक्त, मूत्र इ. हे विश्लेषणामध्ये खर्च केले जातात, आणि ते कधीच परत केले जात नाहीत. इतर नमुने प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून 15 दिवसांत न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेतून

हलवले पाहिजे, अन्यथा ते नाश केले जातात. न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे नमुने पोस्टाने किंवा रेल्वेने परत करण्याची सोय उपलब्ध नाही.

(16) न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकरिता असलेली रेल्वे पार्सल नेहमीच uहोम डिलीव्हरी पेडड पद्धतीने पाठवावीत. आणि त्यांची आगाऊ नोंदणी यथास्थिती मध्य रेल्वेसाठी मुंबई सी.एस.टी किंवा पश्चिम रेल्वेकरिता चर्चगेट येथे करावी.

(17) एखाद्या विशिष्ट प्रकरणातील रक्ताचे डाग असलेल्या सर्व वस्तू वेगवेगळ्या किंवा हप्त्याहप्त्याने न पाठविता एकत्रितरित्या एकाच वेळी पाठवल्या पाहिजेत. हे गोंधळ व दुप्पट काम टाळण्यासाठीच नाही तर कलकत्ता येथील रक्त जल शास्त्रज्ञेस (सेरालॉजीस्ट) प्रत्येक राहिलेल्या नमुन्याकरिता रुपये 25/-प्रमाणे पुन्हा अदा करावे लागु नये यासाठी आवश्यक आहे.

18) न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवलेल्या पत्रांची पोहोच जर पोलीस शिपाई खालील नमुन्यामध्ये पोच पावतीबरोबर घेऊन येत असेल, तरच दिली जाते. इतर कोणतीही पोच दिली जात नाही.

# एनडीपीएस कायद्यांतर्गत मालमत्ता जप्ती, गोठविणे व ताब्यात घेणे.

अंमलीद्रव्यांसदर्भातील गुन्हे/अपराध हे अन्य बहुसंख्य अपराधांप्रमाणेच केवळ नफा/फायदा लाटण्याच्याच हेतूनेच प्रेरीत असतात किंवा काही ना काही लाभ मिळविण्याच्याच उद्देशाने होतात. अंमतलीद्रव्य विरोधी लढ्यातील किंवा अंमलीद्रवव्यांच्या अवैध वाहतुकीसंदर्भात एका व्यूहरचना म्हणजे अशा वाहतूकदारांना अशा चोरट्या मार्गाने अवैधरित्या अंमलीपदार्थांची वाहतुक केल्यामुळे मिळणा-या फायद्यांपासून वंचित वा दूर ठेवणे होय. एनडीपीएस कायद्यातील प्रकरण अशी तरतूद करते की, अशा प्रकारच्या अवैधरित्या जमा केलेल्या मिळविलेल्या मालमत्तेस व ताब्यात घेण्यात आले पाहिजे. हे प्रकरण खालील बाबतीत लागू होते.

अ) प्रत्येक व्यक्ती जी काहीतरी गुन्हे/अपराधाबद्दल दोषी ठरलेली आहे, की जो गुन्हा या कायद्यातंर्गत शिक्षापात्र असेल आणि अशी शिक्षा ही दहा वर्षे वा अधिक कालावधीच्या कारावासासाठीची तरतूद करणारी असेल,

ब) प्रत्येक व्यक्ती जी अशाच प्रकारच्या गुन्हे/अपराधास्तव भारता बाहेरील फौजदारी न्यायकक्षेअंतर्गत सक्षम अशा न्यायालयाकडून दोषी ठरली असेल.

क) प्रत्येक व्यक्ती, जी ज्याच्या संदर्भात, डांबून ठेवण्याचा आदेश हा 1988 अंमलीद्रव्य आणि मतिगुंग करणाच्या पदार्थाच्या विरोधी कायद्यातील अवैध वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत देण्यात आलेला असेल किंवा जम्मू-काश्मीर अंमलीपदार्थ द्रव्य व मतिगुंग करणाच्या पदार्थ विरोधी कायदा, 1988 देण्यात आलेला असेल. तथापि, असा डांबून ठेवण्याचा आदेश हा रद्दबातल ठरविण्यात आलेला नाही वा काढून घेण्यात आलेला नाही, जो अशा कायद्याच्या अंतर्गत स्थापित सल्लागार समितीच्या अहवालावरून होऊ शकतो, किंवा अशा प्रकारे डांबून ठेवण्याचा आदेश हा सक्षम न्यायकक्षा असलेल्या न्यायालयाने बाजूला सारलेला नाही. प्रत्येक व्यक्ती जी अटक करण्यात आली असेल किंवा ज्याच्या विरोधात वॉरंट अथवा अटकेचा आदेश हा जारी करण्यात आलेला असेल आणि या कायद्यांतर्गत शिक्षापात्र असलेला गुन्हा केल्याप्रकरणी दहा वर्षाच्या कारावासाकरीता किंवा अधिक काळाकरिता असा आदेश देण्यात आलेला असल्यास किंवा प्रत्येक व्यक्ती ज्यास अटक करण्यात आली असेल किंवा ज्याच्याविरुद्ध वॉरंट वा अटक करण्याचा अधिकार प्रदान केलेला असेल, तो जारी करण्यात आला असेल आणि अन्य कोणत्या देशातील तशाच प्रकारच्या कायद्यांतर्गत तशाच प्रकारचा गुन्हा/अपराध केल्याप्रकरणी आदेश देण्यात आलेला असेल. अ) प्रत्येक व्यक्ती जी अशा व्यक्तीची नातेसंबंधातील असेल ज्याचा संबंध हा उपकलम (अ) किंवा उपकलम (ब) किंवा उपक्रम (क) किंवा उपकलम (कक) अंतर्गत संदर्भित करण्यात आला आहे. ब) प्रत्येक सहयोगी, जो अशी व्यक्ती की ज्याचा संदर्भ हा उपकलम (अ) किंवा उपकलम (ब) किंवा उपकलम (क) किंवा उपकलम (कक) अंतर्गत संदर्भित करण्यात आला आहे. क) कोणताही धारक (यानंतर येथून पुढे हे उपकलम विद्यमान धारक या नावाने संबोधण्यात येईल.जो कोणतीही मालमत्ता जी

यापूर्वी कोणत्याही वेळेस त्या व्यक्तीने बाळगलेली असेल, ज्याचा संदर्भ हा उपकलम (अ) किंवा उपकमल (ब) किंवा उपकलम (क) किंवा उपकलम (क क) अन्वये असेल, जोपर्यंत की अन्य धारक हा किंवा ज्याप्रमाणे प्रकरण असेल तसे जी कोणीही अशी मालमत्ता धारण करीत असेल, अशा व्यक्तीच्या नंतर आणि विद्यमान धारकाच्या आधी, पुरेशा विचारार्थ सद्हेतूने स्थानांतरकर्ता आहे वा होता.

**प्रक्रिया** :-

1) प्रत्येक अधिकारी जी कलम 53 अन्वये अधिकार प्रदानित आहे, आणि प्रत्येक प्रभारी अधिकारी पोलीस ठाण्याचा यांनी माहिती मिळताक्षणी तपासकार्य हे सुरू केले पाहिजे आणि अवैधरित्या जमविलेल्या मालमत्तेला हुडकून काढले पाहिजे. (कलम 68 इ).

2) अधिकारी हा मालमत्ता जप्तीचा आदेश हा देऊ शकतात, आणि जर जप्त करणे शक्य नसेल तर अशी मालमत्ता ही गोठविण्यात तरी आली पाहिजे. त्याने अशा आदेशाची प्रत ही 48 तासांच्या आत सक्षम अधिका-यांकडे पाठविली पाहिजे.

3) सक्षम अधिका-याने 30 दिवसांच्या आत अशा आदेशावर शिक्कामोर्तब केले पाहिजे, अन्यथा तो वैध ठरणार नाही.

4) सक्षम अधिकारी परिणाम झालेल्या व्यक्तीस नोटीस बजावू शकतात आणि त्यांचे उत्तर वा प्रतिसाद अजमावल्यावर तसेच प्रकरणाबाबतची अन्य माहिती/नोंदी तपासल्यानंतर मालमत्ता ताब्यात घेण्याचा आदेश हा देऊ शकतात वा अन्यथा तसे काही.

5) जर व्यक्तीस केवळ अटक करण्यात आली असेल, तर नोटीस जारी करण्याचे व त्यानंतरची ताब्यात घेण्याची प्रक्रिया ही त्याला दोषी धरल्यानंतर पुढे मार्गस्थ होऊ शकते, किंवा प्रतिबंधात्मकरित्या डांबून ठेवण्याच्या आदेशानंतर जारी करू शकतो.

6) मालमत्ता ही अवैधरित्या मिळविण्यात आलेली नाही हे सिद्ध करण्याचे दडपण हे शेवटी ज्या व्यक्तीवर त्याचा परिणाम झाला असेल त्याचीच असते.

7) ताब्यात घेण्यात आलेल्या मालमत्तेकरिता ताब्यात घेण्याविषयी आदेशाविरोधातील अपील अपिलेट लवाद मंडळाकडे असते.

8) जप्त करण्यात आलेली वा ताब्यात घेण्यात आलेल्या मालमत्ता ह्या प्रशासकांद्वारे व्यवस्थापन करून व विल्हेवाट लावण्यात येत असतात. अवैधरित्या मिळविलेल्या मालमत्ता (मिळाल्याबद्दल व्यवस्था वा देखभाल केल्याप्रकरणी व विल्हेवाट लावल्याप्रकरणी) नियमावलीनुसार आतापर्यंत तरी भारत सरकारद्वारेच नेमणूक करण्यात आलेले अधिकारी हे सक्षम अधिकारी वा प्रशासक म्हणून नियुक्त होतात. फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 102 कलम विशिष्ट मालमत्ता जप्त करण्यासंदर्भातील

# मुद्देमालासंबधी पोलिस अधिका-यांचे अधिकार व कर्तव्य

1) कोणताही पोलीस अधिकारी कोणतीही मालमत्ता जप्त करू शकतो, जी चोरण्यात आलेली असावी, असा संशय आहे अथवा तसा आरोप आहे, किंवा जी अशा काही परिस्थिती अंतर्गत सापडलेली असेल की, जे कोणत्याही गुन्हे अपराध केल्याचा संशय निर्माण होत असेल.

2) असा पोलीस अधिकारी, जो पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिका-यास असेल त्याने त्यापुढे अशा जप्तीबाबत अधिका-यास कळविले पाहिजे.

3) प्रत्येक पोलीस अधिकारी जो उपकलम (1) अंतर्गत कार्यरत असेल, त्याने अशा न्यायदंडाधिका-यास जप्तीबाबतचा अहवाल हा सादर केला पाहिजे, ज्यास त्याबाबतची न्यायकक्षा असेल आणि ज्याठिकाणी मालमत्ता जप्त करण्यात आलेली अशी असेल की, ती सुविधाजनकपणे न्यायालयास वाहतुकीने वा स्थानांतरित करता येणे शक्य नसते, किंवा ज्याठिकाणी अशा मालमत्तेचा ताबा घेण्याकामी योग्य अशा राहण्या-ठेवण्याच्या जागेची अडचण असेल तर किंवा तपास करण्याच्या दृष्टीने हेतूने अशी मालमत्ता पोलीस ठाण्यात रोखण्याची कायमच अशी काहीएक गरज नसेल तर तो त्याकरिता कोणत्याही व्यक्तीकडे त्यांचा ताबा देऊ शकतो, व त्यासाठी त्याचे प्रतिज्ञापत्रही लिहून घेऊ शकतो, की ज्यानुसार तो अशी मालमत्ता ही न्यायालयास जेव्हा केव्हाही सादर करणे आवश्यक आहे. तेव्हा ती सादर करेल आणि अशा मालमत्तेच्या विल्हेवाटीसाठी न्यायालय जे काही आदेश पुढे देतील त्यांच्या परिणामस्वरूप तो त्यास प्रतिसाद देऊन परिणाम साधेल. तथापि, ज्याठिकाणी जप्त करण्यात आलेली मालमत्ता ही उपकलम (1) अंतर्गतची असेल ती अतिशय वेगवानपणे व नैसर्गिकरित्या कुजण्याचीच शक्यता आहे, आणि अशा मालमत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असलेली व्यक्ती ही माहीतच नसेल किंवा गैरहजर असेल आणि अशा मालमत्तेची मूल्य हे पाचशे रुपयांपेक्षा कमी असेल तर ते लिलावाद्वारे विकण्यात येऊ शकते, व त्याकरिता पोलीस अधीक्षक यांच्या आदेशांतर्गत कार्यवाही करण्यात आली पाहिजे, आणि कलम 457 व 458 मधील तरतुदी ह्या जेवढ्या प्रत्यक्षात शक्य असतील तेवढ्या अशा विक्रीच्या निव्वळ रकमेस लागू असतील. प्रश्न (क) च्या बाबतीत आतापर्यंत झालेल्या चर्चेच्या घोषवारा लक्षात घेता, आम्ही असे मानतो की, किशोर शंकर शिंगणापूरकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य सुप्रा या खटल्यातील न्यायनिवाडा हा आणि त्याचप्रमाणे मेसर्स बॉम्बे सायन्स अँन्ड रिसर्च एज्युकेशन इन्स्टिट्यूट विरुद्ध महाराष्ट्र राज्य याद्वारे योग्य असा कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा असे सांगतो की, फौजदारी डब्ल्यू पी. 3198/2009 आणि अन्य याचिका कागदपत्रे/दस्ताऐवज न्यायालय महाराष्ट्र राज्य वि. तपस डी. नियोग यांचा व्यवस्थितरित्या अन्वयार्थ काढण्यात आलेला नाही, विशेषतः मेसर्स बॉम्बे सायन्स अँन्ड रिसर्च एज्युकेशन इन्स्टिट्यूट विरुद्ध महाराष्ट्र राज्य या खटल्यात हा प्रश्न त्यामुळेच त्यानुसारच उत्तरे देण्यात येऊन स्पष्ट करण्यात आला आहे.   थोडक्यात सारांशात, आम्ही पुढील प्रकारे उत्तरे देत आहोत.

# मुद्देमालसंबधीची प्रश्नावली

**प्रश्न अ**) 1973 च्या फौजदारी दंडप्रक्रिया संहिता अंतर्गतच्या कलम 102 च्या उपकलम (1) मध्ये वापरण्यात आलेली कोणतीही मालमत्ता शब्दाच्या अर्थात अचल मालमत्ता समाविष्ट होत नाही काय.
**उत्तर** : आम्ही त्यामुळेच, कोणतीही मालमत्ता या शब्दाचा अर्थ असा आहे की, या संज्ञेत अचल मालमत्ताचा समावेश हा होत नाही. प्रश्न (अ) हा त्यामुळे, नकारात्मक उत्तरात येतो.
**प्रश्न ब**) एखाद्या पोलीस अधिकारी हा कोणत्याही अचल अशा मालमत्तेचा ताबा हा घेऊ शकतो. काय की जो फौजदारी डब्ल्यू पी. 3198/2009 अंतर्गत सापडू शकते. आणि अन्य याचिकांची कागदपत्रे/परिस्थिती जी कोणताही गुन्हा-अपराध केल्याचा संशय निर्माण करील.
**उत्तर** : नाही. प्रश्न क) वरील पैकी कोणते दोन निकाल हे फौजदारी दंडप्रक्रिया संहिता कायदा, 1973 अन्वये कलम 102 अंतर्गत कोणतीही अचल मालमत्ता जप्त करण्यासंदर्भात पोलीस अधिका-याच्या संदर्भात योग्य असा कायदा प्रस्थापित करतात.
**उत्तर** : किशोर शंकर शिंगणापूरकर व्ही. खटल्यात. महाराष्ट्र राज्य आणि मेसर्स बॉम्बे सायन्स अ ॅण्ड रिसर्च एज्युकेशन इन्स्टिटट्यूट विरुद्ध महाराष्ट्र राज्य यात योग्य असा कायदा प्रस्थापित करत नाही, महाराष्ट्र राज्य विरुद्ध तपास डी. नियोग या निकालात नाही. या खटल्यातही त्याचा अन्वयार्थ हा योग्यरित्या काढण्यात आलेला नाही. हा प्रश्न त्यामुळेच त्यानुसार उत्तर देण्यात आला आहे.
**प्रश्न ड)** सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याद्वारे फौजदारी डब्ल्यू सी. 3198/2009 आणि अन्य याचिकांच्या कागदोपत्रांची जंत्री जी महाराष्ट्र राज्य विरुद्ध तपस नियोग (1999) एससीसी 685 हा केवळ बँकेची खाती जप्त करण्यापुरतीच मर्यादित नाहीत किंवा त्याची व्याप्ती ही अचल मालमत्ता जप्त करण्यापर्यंतदेखील वाढविता येऊ शकते, जसे की, खंडपीठाने मेसर्स बॉम्बे सायन्स अँन्ड रिसर्च एज्युकेशन इन्स्टिटट्यूट विरुद्ध महाराष्ट्र राज्य व अन्य 2008 या खटल्यात अन्वयार्थ काढलेला आहे.
**उत्तर** : सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्य वि. तपस नियोग या खटल्यात ठरवून दिलेल्या कायद्यानुसार केवळ बँक खात्यांची जप्तीपुरताच निर्बंध वा मर्यादित असून त्याची व्याप्ती ही अचल मालमत्तापर्यंत वाढविता येणे शक्य नसते. जसे की, मेसर्स बॉम्बे सायन्स आणि रिसर्च एज्युकेशन इन्स्टिटट्यूट विरुद्ध महाराष्ट्र राज्य व अन्य या खटल्यात अन्वयार्थ हा काढण्यात आलेला आहे. (आर.सी.चव्हाण जे.) (श्रीमती रोशन दळवी जे.) व अन्य याचिकाकर्ते कागदपत्रे, निकालाच्या घोषणापत्रावरून श्री. गडकरी सुविद्य ए.पी.पी. यांनी स्थगितीसाठी तोंडी अर्ज हा दाखल केलेला होता.
पूर्वपीठाचा न्यायनिवाडा निकाल हा केवळ त्यास संदर्भ देण्यात आलेल्या कायद्याच्या प्रश्नांचीच उत्तरे देत असतो, आणि त्यामुळेच आम्हास वरील आदेशास स्थगिती देण्याची सक्तीची म्हणावी अशी आवश्यकता दिसून येत नाही. तथापि न्यायनिवाड्याची प्रमाणित प्रत ही संबंधित पक्षकारांना प्राधान्य तत्त्वावर उपलब्ध करून दिलीच पाहिजे.

कलम 102 मध्ये वापरलेली कोणतीही मालमत्ता ही संज्ञा कोणतीही चल संपत्ती/ मालमत्ता एवढ्या अर्थानेच घेता येऊ शकत नाही. तर त्यामध्ये सर्व प्रकारच्या मालमत्तांचा समावेश हा व्हायलाच हवा, मग ती चल असते वा अचल आणि केवळ अचल संपत्ती/ मालमत्ता असल्याने ती न्यायालयात आणता सादर करता येऊ शकत नाही असे मानण्याचे कारण नाही. यासाठी की, अशा अचल संपत्तीचे सादरीकरण हे न्यायदंडाधिकारी यांच्यापुढे टायटल डीडस्, ताबा प्रमाणपत्र किंवा अर्ज कर पावत्या स्वरूपात न्यायालयात सादर करता येऊ शकतात. त्यामुळेच कलम 102 अंतर्गत मालमत्ता जप्त करण्याचा पुरेपूर अधिकार पोलीस अधिका-याला आहे मग ती मालमत्ता चल असो वा अचल.

कायद्यातील कोणत्याही तरतुदींचा अन्वयार्थ हा अशा पद्धतीनेच लावण्यात आला पाहिजे की, ज्याद्वारे ही बाब आश्वस्त होईल. गुन्हेगारांना गुन्ह्याची फळे ही कोणत्याही प्रकारे चाखण्याची संधीच मिळता कामा नये, असेही सूचविण्यात आले आहे की, न्यायालयाकडून मालमत्तेवर टाच वा जप्ती आणण्याकरिता विलंब झाला तर बळी वा पीडित व्यक्तीच्या हित वा स्वारस्यावर परिणाम हा होऊ शकतो. त्यामुळे या संज्ञांचा वापर हा अतिशय दक्षतापूर्वक करणे गरजेचे आहे.

# पोलीस ठाणे अधिकारी / अंमलदार

ग्रामीण भागातील प्रत्येक पोलीस ठाण्यात ठाणे अंमलदार हा पोलीस हवालदार दर्जाचा असतो, तर मुंबई शहरात पोलीस ठाणे अधिकारी / अमंलदार म्हणुन पोलीस उपनिरीक्षक किवा सहाय्यक पोलीस निरीक्षक दनाचा अधिकारी काम पहातो या ठाणे अंमलदार अधिकाऱ्याचं त्या त्याा पाळीत दिवस पाळी / रात्रपाळी ) पोलीस ठाण्यातील प्रत्येक घडामोडीवर प्रत्यक्ष नियंत्रण असते. त्याचे कडे पोलीस ठाणे दैनंदिनीचा चार्ज असतो.

**पोलीस ठाणे अंमलदाराची कर्तव्य :-**

- दुरध्वनीवरील संभाषण :- पोलीस ठाणे अंमलदार यांना नेहमी फोनवर संपर्क साधावा लागतो त्यावेळे आदरपुर्वक व विनम्र भाषोत बोलावे, आपले बोलणे मुद्येसूद व आटोपशीर असावे, बोलण्यात एकेरी शब्द वापरु नयेत. बोलणे स्पष्ट असावे वरिष्ठ अधिकारी किंवा ठाणे प्रभारी अधिकारी यांचे करीता फोन असल्यास विनाविलंब तो त्यांना द्यावा
- पोलीस ठाण्यात येणारा प्रत्येक तक्रारदार याचेशी सौजन्याने वागावे व त्यांच्या तक्रारीची दखल घेवून तक्रार तत्काळ नोंदवावा त्यांना उगाचे ताटकळत ठेवू नये.
- तक्रार देणाऱ्या व्यक्तीच्या तक्रारीवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक असल्यास ताबडतोब करावी किंवा न करता तशी कारवाई करणाऱ्या संबंधितांना आदेश द्यावेत, कायदेशीर कारवाई शक्य नसल्यास (दिवाणी किंवा अदखलपात्र गुन्हयात, तसे त्यांना स्पष्ट मार्गदर्शन देऊन संबंधित न्यायालयात जाण्याची समज द्यावी.
- प्रथम खबरीची प्रत तक्रारदारास विनामूल्य द्यावी
- ५) तक्रारदार, किंवा साक्षीदार इसम जखमी अवस्थेत असल्यास त्यांना तत्काळ शासकीय रुग्णालयात उपचारासाटो पाठवावे जर जखमी बरोबर जाणे आवश्यक असेल तर स्वतः रुग्णालयात जाऊन त्याचा जबाब नोंदवावा व वैद्यकिय अधिकाऱ्याकडुन त्यांच्या जखमांची सविस्तर माहिती घेऊन कारवाई करावी
- अकस्मात मृत्युच्या बाबतीत ताबडतोब इन्क्वेस्ट पंचनामा करुन प्रेत पोस्टमॉर्टमसाठी पाठवावे प्रेताची हेळसांड होणार नाही किंवा संबंधिताच्या भावना दुखावणार नाहीत याची काळजी घ्यावी
- महत्त्वाची घटना, गंभीर गुन्हे आणि विशेष घटनाबाबतची माहिती तत्काळ वरिष्ठांना देणे
- ८) चार्ज घेताना व देताना पोलीस ठाण्याचे लॉकअप चेक करावी. आरोपीच्या कायदेशीर सुविधांकडे लक्ष देवून लॉकअपमन आरोपी सुरक्षित असल्याबाबत खात्री करणे.

- ९) लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, हरविलेली व्यक्ती, स्त्रिया, अंधव्यक्ती यांना सौजन्याची व चांगली वागणूक द्यावी.
- १०) आरोपी अटकेबाबत मा. उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करावी.
- ११) पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीची स्टेशन डायरीत वेळेवर नोंद घ्यावी
- १२) दखलपात्र अपराधाची प्रथमखबर रजिस्टरला तत्काळ अपराधाची नोंद करावी व अदखलपात्र अपराधाचो अदखा रजिस्टर नोंद घ्यावी
- १३) महिला फिर्यादी व आरोपीशी सौजन्यपूर्ण वागणूक करावी. त्यांच्या तक्रारीची किंवा गाऱ्याण्याची महिला पोलीस अंमलदाराकडून चौकशी करावी,
- १४) मुद्देमाल व शस्त्रागार वेळोवेळी तपासावा
- १५) पोलीस स्टेशन मध्ये अनाधिकृत व्यक्ती प्रवेश करणार नाही. हल्ला करणार नाही केल्यास प्रतिकार करता येईल अशी अवस्था ठेवावी.
- १६) नियमित परेडवर कर्मचाऱ्यांना सूचना द्याव्या. दप्तर तपासणी करावी., नोटबुक व पेट्रोलवुक तपासावे त्याच प्रमाणे पोलीस ठाणे अंमलदारास भारतीय दंड संहिता, फौजदारी दंडप्रक्रिया संहिता, महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच संपूर्ण भोगोलिक व प्रशासकीय वादी पोलीस ठाण्याच्या ( हद्दीतील) संवेदनक्षम ठिकाणी, वादग्रस्त ठिकाण गुन्हेगार इत्यादी गोष्ट न असणे आवश्यक आहे. पोलीस ठाणे अंमलदाराच्या अंगी साजन्य न पक्षपातीपणा, कायद्याचे ज्ञान, शिस्त, निर्णय क्षमता, व वक्तशिरपणा हे गुण असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा गणवण नेहमी स्वछ निटनिटकेपणा असावा. तो एक आदर्श पोलीस अंमलदार म्हणून जनतेपुढे असावा

# बीट अंमलदार

पोलीस ठाण्याच्या गरजेनुसार ३ वा ४ किंवा त्यापेक्षा अधीक बिट मध्ये विभाजन केलेले असते. हि  विभागणी सर्वसाधारण भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या, गुन्हेगारीचे प्रमाण, संवेदनशिल ठिकाणे इत्यादी गोष्टी लखात घेवुन केलेली असते. प्रत्येक बिटसाठी खास स्टाफ दिलेला असतो. बिट प्रमुखास बिट अंमलदार/ बिट अधिकारी म्हणतात.

ग्रामीण भागात बिट प्रमुख म्हणुन कमीत कमी पोलीस हवालदार दर्जाचा अंमलदार असतो तर शहरी भागात / आयुक्तालयात बिट प्रमुख म्हणुन पोलीस उप निरीक्षक किवा सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी असतो. त्याचा मदतीस ७ ते १० पोलीस कर्मचारी असतात एक पोलीस रायटर असतो

## बिट अमंलदार / अधिकारी यांची कामे

- बीट अंमलदार व अधिकाऱ्याची कामे खालील प्रमाणे असतात.
- बीटमधील प्रतिष्ठित व्यक्ती, समाजसेवक, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी यांची अद्यावत माहिती रजिस्टरमध्ये ठेवावी व त्यांच्या संपर्कात राहावे.
- बीट मधील गुंड हिस्ट्रीशिटर, सराईत गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन गुन्हेगारांची माहिती काढुन गुन्हे व गुन्हेगारावर नियंत्रण ठेवावे.
- बीट मधुन आलेल्या तक्रारी अर्जाची चौकशी करुन त्वरीत निपटारा करणे.
- ५) बीट मधील व्यक्तींवर असलेल्या समन्स व वॉरंटची बजावणी बीट स्टाफ कडुन करुन घेणे
- ६) बीट मध्ये घडणाऱ्या अदखलापात्र गुन्हयात व इतर प्रकरणात सार्वजनिक शांतता भंगहोण्याची शक्यता असल्यास प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन दखलपात्र अपराधांना प्रतिबंध करावा.
- ७) बीट मधील गावांना नियमित भेट देवुन गावातील हालचालीची माहीती घ्यावी.
- ८) बीट मधील गावातील यात्रा, उत्सव यांची आगाउ माहिती घेवुन योग्य तो बंदोबस्त ठेवण्यासाठी वरिष्ठांना माहिती पुरवावी
- ९) बीट हद्दी मध्ये कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे चालणार नाही या साठी वेळोवेळी छापे टाकुन कायदेशिर कारवाई करावी.
- १०) पोलीस पाटील व बातमीदार आणि इतर स्त्रोतांच्या संपर्कात रहावे

- ११) बीट मधील जनतेशी सुसंवाद साधुन सलोक्ष्याचे संबध निर्माण करणे व योग्य ती गुप्त माहिती मिळविणे.

याच बरोबर बिट अंमलदार/ अधिकाऱ्याच्या अंगी सचोटी, सौजन्य, लोकसंपर्क, धडाडी व शिस्त हे गुण आवश्यक आहे. बीट अंमलदार हा पोलीस व जनता यांचे मैत्रिपुर्ण संबधं दृड करण्या कामी महत्वाची भुमिका बजावित असतो, बीट अधिकाऱ्यांच्या जितका दांडगा जनसंपर्क असेल तितके काम सोपे व संखकर होते.

# कोर्ट ऑर्डली

प्रत्येक पालसि ठाण्याकडन त्या त्या पोलीस ठाण्याशी संबंधित असलेल्या न्यायालयाच्या कामकाजात मदतीसाठी कॉन्स्टेबलची नेमणूक केली जाते. ( स्टॅन्डींग ऑर्डर ( जनरल) २७१ नुसार तरतूद ). सदर पोलीस कॉन्स्टेबल हा कोर्ट ऑर्डली न्यायालयाचे पोलीस ठाण्याशी संबंधित कामे पहतो १) तसेच पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्यातील पुढील सुनावणीच्या तारखा, कोर्टाकडुन झ ालेले निरनिराळे आदेश उदा. समन्स वॉरन्टची बजावणी, पुरावा,मुद्देमाल हजर करणे, साक्षीदार, आरोपी व तपासी अंमलदार यांना हजर राहणे इत्यादीबाबतच्या आदेशाची म पोलीस ठाण्यात व संबंधीतास पोहचविणे इत्यादी कामासाठी सुध्दा न्यायालयीन आदेश वाहक पोलीस अंमलदाराची ( कोर्ट आर्डलीची) नेमणुक केलेली असते

## कोर्ड आर्डलीची कर्तव्ये :

- कोर्ट ड्युटी शिपायांनी न्यायालय चालु असेपर्यंत न्यायालयात हजर राहिल पाहिजे
- न्यायालयात किंवा न्यायालयाबाहेर जास्त लोकांची गर्दी होऊ देऊ नये.
- न्यायालयात गोंगाट होऊ देऊ नये.
- न्यायालयात एखादी व्यक्ती गुन्हा करत असल्यास मॅजिस्ट्रेटच्या आदेशानुसार त्यास अटक करावी
- ५) कोर्टाबाहेर कोणीही व्यक्ती गोंगाट करीत असल्यास त्याला ताब्यात घ्यावे
- ६) शिक्षा झालेल्या इसमास मॅजिस्ट्रेटच्या आदेशावरुन अटक करावी व मार्गरक्षक येईपर्यंत त्यास ताब्यात ठेवावे
- ७) कोर्टाने दिलेले आदेश तसेच वेळोवेळी सांगितलेल्या कायदेशीर कामाची पुर्तता करावी
- ८) न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होताच क्रिमिनल केस क्रमांक प्राप्त करावा
- ९) आरोपीस शिक्षा झाल्यास त्याची कोर्ट कन्व्हीक्शन स्लीप घेण्याची तजविज करावी
- १०) प्रकरण बोर्डावर येताच किंवा त्यापुर्वी प्रकरणातील मुद्देमाल न्यायालयात दाखल करावा
- ११) न्यायालयाची समन्स तामिल करण्याची व सुनावणीपुर्वी तामिल झालेले समन्स न्यायालयात दाखल करण्याची तजविज करावी

कोर्ट ऑर्डली हा मॅजिस्ट्रेट व तपासी अंमलदार यांचेतील महत्त्वाचा दुवा आहे.

# पैरवी अधिकारी

प्रत्येक न्यायालयात त्या त्या पोलीस ठाणेकडून एका पोलीस अधिकाऱ्याची पैरवी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येते  पोलीस उप निरीक्षक ते पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी पैरवी अधिकारी म्हणून नेमतात. त्यांची कर्तव्ये खालील प्रमाणे आहेत.

- न्यायालयात चालणा-या खटल्यांची माहिती पोलीस ठाणे अधिकाऱ्यास दररोज कळविणे
- साक्षीदार फिर्यादी , आरोपी याना समन्स / वारंटची बजावणी होते किंवा कसे ? याबाबत न्यायालयास माहिती देणे
- गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल, प्रयोगशाळेचे अहवाल इत्यादी न्यायालयात वेळेवर हजर करणे.
- खटल्याचे निकाल अद्यावत ठेवणे, दोषी व निर्दोष सुटलेल्या खटल्यांची माहिती ठेवणे
- ५)  जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व पैरवी अधिकारी यांची दर महिन्याला पोलीस अधीक्षक मिटींग घेतात त्यास हजर राहाणे

# आरटीपीसी

जिल्हा पोलीस दल / पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस ठाण्यात, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे वाहनात, गस्ती पथकाचे वाहनात, नियंत्रण कक्ष आणि महत्त्वाचे बंदोबस्ताचे ठिकाणी माम देवाणघेवाण त्वरीत व्हावी म्हणून प्रत्येक ठिकाणी वायरलेस सेट बसविलेले असतात. या सेटवरुन संदेशाची देवाण घेवाण, संभाषण करण्यासाठी ज्याची नेमणूक केली जाते त्यास आरटीपीसी ( रेडीयो ट्रान्समिशन पोलीस कॉन्सटेबल) असे म्हणतात. त्याची कर्तव्ये खालील प्रमाणे आहेत.

- RTPC याने डयूटी सुरु होण्यापूर्वी वायरलेस सेट ( बिनतारी संच) चालुअवस्थेत आहे याची खात्री करावी.
- आलेला संदेश किंवा बोलण्यापुर्वी प्रथम नियंत्रण कक्षाची परवानगी घ्यावी
- आलेला संदेश किंवा द्यावयाचा संदेश दोन प्रतींमध्ये लिहावा.
- आलेल्या व दिलेल्या संदेशाची लॉगबुकमध्ये तारीख व वेळेची नोंद करावी.
- ५) वरिष्ठांचे वाहनावरील तसेच VIP चे वाहनावरील बिनतारी संचाच्या कॉलसाईनची माहिती ठेउन

संचावर बोलताना कॉलसाईनचाच वापर करावा.

- ६) नियंत्रण कक्ष व वरिष्ठ अधिका-याकडुन मिळालेल्या सूचना नीट ऐकून त्याचे पालन करावे व पोलीस ठाणे अधीकाऱ्यास किंवा संबंधित अधिकाऱ्यास त्वरीत कळवावे
- ७) कर्तव्यावर असताना वायरलेस सेटवर हजर राहून लक्षपूर्वक ऐकावे गैरहजर राहू नये.
- ८) बिनतारी संच नादुरुस्त असल्यास दुरुस्तीसाठी ताबडतोब पोलीस नियंत्रणकक्ष व बिनतारी संदेश विभाग यांना कळवावे व त्याबाबत लॉगबुक, स्टेशन डायरीत नोंद करावी.

# गोपनीय ( Mill Special) कर्मचाऱ्याची कर्तव्ये

प्रत्येक पोलीस ठाण्यात गोपनिय रेकॉर्ड अद्यावत ठेवण्यासाठी व पोलीस ठाणे हद्दीतील घडामोडींची आगाऊ माहिती कटग्यास्ट किंवा अधिक सहाय्यक फौजदार किंवा पोलीस हवालदार दर्जाचे कर्मचाऱ्याची साध्या वेषात नेमणूक केली जाते. मुंबई मध्ये त्यांना (MIl Special) मिल स्पेशल असे म्हणतात त्यांची कर्तव्ये खालील प्रमाणे आहेत.

- पोलीस ठाणे हद्दीतील राजकीय, सामाजिक, जातीय, संघटना, शेतममजुर, कामगार, विद्यार्थी, सहकारी कर्मचारी यांच्या चळवळ गुड प्रवृत्तीचे लोक यांच्या हालचालीची आगाऊ माहिती काढून पोलीस ठाणे अधिकाऱ्यास पुरविणे
- राजकीय, सामाजिक, जातीय, संघटना, गुंडप्रवृत्तीचे लोक यांचेविरुध्दचे रेकॉर्ड अद्यावत ठेवणे
- पासपोर्ट, चारित्र्य पडताळणी , शस्त्रपरवाना इत्यादीसाठी गोपनीय रेकॉर्ड तपासून त्याचा गोपनीय अहवाल तयार करणे
- सभा, मोर्चे, धरणे, आंदोलने याबाबतची आगाऊ माहिती मिळविणे, समाजकंटक, गुड प्रवि ृत्तीचे लोकांविरुद दाखल गुन्हे / शिक्षेबाबातची माहिती गुंडा रजिस्टर मध्ये अद्यावत ठेवणे.
- गोपनिय रेकॉर्ड व पत्रव्यवहाराबाबत गुप्तता पाळणे

# पोलीस ठाण्यातील विविध महत्वाचे रजिस्टर

**ठाणे दैनंदिनी ( स्टेशन डायरी) :- १)** ठाणे दैनंदिनी हे पोलीस ठाण्यामधील अत्यंत महत्त्वाचे व प्राथमिक रजिस्टर आहे. पोलीस ठाण्यामधील प्रत्येक घटनेच्या घडामोडींचे कारवाईचे प्रतिबिंब या रजिस्टर मध्ये लिहिले जाते. ठाणे दैनंदिनीची सुरुवात रात्री ००:०० वाजता पासुन व शेवट त्याच दिवशी व तारखेचे २४:००० वाजता होतो. पोलीस ठाण्यात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीची व पोलीसांनी केलेल्या कारवाईची वेळेनुसार क्रमवारीने नोंद घेतली जाते. यात प्रामुख्याने ठाणे दैनंदिनीचा चार्ज घेणे, हजेरी, रजा, गैरहजर, गैरवर्तन, गुन्हे दाखल नोंद, तपास, व गस्तीकरीता रवाना - परत, आरोपी अटक, रिमांड, सुटका, पोलीसांनी केलेली प्रतिबंधात्मक कारवाई, मुद्येमाल जप्ती इत्यादी सर्व नोंदी केल्या जातात.

ठाणे दैनंदिनीची एक प्रत उपविभागीय पोलीस अधिकारी / सहा. पोलीस उप आयुक्त यांना दररोज दिली जाते. प्रत्येक पानावर क्रमांक टाकलेला असतो. शेवटच्या पानावर ठाणे दैनंदिनी प्रमाणित केल्याबाबत प्रमाणपत्र असते. ठाणे दैनंदिनीचे कोणतेही पान फाडता येत नाही. खाडाखोड करता येत नाही अथवा दुरुस्ती करता येत नाही. ठाणे दैनंदिनी लिहिण्यासाठी किमान पोलीस हेडकॉन्स्टेबल दर्जाच्या अंमलदाराची नेमणूक केलेली असते.

**ठाणे दैनंदिनीची वैशिष्ट्ये -**

- ठाणे दैनंदिनी रोज लिहिली जाते
- ठाणे दैनंदिनीचा कोर्टात पुरावा म्हणून उपयोग करता येतो.
- आरोपीच गैरवर्तन, कर्मचारी यांचे गैरवर्तन, गैरहजेरी इत्यादी बाबत त्यांचे विरुदध पुरावा म्हणुन वापर करता येतो.

३) ठाणे दैनंदिनी किमान १० वर्षे जपून ठेवली जाते.

**२) गुन्हे शाबीतीच रजिस्टर (GCR) -** या रजिस्टर मध्ये न्यायालयाने शिक्षा दिलेल्या गुन्हेगाराच्या शिक्षेबद्दलची माहिती लिहिली जाते. आरोपींची नावे अल्फाबेटिकली ( अद्याक्षरानुसार ) नोंदली जातात. गुन्हे आणि गुन्हेगार व त्याच्या पूर्व दोषाचे हे कायम स्वरुपी रजिस्टर आहे. सदरच्या रजिस्टर मध्ये करावयाच्या नोंदी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी स्वताहुन करावयाच्या असतात न्यायालयात खटला चालल्यानंतर विविध गुन्ह्यात आरोपीना शिक्षा होते त्याबाबत माहिती लेखी स्वरुपात न्यायालयातुन मिळवुन गुन्हा रजिस्टर नंबर, कलम, कोणत्या कलमानुसार शिक्षा झाली याची नोंद गुन्हे शाबीतीचे रजिस्टरमध्ये घेण्यात येते.

**३) माहितगार गुन्हेगार रजिस्टर (KCR ) -** पोलीस ठाण्याच्या हद्यीत दोरोडा, जबरी चोरी, घरफोडी व चोरी करणारे, चोरीचा माल घेणाच्या तसेच मोठ्याप्रमाणात रक्कमेची फसवणूक करणाच्या गुन्हेगारांच्या नावाची नोंद या रजिस्टरमध्ये केली जाते

**४) हिस्ट्रीशीट -** ज्या सराईत गुन्हेगारांना मालाविषयीच्या दोन गुन्ह्यांत शिक्षा झालेली आहे अशांचे हिस्ट्रीशीट उघडण्यात येते. पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार ज्यांची हिस्ट्रीशीट उघडण्यात आलेली आहे त्यांची सविस्तर माहिती यामध्ये असते. त्या मध्ये गुन्हेगारांचे नांव, पत्ता, मित्र, नातेवाईक यांची नांवे व पत्ते त्यांना ओळखणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा तपशिल, आरोपीच्या बोटांचे ठसे ओळखीच्या खुणा, सवयी, फोटो, इत्यादी सविस्तर माहिती असते. हिस्ट्रीशीट मा. पोलीस अधिक्षक यांच्या परवानगीने उघडण्यात येते.

**५) व्हिलेज क्राईम नोट बुक (VCNB) -** गुन्हे आणि गुन्हेगार यांच्या तपशीलाच्या दृष्टीने महत्वाचे रजिस्टर आहे. हे गोपनिय रजिस्टर असून भारतीय पुरावा कायद्याच्या कलम १२३ नुसार न्यायालयात ग्राहय मानले आहे व्हीलेज क्राईम रजिस्टर हे भाग १ ते ४ मध्ये विभागलेले असतात. यात भाग १ व ४ मध्ये गोपनिय माहिती दिलेली असते भाग १ मध्ये गावासंबंधीची संपूर्ण माहिती, भाग २ मध्ये गावातील गुन्ह्या संदीची माहिती भाग ३ मध्ये गावातील शिक्षा झालेल्या आरोपीची माहिती व भाग ४ मध्ये गावातील राजकीय नेते तसेच राजकीय घडामोडीची योपनिय माहिती प्रभारी पो.स्टे. अधिकारी यांनी स्वता लिहिलेली असते.

६) **अ रोल रजिस्टर :-** एखाद्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गन्हेगार जर दुसऱ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत याचे निदर्शनास आले तर संबंधीत पोलीस स्टेशनला सदर गुन्हेगाराचे गुन्हेगारी रेकॉर्ड सह अहवाल पाठवृन त्यांना सदर विशेष पाळत ठेवणे बाबत सतर्क केले जाते. यास अ रोल असे म्हणतात. व त्याची नोंद अ रोल रजिस्टरला घेतात

**७) ब रोल रजिस्टर :-** दुसऱ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गुन्हेगार किंवा संशयित आपल्या पोलीस स्टेशन हद्दीत आल्याचे पोलीस स्वाधीन अधिकाऱ्याचे निदर्शनास आल्यास सदर पोलीस स्टेशन अधिकारी संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकऱ्यास त्यावर तर माहिती देऊन अहवाल सादर करतात व त्याची नोंद ब रोल रजिस्टरला घेतता.

**८) ई फॉर्म रजिस्टर :-** पोलीस स्टेशन हद्दीत कोणत्याही प्रकारचा मालाविषयीचा गुन्हा. उदा. घरफोडी, चोरी, दरोडा इत्यादी घडल्यास आपण तत्काळ सदर गुन्हा करताना गुन्हा करण्यासाठी कोणती पध्दत वापरली ते सविस्तर अहवाल लिहून जिल्हा गुन्हे कार्यप्रणाली केंद्रास सादर करतो. ( उदा. भितीला छीद्र पाडुन, कुलूप तोडुन, शटर वाकुन, डोळयात मिरची पूड टाकुन, इत्यादी ) सदर अहवाल प्राप्त झाल्यावर जिल्हा के कार्यप्रणाली केंद्र तपासी अंमलदारास अशा पध्दतीने यापुर्वी कोणकोणत्या गुन्हेगारांनी गुन्हे केले आहेत. त्यांचेवर दाखल गुन्हा, कलम वा पोलीस स्टेशनसह सविस्तर माहिती कळविते . सदर गुन्हेगाराकडे तपासी अंमलदार घडलेल्या गुन्ह्याबाबत विचारपुस करुन तपास करतात व गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न करतात. ज्या गुन्ह्यामध्ये ई फार्म भरुन पाठविला व त्याबाबत आलेले सजेशन याची नोंद या रजिस्टरला असते.

**९) अपघात रजिस्टर** :- या रजिस्टरमध्ये किरकोळ अपघातची नोंद केली जाते, परंतु ज्यामध्ये जिवीतहानी होत नाही, फक्त वाहनाचे नुकसान होते. अशा बाबतीत पोलीस स्टेशनला ज्या तक्रारी प्राप्त होतात त्याची नोंद या रजिस्टरमध्ये घेतली जाते. यामध्ये तक्रारदाराचे नाव, अपघाताचे घटना, तारीख, वेळे, स्थळ इत्यादी नमूद करुन अपघातग्रस्त वाहनाचा प्रकार, क्रमांक वाहनमालकाचे नाव व पत्ता, अपघात कसा घडला बाबत हकीकत नमूद असते. या किरकोळ अपघाताचा तपास कोणाकडे दिला त्या तपासी अंमलदाराचे नांव नमूद असते. तपासी अंमलदार या करणात चौकशी करुन अहवाल उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे पाठवितात, प्रकरणात चौकशीमध्ये गुन्ह्याचा प्रकार आढळल्यास गुन्हा दाखल करतात. चौकशी मध्ये जर गुन्ह्याचा प्रकार आढळला तर गुन्हा दाखल करुन तपास करतात.

**१०) ड्यूटी रजिस्टर :-** सदर रजिस्टर मध्ये अधिकारी, कर्मचारी यांची नांवे, ड्युटीची तारीख वेळ, प्रकार, स्थळ, व गैरहजर असलेले अधिकारी / कर्मचारी यांची माहिती नमूद असते. वरील नोंदी स्पष्टपणे लिहिलेल्या असतात. रजिस्टर मध्ये अचुन नोंदी घ्याव्यात. व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी ते दररोज साक्षांकित करावे.

**११) ड्यूटी पास रजिस्टर :-** सदर ड्यूटी पास रजिस्टर मध्ये दोन प्रतीत ड्युटी पास ( आदेश) आसतात. ज्या पोलीस कर्मचाऱ्यांची डयुटी लागलेली आहे अशा कर्मचाऱ्यांचे डयुटी बाबत सविस्तर माहिती ड्युटी पास मध्ये दोन प्रती मध्ये लिहून त्यावर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांची सही शिक्का घेऊन ड्यूटी पासची एक प्रत ड्युटी साठी नेमलेल्या कर्मचाऱ्यास देवुन त्याची दुसऱ्या प्रतीवर दिनांकीत सही घ्यावी.

**१२) क्राईम रजिस्टर :-** क्राईम रजिस्टर हे पोलीस ठाण्यातील महत्वाचे रजिस्टर आहे. प्रथम खवरी बुकात प्रथम खबरेची नोंद घेतल्यानंतर गुन्ह्याची थोडक्यात माहिती या बुकात घेतली जाते. सर्व गुन्ह्याची नोंद क्रमावारीने घेतली जाते. त्यात FIR मध्ये असलेल्या सर्व मुद्यांची नोंद असते
गुन्हा रजिस्टर (क्राईम रजिस्टर ) मध्ये खालील प्रमाणे नोंदी करतात

- अनुक्रमांक / गुन्हा रजिस्टर क्रमांक
- २) फिर्यादीचे नांव, वय पत्ता व आरोपींची नांवे, पत्ता अनोळखी असल्यास संक्षिप्त वर्णन, वय इत्यादी
- गुन्हा घडल्याचे ठिकाण, पोलीस ठाण्यापासून अंतर, दिशा व वीट क्रमांक
- गुन्ह्याचे कलम
- चोरीस गेलेल्या मालमत्तेचे वर्णन, किंमत
- ६) परत मिळविलेल्या मालमत्तेचे वर्णन, किंमत
- ७) अटक इसमांची संख्या, अटक केल्याची वेळ व तारीख
- ८) पोलीस / न्यायालयीन कोटडीची मुदत
- ९) जामीनावर मुक्त असल्यास मुक्त केल्याची वेळ व तारीख, मुचलक्याचा तपशील
- १०) केलेली कारवाई सध्याची स्थिती तपासी अमलदाराचे नाव व इतर असे एकूण २५ कॉलम असतात

**१३) अटक रजिस्टर -** अटक रजिस्टर हे पोलीस ठाण्यातील एक महत्वाचे रजिस्टर आहे. अटक केलेल्या इसमांची माहिती यात भरली जाते. अटक रजिस्टर मध्ये नोंद घेतल्यानंतरच अटक इसमाची अटकेची नोंद कोटडी बुकात घेतली जाते. अटक रजिस्टर मध्ये अटक इसमांचे वर्णन, नाव व पत्ता गुन्हा रजिस्टर क्रमांक/ कलम, जामिनदाराचे नाव व पत्ता इत्यादी संपुर्ण माहितीची नोंद घेतली जाते.

**१४) कोठडी रजिस्टर :-** आरोपीस अटक केल्यानंतर कोठडीत ठेवले जाते त्यांची नोंद ज्या रजिस्टर मध्ये केली जाते त्याला कोटडी रजिस्टर असे म्हणतात. कोठडी रजिस्टर कमीत कमी १० वर्ष जपून ठेवावे. कोठडी रजिस्टर मध्ये आरोपीचे नांव, गुन्हा रजिस्टर क्रमांक/ कलम, तपासी अधिकाऱ्याचे नांव, अटकेचा दिनांक, वेळ इत्यादी माहिती नोंदविली जाते.

**१५) मुद्देदमाल रजिस्टर :-** मुद्देमाल रजिस्टरमध्ये पोलीस स्टेशन मध्ये आणण्यात आलेला, ठेवलेला गुन्ह्यासंबंधीचा जप्त केलेल्या मालाची नोंद सुदर रजिस्टर मध्ये केलेली असते. मुद्देमालाची

नोंद घेताना मुद्देमालाचे संपुर्ण वर्णन गुन्हा रजिस्टर क्रमांक / कलम, तपासी अधिकाऱ्याचे नांव, जप्ती तारीख व वेळ इत्यादी नमुद करावे लागते. सदर मुद्देमाल मा. न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीस किंवा संबधितास देता येतो व मा न्यायालयाच्याआदेशाने त्या त्या वेळी मा. न्यायालयात सादर केला जातो

**१६) जड वस्तु जमा रजिस्टर :-** खरेदी केलेल्या जड वस्तू व इतर प्राप्त केलेली यंत्रसामुग्री, फर्निचर अशा सर्व वस्तूची नोंद या रजिस्टर मध्ये घेण्यात येते या मध्ये रु ५०० च्या वर किंमत असलेली वस्तू खरेदी केल्या संदर्भात संपूर्ण तपशील असतो. सदर रजिस्टर पोलीस स्टेशन मध्ये लेखनिक हवालदार यांच्या ताब्यात तर अधीक्षक कार्यालयामध्ये प्रबंधक यांच्या ताब्यात असते

**१७) अदखलपात्र गुन्ह्याचे रजिस्टर -** सदर रजिस्टर मध्ये दिवाणी / अदखलापत्र तक्रारीची नोंद केली जाते. अदखलपात्र रजिस्टर मध्ये तक्रारदाराचे नांव, घटनास्थळ, घटना तारीख व वेळ, गैरअर्जदाराची नांवे व पत्ते, गुन्ह्याची हकीगत इतर नोंदी अदखलपात्र रजिस्टर मध्ये घेतात अदखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्याचे अधिकार पोलीसांना नसल्यामुळे आपण तक्रारदारास दिवाणी / संबंध दाद मागण्याची लेखी समज देतो व या प्रकरणातून भविष्यात काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून संबंधितावर प्रतिबंधक कार्यवाही असेल तर करावी. एखाद्या अदखलपात्र प्रकरणात पोलीसांना जर आवश्यकता वाटली तर १५५ (२) CRPC प्रमाणे संबधीत न्यायालयाची परवानगी घेऊन दखलपात्र गुन्ह्यासारखा तपास करता येतो

**१८) हत्यार परवाना रजिस्टर -** सदर रजिस्टर मध्ये हत्यार परवाना धारकाचे नांव, पत्ता, हत्याराचा प्रकार, कंपनी, बॉडी नंबर, संख्या, हत्यार परवाना स्वसंरक्षणार्थ किंवा मालमत्तेचे संरक्षणासाठी किंवा नमूद दोन्ही कारणासाठी काढल्याबाबत नोंदी असतात स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी शस्त्र परवाना धारकाचे शस्त्र, काडतुसे, वेळोवेळी तपासावी शस्त्र परवाना धारक जर मृत्यू पावला तर त्याचे पोलीस स्टेशनला जमा करावे व तसा अहवाल मा. जिल्हा दंडाधिकारी यांना द्यावा. निवडणूकीचे वेळी कायदा आणि सुव्यवस्था राबविकामी मा. जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशाने शस्त्रे पोलीस स्टेशनला जमा करावी

**१९) स्पोटक परवाना रजिस्टर :-** सदर रजिस्टरमध्ये विहीर पाडण्यासाठी जे जिलेटीन डेटीनेटर, डायनामाईट, गनपावडर, ब्लॅक पावडर, बाबत नोंद असते. स्पोटके ज्या जागी ठेवतात त्यास मॅगझिन असे म्हणतात. ज्या जागेचे ठिकाणाबाबत रजिस्टरला नोंद असते. स्पोटके परवाना धारकाचे नांव, परवाना क्रमांक, स्पोटकांची तपासणी केल्याची तारीख व वेळ, तपासणी करणात्या अधिकाऱ्याचे नांव, हुद्दा, इतर सविस्तर माहिती असते.

**२०) कोठडी ( लॉकअप ) आरोपी  आवक जावक रजिस्टर -** या रजिस्टरमध्ये पोलीस स्टेशनचे लॉकअप मध्ये जे आरोपी अटक आहेत त्यांना किती वाजता व कोणत्या कारणासाठी ( तपास कामी, वैद्यकीय तपासणी, कोर्टासमोर हजर करणेसाठी इत्यादी ( लॉकअप च्या बाहेर काढले व आत टाकले बाबत सविस्तर नोंदी घेतात. तसेच रजिस्टरमध्ये आरोपी कोण हवालात बाहेर काढले, आत टाकले त्या अंमलदाराचे नांव हुद्दा नमुद करुन सही घेतली जाते.

**२१) लॉकअप मधील दाखल कैद्याजवळील सामानाची नोंद वही -** पोलीस स्टेशचे हवालात मध्ये जे आरोपी दाखल होतात तेव्हा अंगझडती घेतली जाते. त्यावेळी त्यांचे ताब्यात असलेल्या सर्व वस्तुंची नोंद या रजिस्टर मध्ये तपासी अंमलदार घेतात व ज्यावेळी आरोपी जामीनावर सुटल्यानंतर लॉकअप बाहेर काढतांना तेव्हा वस्तु त्याच्या ताब्यात देवुन रजिसटरला सही घेतली जाते.